

महाराजांची शाळा

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

महाराजांची शाळा

(श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं
लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* महाराजांची शाळा

पुस्तकरूपाने प्रकाशित दुसरी आवृत्ती : जानेवारी २०१५
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

*

श्री महाराज,

आपल्याकडून प्राप्त झालेल्या
या अमूल्य, देवदुर्लभ विद्येचा
हा शब्दमय आणि भावमय अर्घ्य
आपल्या
आणि
सकल कृपाळू संतसज्जनांच्या पायी
कृतज्ञ भावानं
अर्पण -

- सुहास पेठे

श्रींच्या कृपेनं त्यांच्या शिकवणुकीच्या अभ्यासाच्या, प्रयोगाच्या, अनुभवाच्या पार्श्वभूमीवर हे पुस्तक येत आहे. महाराजांनी लहानपणी कृपाळूपणे बोट धरल्यानंतर गेली सुमारे बेचाळीस वर्षं अनेक समाजशास्त्रं, जडवाद, निरीश्वरवाद, पाश्चात्य तत्त्वज्ञान, अनेक धर्मांचं तत्त्वज्ञान, कृष्णमूर्तींपासून अनेक संतांच्या साहित्याचं परिशीलन, विज्ञानवाद, खूप श्रवण-मनन-साधन अशा मार्गांनी प्रवास घडवून आणून श्री महाराजांनी संतमार्गाचं सत्य अनुभवानं मला जाणवून दिलं. त्यातून संतमार्गानंच ईश्वराचं खरं स्वरूप, अस्तित्व, अनुभव यांतून 'संतवचनी होते काम', ही खात्री देण्याची कृपा केली, ती श्री महाराजांनीच.

या प्रवासातलं काही आकलन आधीच्या साध्यासोप्या चैतन्यचिंतन (१९९६), अभंगसाधना (१९९८) या श्रींच्या विषयीच्या पुस्तकांमधून येऊन गेलेलं आहे. त्यामुळं प्रस्तुत पुस्तकातले विषय वेगळे पण त्याला पूरक आहेत, असं कृपया समजावं. श्री महाराज, त्यांनी आत्मानुभव दिलेले श्री तात्यासाहेब, त्यांचे आत्मोद्‌गार टिपून ठेवणारे सर्वश्री साने, काशीकर, पू.बेलसरे बाबा, डॉ.अंतरकर, गो.सी.गोखले, रा.ब.खाडिलकर, बापूसाहेब मराठे - अशा श्रींच्या अनेक भक्तांनी टिपून ठेवलेली वचनं या विवरणाला आधारभूत आहेत. या साऱ्यांचं ऋण न फिटणारं आहे.

या पुस्तकाच्या मर्यादेत विस्तृतपणे पाहाता येऊ शकलेले विषय पहिल्या भागात आहेत. तर थोडक्यात व संदर्भाला सोपे, उपयोगी पडावे असे मोलाचे विषय, दुसऱ्या भागात दिले आहेत. विविध शीर्षकं कृपापदावलीतले नित्यपाठ, अभंग यांतून संदर्भानुसार उद्‌धृत केली आहेत. ती मूळ पदं, नित्यपाठ पदावलीतून मिळू शकतील. थेट श्रुतलेखन व अक्षरजुळणी अथकपणे करणाऱ्या अनघा, समर्पक मुखपृष्ठ नेहमीप्रमाणं साकारणारे श्री. नंदन यांच्यापासून या संतनगरीत चोवीस तास, बारा महिने नित्य अखंडनाम आणि वेळोवेळीच्या नित्यनैमित्तिक उपासना सांभाळणाऱ्या साधक कुटुंबियांच्या मदतीबद्दल मी मनःपूर्वक ऋणी आहे. श्री. संदेशजींचा मी आभारी आहे. तसंच निरपेक्षपणे वितरण सांभाळणाऱ्या श्री. प्रकाश फुले, चैतन्य फुले व असंख्य जिज्ञासूंपर्यंत पुस्तकं सेवाभावानं पोचवणारे वाचक, यांचाही मी उपकृत आहे.

उद्धारासाठी या प्रयत्नांचा कुणी उपयोग करून घेणं, ही त्यांची मजवर कृपाच आहे, असं शेवटी मनःपूर्वक व्यक्त करतो. श्रीराम.

संतनगरी **-सुहास पेठे**

महाराजांची शाळा

अनुक्रमणिका

विभाग : पहिला
' परमार्थाचं मुक्त विद्यापीठ !'

१. समाधान ही पदवी देते ! / ९

२. जागणे हाचि आरंभ / १५

३. माझी ओळख द्यावी मला / १९

४. कुणी विचार करी ना / २७

५. प्रपंचाचे रूप दावियेले, सत्य रे ! / ३५

६. पैसा मानवाचा दास / ५१

७. थोर आपण लक्ष द्यावे / ५९

८. मर्म हुडकण्या जिणे लाभले / ६५

९. लाभावीण शीण कोण करी / ७३

विभाग : दुसरा
'बोधाचे सुवर्णकण !'

१. देहाचं प्रेम / ८३

२. नोकरीतली दुःखं / ८५

३. प्रवासातली माणसं / ८७
४. सावल्यांची सोबत / ८९
५. बाळाचं संगोपन / ९१
६. कमी का पडतं ? / ९३
७. आगळा थर्मामीटर / ९५
८. साधूंवरचं स्वामित्व / ९७
९. जन्मोत्सव की करमणुकीचा कार्यक्रम ? / ९९
१०. परमार्थातला विमानमार्ग / १०१
११. काल, आज, उद्या / १०३
१२. विद्वत्तेचं फोलपण / १०५
१३. अवघडाचं गिऱ्हाईक / १०७
१४. सेवेतली सावधानता / १०९
१५. घरजावई / १११
१६. सूक्ष्मदर्शक यंत्र / ११३
१७. दोष भांड्याचा की पाण्याचा / ११५
१८. नुकसान करणारी बुद्धी / ११७
१९. खरी न्यायव्यवस्था / ११९
२०. परवलीचा शब्द / १२१

विभाग : पहिला

‘ परमार्थाचं मुक्त विद्यापीठ !’

****
******
****
**
*

ग्रंथ जयाचा तया बरोबर !

संतांच्या जगण्याची कल्पना आपल्या संकुचित देहबुद्धीच्या पार्श्वभूमीवर येणं कठीण आहे. त्यांची देहातीत अवस्था, जगण्यामागची ईश्वरी प्रेरणा, अलौकिक सूक्ष्म जगावरची त्यांची सत्ता, स्वतःला पुसून टाकण्याची त्यांची विलक्षण क्षमता, देहप्रारब्धाचा त्यांचा आनंदाचा स्वीकार, त्यांचं नित्य समाधान - हे सारं समजणं किंवा खरं वाटणं अवघड आहे. पण ते शाश्वत काळापासून चालत आलेलं निर्विवाद सत्य असल्यामुळं, आपल्याकडं एवढंच उरतं की, इतक्या आनंदाचं जगण्याची त्यांनी मुक्तहस्तानं, निरपेक्षपणे, विनामूल्य वाटलेली विद्या शिकायचा आपण प्रयत्न करावा.

आपलं अज्ञान, भ्रम, संशय, स्वार्थी भूमिका - अशा गोष्टी बाजूला ठेवल्या तर, आपल्याला ही विद्या शिकणं आणि तिचा प्रत्यक्ष अनुभव घेणं शक्य आहे. खरंतर लौकिक विद्या किती किचकट असतात ! त्यासाठी किती बुद्धिमत्ता, पैसा, अनुकूलता लागतात, त्या शिकून फारतर एखादं शास्त्र अवगत होतं. त्यानं प्रपंचाची सोय होते, सुखसाधनं वाढतात. पण अंतिमतः मनुष्य परावलंबी होऊन प्रपंचात अधिकच फसतो.

यासाठी संतांनी सर्व वयाला, परिस्थितीला लागू असलेली जी समाधानाची विद्या वाटली, तिचा परिचय करून घेणं, अभ्यास करणं हा प्रपंच करतानाच चालायचा हिताचा आणि तर्कशुद्ध राजमार्ग आहे. ते शिक्षण प्रपंचाकडं पाहाण्याची दृष्टी देतं, स्वतःचा जीवनग्रंथ वाचायला शिकवतं, ज्यात समाधानरूप भगवंताची ओळख आणि प्राप्ती आपोआप होऊन जाते. शिकतो म्हणून शाळा म्हणायचं, पण मिळणाऱ्या गोष्टींचा दर्जा पाहिला, महत्त्व पाहिलं तर ते शब्दांपलीकडचं आहे. श्रीमहाराजांचं आणि संतांचं सर्वांसाठी असलेलं हे -

‘ परमार्थाचं मुक्त विद्यापीठ !’

१. समाधान ही पदवी देते !

विद्येच्या गरजेबद्दल काही फार सांगावं असा आजचा काळ राहिला नाही. तिची गरज आणि उपयोग हे अनेक मार्गांनी, विशेषतः गेल्या काही शतकांत तर, जवळपास सर्वांना ठाऊक झालेले आहेत. विद्यांचे असंख्य प्रकार, अगणित शाखा आज आहेत आणि त्यांत काळानुसार सतत भर पडते आहे. विद्येनं माणसाचं अज्ञान दूर होणं, मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करून त्यानं आपला व्यवहार सोपा आणि यशस्वी करणं - अशा गोष्टीही आता नव्यानं सांगाव्या अशा राहिल्या नाहीत. त्यामुळं विद्येपासून कुणी वंचित राहू नये, अशी एक सार्वत्रिक इच्छा आज जगभर दिसून येते. हे अगदी स्वाभाविक आणि रास्त आहे.

ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणं त्याला विद्या शिकता यावी, विद्यांच्या शाखा निवडता याव्या, त्यातून त्याची जिज्ञासा पूर्ण व्हावी - हा अगदी प्राथमिक हेतू आज साऱ्या शिक्षणप्रसारामध्ये आहे. त्यात असं गृहीत धरलं आहे की, विद्येच्या साहाय्यानं ज्ञान, ज्ञानाच्या प्राप्तीमुळं योग्य व्यवहार, त्यामुळं वैयक्तिक आणि सामाजिक यश, सुबत्ता, समृद्धी यांची वाटचाल - असा हा खरंतर शुद्ध हेतूचा दृश्य प्रवास आहे.

अर्थातच त्यासाठी जुने संस्कार, शारीरिक-प्रापंचिक-आर्थिक अडचणी, सोयींचा अभाव - अशा अनेक प्रश्नांनाही मार्ग काढण्याचे प्रयत्न देशातच नव्हे तर, सगळ्या जगभर केले गेले. आजही ते वेगवेगळ्या मार्गांनी गरजांनुसार केले जातही आहेत. त्या प्रयत्नांचाच एक भाग आणि उपाय म्हणजे जगभर विखुरलेली मुक्त विद्यापीठं होत, हे आपण जाणतोच.

आपल्याला कल्पना आहेच की, कुणाची आर्थिक परिस्थिती नाही म्हणून शिक्षण सुटलं, मोलमजुरी-नोकरी करावी लागली, कुणी लवकर वयात गृहिणी झाल्या, कुणी उद्योगधंद्यांत शिरले, कुणी कौटुंबिक जबाबदाऱ्यांत वर्षानुवर्षं अडकून राहिले. अशा अनेकांची या शास्त्रशुद्ध

शिक्षणाची इच्छा अपूर्ण राहिली. या सर्वांना अनुकूलता मिळाल्यावर थेट शिक्षण घेण्याची संधी देऊन तिची काळजी अशा विद्यापीठांनी घेतली आणि आजही घेत आहेत. त्या अर्थानंच एखादी विशिष्ट वयाची अट सोडता विद्येच्या अनेक शाखांची शिक्षणं या प्रकारच्या विद्यापीठांतून सहजपणे आणि दर्जेदारपणे उपलब्ध होत आहेत. त्या अर्थानं ती सर्वांना मुक्त आहेत.

आता या साऱ्या पार्श्वभूमीवर आपल्याला असा अनुभव येणं अपेक्षित आहे की, विद्येचा, शिक्षणाचा इतका प्रचार आणि प्रसार सगळीकडं झाल्यानंतर जगभर ज्ञानाची उणीव राहू नये, समृद्धीत कमी पडू नये. साध्या भाषेत 'कोणी दुःखी असू नये' कुठं असमाधान, भय, चिंता - अशा गोष्टी आढळू नयेत. ही अपेक्षा बाळगली, तर ती रास्तच म्हणावी लागेल.

पण आपला अनुभव काय सांगतो ? वरवर पाहिलं तर, पूर्वीच्यापेक्षा माणसांच्या जीवनात कितीतरी समृद्धी आलेली आहे. वस्तू, सुखसोयी, साधनसंपत्ती, माहिती, ज्ञान, यंत्र-तंत्र - अशा असंख्य बाबतीत अक्षरशः या विद्यांच्या प्रसारापूर्वी कल्पना केली नव्हती एवढी रेलचेल, आज जगात आहे. आपण जशी कल्पना केली होती, तसा निदान त्या प्रमाणात तरी आज सुखा-समाधानाचासुद्धा अनुभव यायला हवा होता.

तसा तो आला नाही असं नाही. पण ही समृद्धी, रेलचेल जशी थोड्यांच्या वाट्याला आली आहे, तसंच त्यापोटी निर्माण होणारं सुखसुद्धा फार थोड्यांच्याच वाट्याला आलं आहे. ज्यांच्या ते आलं आहे, ते त्यात मश्गूल आहेत, रमलेले आहेत. इतरांच्या वाट्याला यांतल्या विद्या थोड्याफार आल्या असल्या तरी, त्यांच्या वाट्याला समृद्धी तर सोडाच संधींच्या उणिवा, दारिद्र्य, उपेक्षा - अशी असंख्य दुःखंच सोसणं वाट्याला आलं आहे. सुखाचा अनुभव तर दूरच राहिला.

ज्या थोड्या लोकांच्या वाट्याला व्यावहारिक कौशल्य, संधींची अनुकूलता, परिस्थितीची मदत - अशा कारणांनी अपरिमित संपत्ती आणि समृद्धी आली आहे त्यांच्याकडं - एकतर त्याचा संचय करावा, त्यावर वर्चस्व ठेवावं, त्यात अजूनही अकारण, अवाजवी भर घालावी - अशा अनेक प्रवृत्ती शिरलेल्या आपण पाहातो. इतरांची दारिद्र्य, दुःखं यांच्या अनेक कारणांपैकी

हे एक कारण आहे, हे आता उघडच आहे. बरं, ज्यांच्याकडं ही सारी अनुकूलता आहे ते सुखात आहेत, दिसतात, पण त्यांची आतली जीवनं ही कित्येकदा इतकी अत्यंत निकृष्ट, हलक्या दर्जाची, बुभुक्षिततेची, क्षोभाची आहेत की, या विद्या आणि बाकीच्या सगळ्या अनुकूलता-या साऱ्या गोष्टी मिळूनही, त्यांचं सुख इतकं तकलादू का असावं ? याचा जर कुणी मनापासून विचार करील तर त्याच्या लक्षात येईल की, या विद्यांत, समाधानाच्या विद्येचा अभाव आहे !

आपण या विद्यांवर, त्यांच्या शाखांवर, या सर्व ज्ञानाच्या प्रसारांवर नजर टाकली तर, याची अधिकाधिक जाणीव होऊ लागते की, आपण जी मुख्य विद्या मिळवायची ती कुठंतरी हरवून बसलो. किंबहुना ती हरवल्याची जाणीवसुद्धा विसरून गेलो, म्हणून आज मनाच्या दैन्याची ही अवस्था तुमच्या आमच्यासारख्या साध्यासुध्या माणसांपासून, मोठमोठ्या उच्चपदस्थ, जागतिक कीर्तीच्या लोकांपर्यंत आढळून येते.

हे अत्यंत स्पष्टपणे सांगणारे, त्याचे मार्ग दाखवणारे, ती सोप्यात सोपी करून, त्यापासून कुणालाही वंचित न ठेवणारे अनेक महापुरुष या जगाच्या पाठीवर होऊन गेले. त्यांतले एक श्रेष्ठतर महापुरुष म्हणजे श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज होत. स्वतः हे शाश्वत समाधान मिळवून केवळ इतरांच्या कल्याणासाठी, त्यांना ते मिळावं म्हणून आपल्याला कल्पनाही येणार नाही, इतक्या तळमळीनं ईश्वरी प्रेरणेनं आयुष्यभर ते राबत राहिले. आजच्या भाषेत म्हटलं तर हे शिक्षण शाळेइतकं प्राथमिक, सोपं आहे. पण सूक्ष्मपणे विचार केला, तर विद्यापीठाच्याही पलीकडं वाटावं, एवढं अवघड आहे. प्रपंचानं आपलं एका अर्थानं नुकसान केलंच आहे. पण महाराजांच्या सांगण्याचा मथितार्थ लक्षात घेतला नाही, त्यांना अभिप्रेत आचरण केलं नाही, तर हे ज्ञानही पुस्तकी राहील. मग दुसऱ्या बाजूनं या परमार्थाच्या शब्दज्ञानानंही आपलं नुकसान होईल. या मार्गाबद्दल सांगतानासुद्धा महाराजांनी अनेकदा सावध केलं आहे.

ते म्हणत, 'सोन्याची मंदिरं बांधता येतील, पण उपासनेचं मंदिर बनवणारे थोडेच असतात, मंदिराचासुद्धा प्रपंच होऊ देऊ नये.' सगुणाचं

महत्त्व त्यांनी सांगितलं असलं, तरी तेसुद्धा निर्गुणाकडं जाण्याचं भान ठेवूनच सांगितलं आहे. ते म्हणत, देवापेक्षा देवाची आरास मोठी नसावी. यावरून आपणही नुसतं सगुण-सगुण करणं, अन्नदान म्हणून जेवणावळी घालणं, महाराज-महाराज सारखं म्हणत राहाणं-त्यांना अभिप्रेत ते मात्र न वागणं, स्वतःच्या अवगुणांना शोधून सुधारण्याला प्राधान्य न देणं-असल्या गोष्टी त्यांना अपेक्षित नाहीत, उलट व्यथित करतात. शिवाय आपली खरी प्रगती न होता उगाचच परमार्थाचा गवगवा आणि भ्रम होऊन आपलं नुकसान मात्र होतं. ते टाळावं आणि या विद्येचा खरा अभ्यास व्हावा.

श्री महाराजांची तळमळ इतक्या पराकोटीची, मनापासूनची होती की, तिची कल्पना सामान्य स्वार्थी माणसाला येणंही कठीण आहे. त्यांनी स्वतःच या साऱ्या त्यांच्या प्रयत्नांना चक्क 'आटापिटा' म्हणावं, यात खूप काही आलं आहे. ते तर तटस्थपणानं आपल्या या प्रयत्नांबद्दल आणि असे प्रयत्न करणाऱ्या इतर निरपेक्ष महान संतांबद्दल अगदी वस्तुनिष्ठपणे बोलताना म्हणाले आहेत की, 'लोक आपलं ऐकत नाहीत हे असूनही, त्यांचं कल्याण हे समाधान मिळवण्यातच आहे, याची जाणीव ठेवून संतांनी आपलं हे जीवितकार्य सोडलं नाही.'

आयुष्यातली सर्वांत मोलाची विद्या देतानासुद्धा महाराजांनी दाखवलेला कनवाळूपणा लक्षात घेण्यासारखा आहे. प्रपंचाचे व्यवहार, बाहेरची परिस्थिती या गोष्टी माणसाला टाळणं कठीण आहे. हे ओळखून त्यात बिघाड न होता, आपल्या समाधानाच्या ध्येयाला अनुकूल कसं राहायचं, याचं कौशल्य त्यांनी शिकवलं. यावर ते एका ठिकाणी म्हणाले, 'प्रपंचाला जरासुद्धा धक्का न लागता, हे भगवंताचं ध्येय समोर ठेवून राहाता आलं, तर काय हरकत आहे ?' इतक्या सहृदयपणे आपल्या हिताचा कोण विचार करणार !

प्रत्येकाला ही समाधानाची विद्या मिळावी आणि तिच्या उपयोगानं त्यानं आपल्या जीवनाचं सार्थक करून घ्यावं, त्याचबरोबर इतरांनाही त्याचा लाभ द्यावा, या शुद्ध हेतूनं त्यांनी अक्षरशः झळ, कष्ट, त्रास, निंदा, उपेक्षा, अपमान, अपयश, अडथळे, शरीरदुःख, टीका - अशा अगणित गोष्टी सोसून

हे अंगीकृत कार्य शेवटच्या श्वासापर्यंत सोडलं नाही.

ही समाधानाची विद्या जितकी एखाद्या शाळकरी मुलाला किंवा त्याच्या वयाच्या माणसांना गरजेची आहे, तितकीच ती अत्यंत वयोवृद्ध किंवा अंथरुणाला खिळलेल्या, शेवटचे क्षण मोजणाऱ्या माणसालाही गरजेची आहे. हे ओळखून त्यांनी ती तितक्यातितक्या पातळीवर सोप्यात सोपी करून, त्या त्या पातळीवरच्या अडचणी लक्षात घेऊन, त्या सोडवून सांगितली आहे.

त्यात जसा त्यांनी एखाद्या अडाणी माणसाचा विचार केला आहे तसाच ज्ञानी पंडिताचाही विचार केला आहे, जसा अश्रद्धाचा विचार केला तितकाच श्रद्धावानाचाही विचार केला आहे. ते करताना जगाचा व्यवहार, आजचा हा विद्यांचा प्रसार, कौटुंबिक, सामाजिक प्रगती - हे सगळं लक्षात घेऊन त्यांचा मेळ घातला आहे.

ते करताना असंख्य परंपरा, रूढी, वेदउपनिषदांपासूनचं ज्ञान, अनेक भ्रम, समजुती, अंधश्रद्धा, विपरीत कल्पना, माणसांच्या संस्कारांतले भेद - यांवर आवश्यक तो प्रकाशही टाकला आहे. हे सारं सांगताना संतांच्या ठिकाणी पुढच्या अनेक शतकांचा वेध घेण्याची असणारी शक्तीही त्यांनी वापरली आहे. ज्यामुळं आजचेच काय, तर उद्याचे समाधानाच्या आड येणारे प्रश्नही श्री महाराजांच्या या समाधानाच्या विद्येत समाविष्ट झाले आहेत.

त्यांचं लक्षात घेण्यासारखं आणि आजन्म न विसरता येण्यासारखं वैशिष्ट्य हे की, त्यांची ही समाधानाची शिकवणूक मुक्तहस्तानं देताना ते जसे लहान-मोठ्यांच्या, गरीब-श्रीमंतांच्या, ज्ञानी-अज्ञानी माणसांच्या पातळीवर आले, तसेच ते हे सारं समजावून देताना अगदी सर्वदृष्टीनं सामान्यांतल्या सामान्य माणसापर्यंत खाली उतरून, त्याला समाधानाच्या दिशेनं एक पायरी तरी वर नेण्यासाठी खाली आले. ते किती खाली असतील याची आपण कल्पनाच करू शकतो.

त्यातच न विसरता येण्यासारखं त्यांचं दुसरं प्रेमळ आणि खात्रीचं आश्वासन हे की, 'मनुष्य कसाही कितीही खाली असला तरी, त्याचा हात एकदा हाती घेतल्यावर त्याला या समाधानरूप ईश्वराच्या हाती

पोचवण्यापर्यंत तो मी कधीच सोडणार नाही.'

हे समजून घेताना त्यांनी देह धारण केला त्यावेळचे असंख्य घटना, प्रसंग तर त्यांच्या चरित्रातून आपल्याला ठाऊक असतीलच. पण काळाच्या गतीप्रमाणं देहाचा त्याग करावा लागला तरी, पुढं पूज्य तात्यासाहेब केतकर महाराज यांना आत्मज्ञान प्रदान करून, श्री महाराजांनी त्यांच्या रूपानं पुन्हा बेचाळीस वर्षं आपला हा शब्द पाळला. आजही नामात वसणाऱ्या व अनुभवाला येणाऱ्या त्यांच्या शाश्वत अस्तित्वातून हा शब्द तितक्याच प्रत्ययकारीपणे पाळला जातो आहे. इतिहासात अशी उदाहरणं आणि एवढी तळमळ बाळगणारी केवळ संतमंडळीच असू शकतील.

ज्यांनी सामान्य-असामान्य माणसावर ही समाधानाची विद्या मुक्तहस्तानं देताना जे निःस्वार्थी प्रेम केलं त्याचं आणि या विद्येचं वेगवेगळ्या पैलूंनी आजच्या काळाच्या संदर्भात पुन्हापुन्हा अध्ययन, मनन, आचरण करणं, हे आपलं कृतज्ञ कर्तव्य आहे, असं वाटतं. तोच बाळबोध प्रयत्न पुढच्या पानांत मांडला आहे.

समाधानाच्या या मुक्त विद्यापीठात श्री महाराजांनी सांगितलेल्या, समजावून दिलेल्या गोष्टींचा स्वयंअभ्यास, प्रयोग आणि अनुभव हाच एक हेतू असू शकतो आणि स्वतःला लाभलेलं परिस्थितिनिरपेक्ष 'समाधान हीच त्यातली पदवी'आहे - प्राप्ती आहे, ध्येय आहे - जे आजन्म पुरणारं आहे. म्हणूनच ही सारी पानं हा त्यासाठी स्वयंअभ्यास आहे.

एकदा महाराजांनी म्हटल्याप्रमाणं, 'आपण आपल्या हाताला अत्तर लावतो ते स्वतःला सुगंध यावा म्हणून.' हा अभ्यास, हा त्यासाठी केलेला अभ्यास आहे. तो समाधानाचा शाश्वत सुगंध स्वतःला यावा म्हणून. तो त्यांच्या कृपेनं प्राप्त झाला. आता इतर कुणी त्या सुगंधानं आनंदित झाला तर, ती इच्छा भगवंताच्या कृपेच्या वाऱ्याचीच असते, ही कृतज्ञ जाणीव राहो, ही संतचरणी प्रार्थना !

* * *

२. जागणे हाचि आरंभ

देहाची आसक्ती आणि प्रेम माणसाच्या जन्माबरोबर येतं. तो प्रपंचाच्या आणि जगाच्या सहवासानं ते इतकं वाढवीत जातो की, व्यसन वाढावं, भूल पडावी तशी त्याला स्वतःची आणि आपण कशाला जन्माला आलो आहोत, या मूळ गोष्टींचीच भूल पडते. रोज रंग बदलणाऱ्या आणि सतत सुखदुःखांचे हेलकावे देणाऱ्या या प्रपंचात माणूस इतका गुंगून जातो की, अखंड आनंदमय भगवंत आपल्या ठिकाणी आहे, इतकंच काय याच जन्मी तो गाठण्यासाठी, आपण जन्माला आलो आहोत-याचा त्याला पूर्ण विसर पाडण्याचं सामर्थ्य या प्रपंचाच्या उपाधींमध्ये आहे. एकदा ही भ्रमाची झोप लागली की, प्रपंचाची आसक्ती टाकून भगवंत होणारे श्री ज्ञानेश्वर, श्री तुकोबा, श्री महाराज यांसारखे असंख्य संत असूनही, त्याला दिसत नाहीसे होतात. सिंह जरी झाला तरी, झोपी गेला तर, जागी असलेली आणि चालणारी मुंगीसुद्धा त्याच्यापेक्षा पुढं जाईल. म्हणून जागी झालेली साधीसाधी माणसंसुद्धा परमार्थ गाठतात. म्हणून झोपी गेलेल्यांना प्रपंचातून जागं करणं, हाच त्यांच्या आनंदाच्या मार्गाचा खरा आरंभ आहे. जागे झाले तर त्यांना प्रपंचाच्या खऱ्या स्वरूपाचं ज्ञान होईल, आपल्या ध्येयाचं आकलनही होईल आणि आरंभ झाल्यामुळं प्रवासही होईल.

व्यवहारातलं साधं ध्येय गाठायचं तर आपल्याला उपलब्ध असलेल्या साधनांचं ज्ञान लागतं, अज्ञान दूर करावं लागतं, कौशल्यं मिळवावी लागतात, त्यासाठी कुणाचं अधिक मार्गदर्शन, मदत लागते आणि हे जर केलं तर ध्येय गाठता येतं. तर हे आकलन होण्याचं महत्त्व मुळात केवढं असेल ? आता हेच आकलन जगातल्या वेगवेगळ्या बाबतीत होताहोता शेवटी या साऱ्या जगाच्या व्यापाराचं झालं, स्वतःचं झालं आणि त्यामागं उभ्या असलेल्या ईश्वराचं झालं तर, आपल्या आयुष्याचं आपणच सार्थक करू शकू, यात यत्किंचित शंका नाही !

याला आणखीही एक बाजू आहे. ती हा घोटाळा वाढवते. आकलन

म्हणजे सामान्य माणसाला वाटतं कळणं, माहिती असणं. लहानपणापासून अनेक अनुभवांमुळं आपल्याला अनेक गोष्टी कळतात, माहिती आहेत अशी माणसाची नकळत पण ठाम समजूत असते. त्या जोरावर तो स्वतः तर जगतोच, इतरांना जगायला लावतो, किंबहुना इतर जग कसं चुकीचं जगतं आहे, हेही तो ठामपणे सांगतो.

अनेकदा त्याच्या स्वतःच्याच आयुष्यातल्या त्याच्या सुखाच्या, कर्तृत्वाच्या, परिस्थितीबद्दलच्या, प्रगतीबद्दलच्या, इतरांना वळण लावण्याबद्दलच्या - कल्पना प्रत्यक्षात अनेकदा सरळसरळ चुकीच्या ठरतात. तरी माणूस आपल्या आकलनाबद्दल, कळण्याबद्दल, माहितीबद्दल जागा होत नाही, असं आढळतं. तर मग खरं आकलन येऊन, आयुष्यात योग्य दिशेनं वाटचाल करून, मनुष्यजन्माचं सार्थक करणं किती दूर असेल !

तरीही हे शक्य आहे, पण कुणाला ? जो निदान या साऱ्याबद्दल जागा व्हायला तयार आहे, ही सारी वस्तुस्थिती लक्षात घ्यायला तयार आहे, चुका, त्रुटी मान्य करायला तयार आहे, वागण्याचा मार्ग योग्य दिशेनं बदलायला तयार आहे-त्याच्याच बाबतीत या साऱ्याला अर्थ आहे ना ?

जर जागं व्हायचीच तयारी नसेल, प्रांजळपणा नसेल, प्रामाणिक प्रयत्न नसतील तर, आयुष्याची वर्षं वाढतील, माणूस प्रौढ, वृद्ध - सारं काही होईल पण त्याचा शेवट 'आणखी एक माणूस या जगात आला होता आणि आपल्या मनाप्रमाणं, हट्टानं जगून अखेर गेला' यापेक्षा वेगळा काय होणार ? इतर माणसांच्या आयुष्यात होतं तसं, तो माणूस अखेर नकोसा होतो-भले त्याला अजून जगावंसं वाटेल किंवा त्याला जगाचा कंटाळा येईल. असं तर बरंचसं जग जगतंच. मग मनुष्य म्हणून जन्माला येऊन, आपण काय वेगळं साधलं, याचा विचार तरी आपण करायला हवा ना ?

श्री महाराज एके ठिकाणी म्हणाले की, मनुष्य लहानाचा मोठा होतो, प्रौढ होतो, वृद्ध होतो. तो लौकिकदृष्ट्या मोठाही होतो. पण 'समजुतीच्या बाबतीत तो मोठा होत नाही.' हे विचार करण्यासारखं आहे. वयानं समजूत वाढण्यापेक्षा, जीवनाचं आकलन वाढण्यापेक्षा-त्याचा मीपणा,

अहंकार वाढतो - हे काही माणसाच्या जीवनाचं सार्थक नव्हे. पण आपण जणु माणसाच्या जीवनाला येऊन सार्थक केलं आहे अशा भ्रमात तो राहातो, याचं आकलन त्याला होईल तो सुदिन. तो या अर्थानं जागा झाला तेव्हा त्याच्या मनुष्यजीवनाचा खरा आरंभ झाला.

श्री बाबामहाराज साध्या शब्दांत म्हणत, 'आपल्याला आधी माणूस व्हायचं आहे'. हे म्हणताना त्यांना आपल्याला आपलं जे जगणं बरोबर वाटतं आहे, त्याबद्दल काय वाटत असेल आणि ते किती खरं असेल, हे लक्षात आलं, आकलन झालं तर पटण्यासारखं आहे. जागं करणारंही आहे.

हे ज्यांना वाटतं त्यांना स्वतःचं काय, जगाचं काय, स्वतःच्या कर्तव्यांचं काय, सामाजिक जबाबदारीचं काय तर परमेश्वराचंही आकलन करून घेण्याची आणि आपलं आयुष्य अक्षरशः आमूलाग्र बदलून टाकण्याची संधी जरूर आहे. मनुष्य एखाद्या शाळेत जाऊन विद्या शिकतो, त्यात प्रावीण्य मिळवतो, त्याच्या साहाय्यानं व्यवहार-उद्योग करतो, त्यात यशस्वी होतो तसंच ज्याला स्वतःचं आयुष्य खऱ्या अर्थानं यशस्वी, सार्थकाचं करायचं आहे, त्यासाठी त्याला लागणारी विद्या आहे. ती देणारी सर्वदूर पसरलेली, कुणाही जिज्ञासूसाठी असलेली, विनामूल्य, निरपेक्ष अशी एक अलौकिक, विशाल शाळा आहे- तिचं नाव 'महाराजांची शाळा' !

ही शाळा 'महाराजांची' म्हटल्यावर 'श्री गोंदवलेकर महाराजांची शाळा' असं वाटणं स्वाभाविक आहे. या पुस्तकाच्या एका मर्यादित संदर्भात ते खरंही आहे. पण जसं खऱ्या संतपदाला पोचलेल्या निःस्वार्थी महापुरुषांना, सत्पुरुषांना, संतांना आदरानं आपण होऊन कृतज्ञ, जाणत्या व्यक्तींनी 'महाराज' म्हणावं-तशा साऱ्या महाराजांचीच ही शाळा आहे. श्रींच्या अंतःकरणाची ज्याला कल्पना असेल, त्याला संकुचित अर्थानं ती फक्त 'त्यांचीच शाळा' आहे असं म्हटलेलं, त्यांनासुद्धा रुचणार नाही, हे पटेल. स्वतःला, जगाला आणि जगदीशाला ओळखून आपलं कर्तव्य करायला शिकवणारी ही शाळा तशी अनादि काळापासून सुरू आहे.

ती तिच्या विद्यार्थ्यांना थेट जग बदलायला जायला सांगत नाही. आधी स्वतःला जाणायला शिकवते. विशाल जीवनाची विद्या शिकवते.विशाल

जीवनाचं आचरण घडवून घेते. खऱ्या अर्थानं अशा शाळेत शिकून तयार झालेल्या माणसांच्या जगण्यानंच जग खरं बदलून जातं, ईश्वरमय होतं ! स्वतःत आणि जगात स्वास्थ्य आणण्याचा यापेक्षा खरा, सोपा, व्यवहार्य आणि सर्वांसाठी असलेला मार्ग अधिक कुठला असेल !

या सांगण्याला अनादि काळाची परंपरा तर आहेच. अनेक अनुभवसिद्ध मार्गांचा इतिहासही आहे. पण श्री महाराजांचं सांगणं सामान्य प्रापंचिकाच्या अडीअडचणी, मनाची ठेवण, कुवत, आजूबाजूच्या काळाचा विचार करणारं आहे. वेळी शास्त्रमार्गालासुद्धा तितकाच उपयोगी पण कालोचित मार्ग देणारं आहे. आग्रह, अवडंबर किंवा कर्मकांड अशा गोष्टी शक्यतो बाजूला ठेवणारं असंही आहे. त्यामुळं ते कुणालाही चटकन आपलंसं करणारं आहे. एखादं अवघड गणितं सोडवण्याची सोपी रीत सांगावी, तशी सुबोध विद्या देणारं आहे. अनेकदा परमार्थाच्या रूढ समजुती, कल्पना यांना गरजेचा धक्का देणारंही आहे. त्यामुळं त्याचा यथाशक्य सारांश इथं करण्याचा हा त्यांच्याच कृपेनं मांडलेला प्रयत्न आहे. त्याच संदर्भात अशा इतर संतांचे इथं येणारे संदर्भही असेच पूरक आहेत.

आधी म्हटल्याप्रमाणं सार्थकाच्या जीवनाची विद्या शिकवणारी ही शाळा पुरातन आहे. यांत 'जागणे हाचि आरंभ गुरुमार्गावरी ठरे' या उक्तीत अभिप्रेत अर्थानं महाराजांचं म्हणून काही सांप्रदायिक वेगळेपण इथल्या सांगण्याला खचितच नाही. प्रश्न उद्धाराचा आहे आणि कुणाही गुरूचं ऐकून तो सोडवावा एवढीच महाराजांची तळमळ आहे. हे कृपया लक्षात घ्यावं. या अर्थानं महाराज एका ठिकाणी म्हणाले, 'सांगणारा कुणालाही, कुठंही, कधीही भेटेल, ऐकणारा, ते करणारा मिळणं कठीण आहे !'

इतक्या तळमळीनं आणि निस्वार्थीपणानं सांगितल्यावर निदान आपल्या कल्याणासाठी तरी आपण जागं व्हावं, त्यांचं खरं म्हणणं समजून घ्यावं आणि आपल्याकडून ते अमलात आणण्याचा तळमळीचा प्रयत्न करावा, लागल्यास त्यांच्या कृपेची मदत मागावी, हे बरोबर होईल ना ?

* * *

३. माझी ओळख द्यावी मला

आजच्या व्यवहारात स्वतःला स्वतःची ओळख देण्याचा प्रश्न कधी फारसा उद्‌भवतच नाही. अनेक व्यावहारिक कारणांसाठी आपल्याला स्वतःचीच ओळख दुसऱ्यांना, जगाला करून द्यावी लागते. शाळेत, कॉलेजमध्ये वर्षाच्या सुरुवातीला तासावर नवे सर आले की, ते ओळख करून घेतात आणि स्वतःचीही ओळख करून देतात, हे आपल्याला ठाऊक आहेच.

नोकरीसाठी मुलाखत असली तरी उमेदवार आपली ओळख मुलाखत घेणाऱ्यांना करून देतो, कामगार नव्या कामाला जाताना तिथल्या आपल्या वरिष्ठांना आपली ओळख करून देतो. काही विवाहकार्य ठरवायचं असलं तर समोरासमोर आलेली दोन्ही कुटुंबं, त्यांचे नातेवाईक एकमेकांना आपली ओळख करून देतात. इतकंच काय, अगदी जागतिक पातळीवर दोन राष्ट्रप्रमुख एकमेकांना भेटत असतील तरी ते स्वतः किंवा त्यांचे राजदूत एकमेकांना एकमेकांची ओळख करून देतात.

आज कुठंही कुठल्याही महत्त्वाच्या कामासाठी जायचं असेल तर स्वतःची ओळख करू देऊन शकणारी, ओळख प्रस्थापित करू शकणारी कितीतरी प्रकारची ओळखपत्रं, कार्ड, पुरावे, फोटो, सह्या, पत्ते - अशा असंख्य गोष्टी माणसाला आपली ओळख देण्यासाठी बरोबर बाळगाव्या लागतात.

या साऱ्यात आपल्याला दोन प्रकार सहज दिसतील की, एकमेकांना अपरिचित असल्यामुळं व्यवहारासाठी परस्परांना आपली ओळख द्यावी लागणं हा अगदी तांत्रिक आणि आवश्यक भाग आहे. वर पाहिला तो दुसरा भाग मात्र परस्परांचा एकमेकांवर जो अविश्वास आहे, त्याचं निदर्शक आहे. ज्या कामासाठी जो माणूस आला आहे, तो तोच आहे आणि त्याच्याशी होणारा व्यवहार हा व्यावहारिकदृष्ट्या बरोबर होण्याकरता असल्या असंख्य ओळखपत्रांची आणि पुराव्यांची माणसाला गरज भासते , असं

आढळून येईल.

त्याचं खरं कारण पुढं जो व्यवहार होणार त्यात फसवणूक होण्याची भीती माणसाला आहे, व्यवहार करणाऱ्या संस्थांना आहे, समाजाला आहे, सरकारला आहे. त्यामुळं कुणाचा तरी लुबाडणुकीनं होणारा गैरफायदा माणसाला माहीत आहे. त्यापोटी माणसाला एकमेकांवर अविश्वास दाखवावा लागतो आणि असल्या तांत्रिक कागदांनी, पुराव्यांनी तो पटवून द्यावा लागतो. याचा सरळ अर्थ हा नाही का की, आपल्या आयुष्यातले एकमेकांशी असलेले संबंध, आवश्यक असलेले व्यवहार खरंतर सरळपणे करण्या येण्यासारखे आहेत, पण ते करताना त्याची खात्री देण्याइतपत प्रामाणिकपणा आपल्याकडेही उरला नाही. व्यवहार करणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीकडेही उरला नाही. इतपत साध्या व्यवहारातली अप्रामाणिकता, संशय, फसवणुकीची शक्यता ही आता आपली 'खरी ओळख' उरली आहे, असा याचा अर्थ होतो ना ?

याचं खरेपण तर आपल्याला पदोपदी आढळतं. मुलगा किंवा मुलगी शाळेत म्हणून गेली असेल आणि शाळा संपायच्या वेळेला परत येत असेल तर, ती तेवढा वेळ शाळेतच असेल, याची खात्री आज पालकांना नाही. अनेकदा अनुभव उलट येतो आणि त्याचे दुष्परिणामही घरोघरी सोसावे लागतात. गिऱ्हाईक दुकानात जातं. एखादी वस्तू मागतं. दुकानदार ती देतो. ग्राहक त्याचे पैसे देतो. गिऱ्हाईकानं वस्तू पाहून घेतली, दुकानदारानं गिऱ्हाईकानं दिलेले पैसे पाहून घेतले तरी, घरी आल्यावर ती वस्तू त्याच कंपनीची म्हणजे खरी-ओरिजिनल असेल, याची खात्री ती वापरतानाही त्याला वाटत नाही. अनेकदा तर त्या वस्तूवरचं वेष्टण-रॅपरसुद्धा खरं नाही, स्कॅनिंग करून कॉपी केलेलं आहे, असं लक्षात येतं. मग आतल्या मालाबद्दल न बोललेलंच बरं. असं म्हणावं तर दुसऱ्या बाजूला रात्री गल्ला मोजताना खऱ्या नोटेसारख्या भासणाऱ्या नोटा अशा गिऱ्हाईकांकडून, विक्रीतून आपल्याकडे आलेल्या आहेत, हा अनुभव दुकानदाराला नवीन नाही. अशा अनुभवांची यादी खूप मोठी आहे.

ती स्वीकारण्याची आता एक मनोवृत्तीही तयार झाली आहे. कुणी

कधीतरी झगडतं, सत्य प्रस्थापित करायचा प्रयत्न करतं पण, बाकी सारं जग असे प्रयत्न दुर्लक्षित करून असे व्यवहार उभयपक्षी असंख्य ठिकाणी, असंख्य पातळ्यांवर सुरूच ठेवतं. हे सारे व्यवहार मुळात माणसांकडून आणि माणसांशीच होतात ना ? तो तर निसर्गातला सर्वांत प्रगत घटक आहे-आपल्या अनुभवाप्रमाणंही आणि शास्त्राप्रमाणंही !

साध्या व्यावहारिक बाबतीत प्रामाणिकतेची,सत्याची ही अवस्था असेल तर कोट्यावधी माणसं कोट्यावधी रुपये खर्च करून, आयुष्याचा मोलाचा काळ घालवून जे तथाकथित शिक्षण घेतात, त्याचा उपयोग अहंकार आणि स्वार्थासाठी एकमेकाला फसवण्यातल्या चढाओढीत यशस्वी होणं, एवढाच राहील.

या ठिकाणी दोन गोष्टींची दखल घेणं आवश्यक आहे. एक म्हणजे आजच्या आपल्या शिक्षणात स्वतःची ओळख करून देण्याचा कोणताच विचार नाही का ? तर आहे. पण त्यात ज्या अर्थानं स्वतःची ओळख स्वतःला व्हावी आणि त्यातून विधायक व्यक्तिमत्व घडावं, त्या दिशेचा अभाव आहे. माणसाला स्वतःची जी ओळख करून दिली जाते, त्यासाठी शरीरशास्त्र शिकवलं जातं. त्यातून त्याच्या शरीराची ओळख त्याला होते, त्याचा व्यवहार कसा चालतो, असावा तेही समजावून दिलं जातं आणि स्वतःच्या ओळखीचा हा विषय तिथंच सोडून दिला जातो. मनाच्या व्यापाराचं ज्ञान देणारं हे शास्त्र आजच्या शिक्षणात आहे पण ते कुणी त्या वाटेला पदवीनंतर गेलं तर त्याला मिळतं. जे मिळतं तेही मनोव्यापार जुजबीपणे समजावून देणारं आहे. ते खरे कसे हवे आहेत आणि त्यासाठी काय करावं, याचा त्यात समावेश नाही.

त्यामुळं अशा शिक्षणानं माणसाच्या शरीराचा सांगाडा फारतर धडधाकट होतो पण त्याला स्वतःची ओळख देणारा, त्याच्यातलं देवत्व जागृत करणारा प्राण त्या धडधाकट शरीरात नसतो, अशी अवस्था आहे. म्हणून यातली साधी धडधाकट सुशिक्षित माणसं स्वार्थ आणि देहसुख यापर्यंत जातात तर अधिक धडधाकट सुशिक्षित माणसं जगात त्रास, उपद्रव, विनाश आणि दहशत निर्माण करतात.

दुसरी दखल घेण्यासारखी गोष्ट अशी की, आजच्या लौकिक

शिक्षणानं प्रामाणिकता, कृतज्ञता अशा अनेक गुणांचा विकास आवश्यक असूनही होत नाही, हे काही लोकांना दिसतं आहे. उदाहरणार्थ प्रामाणिकता आणि तिचं महत्त्व. पण ती रुजवण्यासाठी शैक्षणिक, संस्कारमय उपाय योजले जात नाहीत. त्याचं महत्त्व वाटत नाही. उलट ज्या उपाययोजना केल्या जातात त्या माणूस अप्रामाणिकपणे वागल्यावर त्याला कोणती शिक्षा करावी, याचे कायदेकानू करणं, दंडशिक्षा, न्यायालय यंत्रणा अधिक सक्षम करणं - यांचे आहेत. हे म्हणजे रोगाच्या मुळाशी जाऊन तो नाहीसा करण्याऐवजी, त्याच्यावरच्या औषधांची संशोधनं करण्यावर शक्ती आणि पैसा घालवण्यासारखं आहे.

मग आज आपल्याला जगात सगळ्या पातळ्यांवर-अगदी राष्ट्राराष्ट्रांपासून साध्यासाध्या कुटुंबांपर्यंत नांदणारी असुरक्षितता, अशांती, कोर्टकचेऱ्या, घटस्फोट, अधीरता, आपल्यापुरतं पाहण्याची वृत्ती-अशा असंख्य रूपानं असमाधान वावरताना दिसतं. त्याचं महत्त्वाचं कारण, आपण संतांच्या-महाराजांच्या सांगण्याकडं अक्षम्य दुर्लक्ष केलेलं आहे, हे असल्याचं लक्षात येईल.

महाराज म्हणतात, 'माणूस म्हणून जन्मलेला माणूस निदान माणूस म्हणून मेला तर खरा ! ' आपल्याला असं आढळेल की, हे म्हणणं थेट आणि अगदी साधं वाटलं तरी, त्या म्हणण्याला किती शाश्वत आणि वेगवेगळ्या प्रकारचा अर्थ आहे !

पशू फक्त आजच्या त्याच्या स्वार्थाच्या, पोटाच्या, निवाऱ्याच्या चिंतेत आहे. ती चिंता दूर करण्यासाठी तो वाटेल तो संघर्ष करायला तयार आहे. इतर पशूंशी कपटानं, अप्रामाणिकपणानं, क्रौर्यानं, लबाडीनं-कसाही वागायला तयार आहे. वागतोसुद्धा. हेही आपण पाहातो. जो भुकेलेला आहे म्हणून त्याला भाकरी घालावी तो कुत्रा ती भाकरी खाऊन जाताना, अशी भाकरी घालण्याऱ्यावरच भुंकून जाणार नाही किंवा त्यालाच इजा करून जाणार नाही, याची खात्री नसते. पशू त्याच्यासारख्याच दुसऱ्या सजीव पशूचा आपल्या स्वार्थासाठी जीव घ्यायला मागेपुढे पाहत नाही. अनेक पशू रात्री - बेरात्री, इतरांच्या स्वास्थ्याची पर्वा न करता, एकमेकांवरच भुंकून

भुंकून आपला राग, द्वेष प्रस्थापित करतात. जबरदस्त असतो तो विजयी ठरतो. अशी पशुजीवनाची अनेक वैशिष्ट्यं आहेत.

आजच्या माणसांच्या जगाची स्थिती काय आहे ? बोर्डरूमच्या मीटिंगमध्ये संख्येच्या बळावर अचानकपणे एकमेकांचा, ठरवून विश्वासघात केला जातो. आपल्या स्वार्थाला उपयोगी पडणारी व्यक्ती पुढं आणली जाते. आपल्या स्वार्थाला उपयोगी न पडणारी माणसं नियोजनपूर्वक हटवली जातात. आपला जोडीदार आपल्या मनासारखं वागत नाही म्हणून, आपल्या ताब्यात राहात नाही म्हणून - रोज रात्रंदिवस संघर्ष करून आजची अनेक सुशिक्षित जोडपी अस्वास्थ्य निर्माण करतात.

भविष्यकाळातल्या दुष्परिणामांचा विचारही न करता, दोन्ही घरच्यांनी सोसलेली आर्थिक, शारीरिक, मानसिक झळ विचारातही न घेता- आजच्या आपल्या सुखासाठी तत्काळ कोर्टात धाव घेऊन विभक्त होणं पत्करणारे पती-पत्नी आपल्याला भेटतात. अनेकदा जोडीदार वेळेवर घरी आला नाही, लक्षात ठेवून एखादी वस्तू आणली, आपल्या सुखाची एखादी गोष्ट केली नाही - अशा तऱ्हेची तशी क्षुल्लक कारणंसुद्धा माणसांना एवढ्या मोठ्या अविचाराला बळी पडायला पुरेशी ठरताना दिसतात. त्यात दुर्दैव हे की, व्यक्तिस्वातंत्र्याच्या-अहंकाराच्या अशा अनेक चुकीच्या कल्पनांना प्रोत्साहन देणारे अनेकांचे आईवडीलही यात अशा पती-पत्नींना या अविचाराला प्रोत्साहन देतात.

बेकार असताना दारोदार अर्ज करणाऱ्या आणि कोणी उद्योजकानं सहानुभूतीनं नोकरी देऊन चांगल्या जगण्याची संधी दिल्यावर, वेळी स्वार्थासाठी किंवा इतरांच्या हुलकावण्यावर जाऊन, आपल्यालाच रोजीरोटी देणाऱ्या कारखान्याच्या सरळ चाललेल्या कामावर, उद्योगावर उठणारे तथाकथित न्यायप्रेमी कामगार भेटतात. त्याचबरोबर काही उद्योजक नियोजनपूर्वक धंदा तोट्यात आणून त्या नावावर कामगारांना काढून टाकतात. बँकांची थकित देणी बुडवतात. उद्योग बंद करणं कायद्याच्या चौकटीत बसवतात आणि नंतर रिकाम्या झालेल्या उद्योगांच्या मालकीच्या जागा अचाट किंमतीला विकून प्रचंड पैसा कमावतात. तो धंद्यातल्या त्यांना

अनेक वर्षांत होणाऱ्या नफ्यापेक्षा कितीतरी पट जास्त असतो, हे खरं असलं तरी बाकीची सारी सामाजिक नुकसानं करणं ही माणुसकी थोडीच ठरेल ? असे असंख्य लोक आधी सांगितलेल्या पशुजीवनाच्या व्यवहारापेक्षा आपापल्या ठिकाणी वेगळं काय करतात ?

मग वर्षानुवर्षं शाळाशाळांतून मिळणारं शिक्षण, नाना विषयांतल्या पदव्या, माहितीतंत्रज्ञानातलं कौशल्य, जगातल्या अद्ययावत शिक्षणपद्धती, संगणक - अशा साऱ्या माध्यमांतून मिळालेल्या शिक्षणानं नक्की आपल्याला काय दिलं ? आपल्यातला माणूस जागवला, त्याग, प्रेम, सहानुभूती, प्रामाणिक मेहनत अशा गुणांनी ते माणूसपण वाढवलं का ? की त्याच्यातलं स्वतःपुरतं पाहणारं स्वार्थीपण, रोजच्या तात्कालिक सुखासाठी कुठल्याही थराला जाण्याची तयारी, इतरांशी स्वार्थी- अप्रामाणिक व्यवहार, उलट हे सगळं करण्यात धन्यता मानण्याची प्रवृत्ती - असं पशुत्व शिकवलं ? आपला आजचा जगाचा अनुभव तर हे दुसरंच खरं आहे, असं दाखवतो.

म्हणून माणूस म्हणून जन्मलेला माणूस, माणूस म्हणून मेला तर खरा, अशा साध्या म्हणण्यात संतांनी केवढा मोठा संदेश दिलेला आहे आणि तो आजच्या काळाला किती गरजेचा आहे, याची थोडी कल्पना येऊ शकेल. ती कल्पना आली तर सध्याच्या जीवनात माणूस, माणूस म्हणून न जाता शेवटी फारतर इस्टेटी, संचय, संपत्ती, असमाधान, वखवख असलेला पशू म्हणून जातो - असं दिसलं तर त्यात नवल ते काय ? याअर्थानं महाराज म्हणाले, शाळेत पुस्तकं शिकवावी पण त्याचबरोबर माणुसकीही शिकवावी, नीतीही शिकवावी.

या अर्थानं विचार केला तर लक्षात येईल की, सुरुवातीला म्हटलं ती स्वतःची ओळखपत्रं तांत्रिकदृष्ट्या तेवढ्या मर्यादेत गरजेची आहेत खरी. पण जी व्यवहारात अप्रामाणिकतेला आणि अविश्वासाला पर्याय म्हणून वापरावी लागतात, ती सारी ओळखपत्रं हा आपल्या विद्येचा आणि माणुसकीचा पराभव आहे. ते पराभवाचे पुरावे घेऊन फिरण्यात आपल्याला भले धन्यता वाटत असो, जगात त्याची गरज भासत असो, पण ज्याला माणूस, माणुसकी, देवत्व यांचा अर्थ कळला त्याला, आपल्या या तथाकथित

शिक्षणाचा फोलपणा लक्षात येईल. असं फोल शिक्षण घेतलेला माणूस, माणूस म्हणून मरण्यापेक्षा स्वार्थ आणि अहंभाव यांत बुडालेला पशू म्हणून जाणार, हे महाराजांचं म्हणणं किती खरं आहे, ते लक्षात येईल.

त्याचबरोबर हेही लक्षात येईल की, सुरुवातीला पाहिल्याप्रमाणं आपण ज्या अर्थानं स्वतःला ओळखतो, आपली ओळख सांगतो ती किती बाह्यांगाची आणि वरवरची आहे ! आपण जर स्वतःचं अंतरंग शिक्षणानं जाणत नसू, ते अंतरंग पालटण्याची - माणुसकीचं करण्याची विद्या शिकत नसू, त्यासाठी त्याग, प्रेम, निःस्वार्थीपण, कृतज्ञता - अशा देवगुणांचा परिचय आणि आचरण करायला शिकत नसू, तर खऱ्या अर्थानं आपण लौकिकदृष्ट्या कितीही, काहीही शिकलेले असू, माणूस म्हणून आपल्याला साधी स्वतःची ओळखसुद्धा नाही, हे लक्षात घेतलेलं बरं !

ते लक्षात आलं तर खऱ्या अर्थानं माणसाच्या 'शिक्षणा'ला सुरुवात होईल. स्वतःची, स्वतःच्या कुवतींची, देवत्वापर्यंत जाण्याच्या क्षमतेची, त्यासाठी लागणाऱ्या परिश्रमांची कल्पना येईल. माणसाच्या जन्माचं खरं ध्येय लक्षात येईल. हे घडलं तर आपली आपल्याला खरी ओळख होईल.

एखाद्या वस्तूचं किंवा तिच्या वापराचं स्वामित्व आपल्याला मिळवायचं असलं तर, त्या वस्तूची अत्यंत बारकाईनं ओळख करून घ्यावी लागते, तिचा स्वभाव, तिची कार्य करण्याची पद्धत, तिचं नियंत्रण, तिला आवश्यक-योग्य-विधायक वळण देण्याचं ज्ञान आणि क्षमता मिळवावी लागते तर तिचं खऱ्या अर्थानं स्वामित्व मिळवता येतं. मग अशा माणसाला स्वार्थ काय, विकार काय, लोभ काय, कृतघ्नता काय, तात्कालिक फायदे काय - काहीच फरपटत नेऊ शकत नाही, त्या अर्थानं त्याला पशू बनवू शकत नाही. ज्या काही जणांना कळतं पण वळत नाही, अशी स्थिती असते त्यांनासुद्धा स्वतःला वळण देण्याची शक्ती देणाऱ्या, आत्मबल जागृत करणाऱ्या अशा शिक्षणाचं मोल कळू शकेल.

अशीच स्वतःची खरी ओळख देणारं शिक्षण घेतलेला माणूस मनाचा मालक आहे, मालक होऊ शकतो. तो पराधीन नसल्यामुळं पशुत्वाचं

कितीही मोठं आकर्षण त्याला भुलवीत नाही, अस्वास्थ्यात, फसवणुकीत, असमाधानात टाकत नाही.

पारमार्थिकदृष्ट्या विचार केला, तर महाराजांनी सुचवलेला आणखी एक मुद्दा जरूर विचारात घ्यावा. वर सांगितली ती ओळख तर खरी व्हावीच. पण खरंतर आपण कोण आहोत, या ओळखीपेक्षा 'आपण कुणाचे आहोत- अर्थात आपण भगवंताचे आहोत', ही ओळख होण्याची आणि टिकण्याची खरी गरज आहे.

त्या अर्थानं स्वतःची स्वतःला ओळख करून देणारं, स्वतःला स्वतःच्या स्वाधीन ठेवू शकणारं आणि स्वाधीन असल्यामुळं आपल्या जीवनाची गाडी माणुसकीच्याच नव्हे, तर देवत्वाच्या दिशेला हुकमीपणानं नेऊ शकणारं शिक्षण, महाराजांना आणि सर्व संतांना अभिप्रेत आहे. आजच्या शिक्षणात नेमकं तेवढंच कमी आहे !

महाराज म्हणत, खऱ्या शिक्षणानं माणूस, माणूस बनायला, देव बनायला 'स्वतःचा मालक' झाला पाहिजे ! असा स्वतःचा मालकच स्वतः समाधान मिळवील आणि आपल्या सहवासानं ते इतरांनाही देऊ शकेल. आज आपण अनुभवत असलेल्या असंख्य कौटुंबिक, सामाजिक आणि जागतिक प्रश्नांवर मार्ग देणारा महाराजांच्या शाळेतला हा पाठ किती मोलाचा आहे ! महाराज तर पुढं म्हणाले की, अशी स्वतःची ओळख करून देणारं शिक्षण घेणारा, ते आचरणारा स्वतःचा स्वामी होईलच पण समाधानाच्या संदर्भात तो जगाचाही स्वामी होईल !

म्हणून महाराजांना, संतांना आणि परमेश्वराला प्रार्थना आहे की, 'माझी ओळख द्यावी मला' !

* * *

४. कुणी विचार करी ना

असं म्हणणं प्रथमदर्शनी कुणालाही पटणं अवघड आहे. कारण एकतर प्रत्येकजण अनेक गोष्टींचा विचार करतो आहे, अशी प्रत्येकाची समजूत आहे. दुसऱ्या बाजूला हेही आहे की, ज्यांना विचार थांबवायचे आहेत, चांगल्या अर्थानं निर्विचार व्हावं असं वाटतं, विचार थांबवावे असं वाटतं तसे प्रयत्न केले तरी विचार थांबत नाहीत. म्हणून कुणी विचार करीना हे खरं वाटण्याऐवजी सारे विचारच करत आहेत, हे पटणं अधिक स्वाभाविक आहे.

पण अभ्यासाचं पुस्तक तीन तास नुसतं समोर ठेवलं म्हणजे तीन तास अभ्यास झाला, हे म्हणणं ज्या अर्थानं फोल आहे, त्या अर्थानंच थांबवता येत नाहीत म्हणून नुसते विचार करत राहाणं, म्हणजे विचार करणं, विचारी असणं असं समजणं फोल आहे.

मला ज्याचाज्याचा विचार करण्याची खरी गरज आहे, तो जितका आणि जसा करायची गरज आहे, तो कशाचा, किती आणि केव्हा करावा हे शिकून घेण्याची जी गरज आहे, कुठल्या बाबतीत विचार करण्याची गरज नाही-अशा अनेक गोष्टी जर कळल्या नसतील, तर हे नेहमीचं मन सतत विचारात असतं, असं म्हणणं हे तीन तास अभ्यास केला म्हणण्यासारखं आहे ! त्याचा परीक्षेला काही विधायक उपयोगही नाही, अभ्यास केल्याचा भ्रम मात्र आहे, तीन तास त्या अर्थानं वायाच गेलेले आहेत. महाराजांनी ज्या पद्धतीनं, ज्याबद्दल, जसा आणि जेवढा विचार करायला सांगितला आहे, ते लक्षात घेतलं तर आपल्या या विचार करण्याची हीच अवस्था आहे, हे लक्षात येईल. आपलं विचार करणं अनेकदा भरकटणं, अस्वास्थ्य निर्माण करणं, चुकीच्या कृतींना प्रवृत्त होणं, मनुष्यजन्माच्या परीक्षेत पास न होणं आणि त्याअर्थानं तथाकथित अभ्यासामुळं वेळ वाया जावा तसा आयुष्य वाया घालवणं ठरण्याची शक्यता आहे. हे कितपत खरं आहे, हे श्रींच्या उपदेशाच्या प्रकाशातच पाहूया.

काही माणसं सुशिक्षित होतात. अधिक विचार करू शकतात.असे

एक गृहस्थ श्री महाराजांकडं येऊन म्हणाले की, मी कितीतरी वर्षं विचार करून, ग्रंथांचा अभ्यास करून आता निष्कर्षाला आलो आहे की, श्रीकृष्णाचा जन्म नक्की कुठं झाला असला पाहिजे ! महाराजांनी या विचारांच्या कष्टाचं कौतुक केलं. पण जाणीव देताना पुढं हे लक्षात आणून दिलं की, इतकी वर्षं विचार करण्यात घालवल्यावर आपल्याला जे सापडलं आहे, त्याचा आपल्या आयुष्यात मनुष्य म्हणून प्रगती करायला कितीसा उपयोग आहे ?

उत्तर स्पष्ट आहे. उलट आणखीही एक गोष्ट आपल्या लक्षात येईल की, पूर्वी मनुष्य म्हणून स्वतःबद्दल वाटत असलेल्या कल्पनांत आता 'मी कृष्णजन्माचं ठिकाण प्रथम शोधून काढलं,' या आणखी एका अहंभावाचीच भर पडलेली आहे. आपणही कितीतरी गोष्टींचा विचार करतो, अनेक प्रकारचे निष्कर्ष काढतो. त्याबद्दल आपण काहीतरी वेगळं केल्याचं आपल्याला कौतुक वाटतं. इतरांनी त्याबद्दल आपल्याला शाबासकी द्यावी असंही वाटतं. पण जर त्या साऱ्या कष्टांची परिणती, आपली माणूस म्हणून प्रगती होण्यात होत नसेल तर, ते कष्ट भले कितीही मोठे वाटणारे असतील, जग कदाचित त्याचं कौतुकही करील पण प्रगतीच्या दृष्टीनं हा सारा वेळ वायाच गेला आहे. म्हणून आपापल्या विचारांचे विषय तपासल्याशिवाय पुढं जाणं म्हणजे आयुष्य फोल घालवायला सामोरं गेल्यासारखंच आहे.

आज जगात अनेक शास्त्रांची निर्मिती होते आहे. ज्यात प्रगती घडण्यासाठी अगणित माणसांची विचारशक्ती खर्ची पडते आहे. त्यापायी सामान्य गरीबगुरीब माणसांपासून सर्वांचा पैसा आणि शक्ती यांचा व्यय होतो आहे. हे सारं खरं आहे. अगदी उदाहरणानंच पाहायचं झालं, तर गेली पन्नास-पन्नास वर्षं त्यातल्या त्यात जवळ असलेल्या चंद्रापासून अधिकाधिक दूर असलेल्या ग्रहांपर्यंतची माहिती घेण्यावर अगणित माणसांचे विचार, त्यांचा वेळ, श्रम, पैसा खर्ची पडला आहे. आपल्याला मांडता येणार नाही इतकी शून्य लांब असलेल्या एखाद्या ग्रहगोलाचा शोधही त्यातून लागला. सारी सूर्यमाला शोधून संपली. विचार पुढं पुढं सुरू राहिले. सूर्यमालिकांपलीकडं अजून काही आहे, हे सिद्ध झालं. अनेक वर्षांच्या संशोधनानंतर अजून

सूर्यमाला, आकाशगंगा यांचे पुरावे सापडले. त्यापलीकडं शोधताना आता शेवटी या निष्कर्षाला यायला झालं की, 'त्यापलीकडं अजून काही आहे, त्यापलीकडं अजून काही आहे आणि हे प्रकरण काही संपणारं नाही. हे विश्व अंत न लागणारं-अनंत आहे !'

आता या सगळ्या विचारशक्तीच्या वापराचा प्रत्यक्ष करणाऱ्यांना तरी, माणूस म्हणून प्रगती व्हायला नेमका काय उपयोग झाला, याचा खरं विचार करावा लागेल. तीच अवस्था आपल्या अशा अनेक संशोधनांची आहे. आपण मंगळावरून माती आणली. त्याचं जगभर कौतुक आहे. आपण चंद्रावर पाऊल ठेवलं, त्याचंही जगभर कौतुक आहे. आपण आता मंगळावरचं हवामान-पाणी-खड्डे यांचा अभ्यास करणार, विचार करणार, निष्कर्ष काढणार याचंही कौतुक आहे. पण ते वर सांगितल्यासारखं आहे. महाराजांनी कौतुक केलं तसं आहे.

खरंतर विचार करायचाच तर यावर विचार करून पाहावा की, हे ईश्वरनिर्मित विश्व विराट आहे, अनंत आहे हे कळलं, विचार करून कळलं, म्हणून माझी संकुचित वृत्ती थोडीतरी विशाल झाली का ? चंद्रावर पाऊल ठेवण्यासारख्या अशक्य वाटणाऱ्या गोष्टी आपण विचारानं, संशोधनानं साध्य केल्या म्हणून आजवर आपण कधीही केलं नसेल, आटोक्याबाहेर वाटलं असेल, असं एखादं काम-एखाद्या वंचिताच्या, गरीबाच्या घरी मदत करण्यासाठी पाऊल टाकण्याचं काम केलं का ? कुणा दुर्बळाला आधार देण्यासाठी दोन पावलं पुढं झालो का ? परग्रहावरचं हवामान कळलं म्हणून आपण आपल्या हवामानातलं प्रदूषण कमी करण्याच्या काही स्वाधीनच्या कृती केल्या का ? त्याच्या शुद्धीकरणासाठी राबायला लागलो का ? चंद्रावर-मंगळावर संशोधनानंतर काही खड्डे, काही ढीग सापडले म्हणून निदान आपल्या गल्लीतल्या रस्त्यावरचे, मुजवण्याची वाट पाहात असलेले काही खड्डे तरी मुजवले का ? प्रदूषण घडवणारे आणि कुणीतरी हलवण्याची वाट पाहात असलेले कचऱ्याचे ढीग हलवायला, नष्ट करायला प्रवृत्त झालो का?

माणसाला अधिक चांगला माणूस बनवण्यासाठी अशा कृतींना प्रेरणा मिळत नसेल, तशी मनोवृत्ती होत नसेल, तर त्या अर्थानं एवढी

विचारशक्ती आणि श्रमासह झालेला सर्व व्यय हा अपव्यय ठरेल ना ? काही संशोधनं, विचार हे 'संशोधनासाठी संशोधन' अशा स्वरूपाचे असतात, हा विचार ग्राह्य धरला तरी तो फक्त अपवादच. आयुष्यभर आपण करीत असलेल्या विचारांना प्रगतीच्या दृष्टीनं मोल नसेल, तर ते विचारविषय फोलच आहेत. कारण इतका अपव्यय करूनही प्रगती तर सोडाच, मनुष्य आहे तेवढाच लोभी, असमाधानी राहिला आहे.

मग या अर्थानं असे कितीही विषयांवरचे विचार आयुष्यभर जगभर चालत असले तरी, ते करून न केल्यासारखेच आहेत. त्यापेक्षा माझ्या विचाराचा विषय अशा संतांच्या विधायक सांगण्याप्रमाणं मी ठरवला असता, तर अपव्यय तर टळलाच असता पण माझी आणि तितक्या प्रमाणात जगाचीही माणुसकीत, स्वास्थ्यात प्रगती झाली असती.

म्हणून महाराज म्हणतात की, विचार ही मोठी शक्ती आहे खरी पण विचार तलवारीच्या धारेसारखा आहे. सरळ विचार करणं, विधायक विचार करणं, आपल्या आयुष्याचं खरं ध्येय हुडकून काढण्यासाठी विचार करणं, ते अमलात आणण्यासाठी विचार करणं, निःस्वार्थीपणे विचार करणं, भगवंताचा विचार करणं - ही सगळी निर्मळ, सरळ विचाराची लक्षणं आहेत. असा सरळ विचार विधायक ठरतो. माणसाची खरी प्रगती घडवतो.

आपणही विचार केला तर लक्षात येईल की, विचार जसा विधायक करता येतो तसा आपण सावध नसलो तर विघातकही करता येतो. एखाद्याचं दुःख दूर करण्यासाठीही विचार करता येतो आणि एखाद्याला दुःख देण्यासाठीही विचार करता येतो. विचार औषध शोधण्याचाही असतो आणि विष कालवण्याचाही असतो. विचार इतरांच्या अडचणी दूर करण्याचाही असतो आणि इतरांना अडचणी निर्माण करण्याचाही असतो. म्हणून महाराज म्हणतात, विचार ही तलवारीची धार आहे. वापराचं नीट ज्ञान असेल, संतांसारख्यांचं मार्गदर्शन घेतलं असेल तर अज्ञान, अहंकार अशासारख्या आपल्या खऱ्या शत्रूंचा तो विचार नाश करू शकेल, आपलं कल्याण करू शकेल आणि हेच त्याच्या वापराचं, शक्तीचं ज्ञान नसेल, वापरताना भान नसेल, तर उलट आपलीच तलवार आपल्याच पायावर पडून स्वतःला

असमाधानाची इजा करू शकेल. आपलं अकल्याण करू शकेल.

म्हातारपणी अनेकांना एक दुःख असतं की, आपलं कुणी ऐकत नाही. महाराज म्हणाले, विचारच करायचा तर याच्यावर करावा की, कुणाचं तरी मनुष्य ऐकतोच, आपलं का ऐकत नाही ? आपण लहानाचे मोठे झालो, वयस्कर झालो, एवढा अनुभव गाठीशी आला तरी घरातलासुद्धा आपलं ऐकत नाही, याचं कारण तो बरोबर नाही, त्याला इच्छा नाही - असं नसून माझ्याकडून ऐकण्यासारखं, माझ्याकडं काही नाही, हे आहे.

महाराज तर म्हणत, 'मी कसाही असलो तरी माझं ऐकावं' असं म्हणणं या विचारातच चूक आहे आणि तेच या म्हातारपणातल्या दुःखाचं मूळ आहे. माझ्यात जर काही चांगलं नसलं, या वयानं माझ्यात जर काही फारसा चांगला फरक नसला, तर घरातले ते कसं ऐकतील, हे योग्य विचारानं सापडणारं उत्तर आहे.

खरं काम असेल तर ते हे की, मी बेसावधपणानं किंवा हे संतांचं म्हणणं माहीत नसल्यामुळं जे करू शकलो नाही, ते आता तरी करणं आणि आपला उद्धार करून घेणं. इतर लोक आपलं ऐकोत किंवा न ऐकोत. आपला एक भ्रम आहे की, त्यांनी ऐकावं. वास्तविक योग्य विचार केला तर लक्षात येईल की, त्यांनी ऐकावं की नाही, हा माझ्यासमोरचा खरा प्रश्न नसून मी कसं वागावं, हा खरा प्रश्न आहे !

त्यासाठी महाराज म्हणत की, 'आपण कसेही वागलो तरी लोकांनी चांगलं म्हणावं, असं आपल्याला वाटतं, हा आपला भ्रम आपण विचारानं दूर करावा.'

सुखाच्या बाबतीतही महाराजांनी स्वच्छ, सरळ विचार करायला शिकवलं आहे. ते म्हणतात, खरंतर जग हे जर मिश्रणाचं आहे, तर त्यात सुखदुःख राहणारच. माझं ध्येय चुकतं हा विचार करता आला पाहिजे. सुख हे माझं ध्येय नाही. सुखाला दुःख हे प्रतियोगी आहे. लागून आहे. आनंदाला प्रतियोगी नाही. आनंद निखळ आहे. त्यामुळं मिश्रणानं निर्माण झालेलं जग आनंद देऊ शकत नाही, ते सुखदुःख देऊ शकतं. म्हणून माझं ध्येय जर आनंद असेल, तर त्याचा प्रपंचाचाही संबंध नाही आणि जगाचाही संबंध

नाही. प्रपंचात किंवा जगात राहाणं हे सहज आहे, वाट्याला आलेलं आहे. त्याच्यावर आपला आनंद मुळातच अवलंबून नाही. जगात, प्रपंचात राहाण्यानं काहीच बिघडत नाही. प्रपंचाचं किंवा जगाचं होण्यानं मात्र सुखदुःख येतं.

त्यामुळं विचार करायचा झाला तर प्रपंचाचं न होता, त्यात कसं राहाता येईल आणि त्यातली कर्तव्यं कशी करता येतील, याचा करण्याची गरज आहे. त्यांतल्या त्यात इतरांना दुःखदायक गोष्टी टाळणं आणि सुखदायक करणं, एवढाच आपलं प्रपंचातलं सुख टिकवण्याचा किंवा दुःख टाळण्याचा मार्ग आहे. यापेक्षा त्या सुखदुःखाला महत्त्व देण्यात अर्थ नाही. कारण आपलं ध्येय आनंद हे आहे, हे सुखदुःख हे नव्हे. जगात काम करताना ते वाट्याला येत असलं तरी ! मिश्रणानं निर्माण झालेलं जग आनंद देऊ शकत नाही, ते सुखदुःख देऊ शकतं. अनेकदा काही शरीराचं, मनाचं दुःख वाट्याला आलं की, मगच माणूस विचार करायला प्रवृत्त होतो. वास्तविक हे तहान लागल्यावर विहीर खणायला लागण्यासारखं आहे. सुखदुःख हे जर आयुष्याचा अपरिहार्य भागच आहे आणि आपल्याला तर त्यापलीकडचा आनंद मिळवायचा आहे - त्या अर्थानं भगवंत मिळवायचा आहे, तर याचा विचार करण्यासाठी कुठलं दुःख वाट्याला येण्याची काय गरज आहे ?

व्यवहारात वय वाढून नोकरीउद्योग मिळत नाहीसा झाल्यावर कुणी बालवाडीत शिक्षणासाठी प्रवेश घेत नाही. जन्माला आला, शिकण्याएवढं वय झालं की, चौथ्यापाचव्या वर्षी तो बाराखडी शिकायला सुरुवात करतो. पुढं कधीतरी दहापंधरा वर्षांनी वेळ येते त्यावेळेला ते शिक्षण त्याला उपयोगी पडतं. हे माणसाला जर कळत असेल, तो ते करीत असेल, तर जन्माला आल्यावर जन्माला का आलो इथंपासून माझं ध्येय काय आणि ते मला कसं मिळवता येईल, याचं शिक्षण सुरू व्हायला हवं ना ?

मनुष्य गरज असलेल्या कितीतरी गोष्टींचा विचार करीत नाही. याची महाराजांना खंत आहे. लहानपणापासून माणसाला वेगवेगळ्या क्षेत्रातल्या कर्तृत्वाचं शिक्षण दिलं जातं. आपण ते ते कर्तृत्व करू शकू, हा आत्मविश्वासही दिला जातो. हे ठीकच आहे. त्याच्या साहाय्यानं माणूस

शिक्षण, नोकरी, व्यवसाय, प्रपंच अशा गोष्टी करतो. पण ज्यासाठी तो जन्माला आला - तो उद्धार करण्याचं कर्तृत्व त्याला शिकवण्याचा विचार कुणी करतो का, किंवा तो तरी स्वतः करायला प्रवृत्त होतो का ?

माणसाला कर्तृत्व शिकवलं जातं पण त्याचबरोबर मानवी कर्तृत्वाच्या मर्यादा ओळखायला शिकवणं हेही वस्तुनिष्ठच आहे. कारण ते नाही कळलं तर आपल्याकडं अमर्याद कर्तृत्व आहे, अशा भ्रमात तो आयुष्यभर वावरेल आणि स्वतःचं नुकसान करून घेईल. महाराज म्हणत, आपण खऱ्या अर्थानं कर्ते नाहीच. जर आपण खरे कर्ते असतो, तर विचार करावा की, कुणाच्या वाट्याला कधी दुःख आलं असतं का, मनाविरुद्ध घडलं असतं का ? यावर उदाहरण देताना महाराज म्हणतात, 'आपण खरे पूर्ण कर्ते नाही. कारण एकतर आपण शिकतो दुसऱ्याकडून, आपण वाढवले जातो दुसऱ्यांकडून आणि पुढं अशा अनेक गोष्टी आहेत की, ज्या माझ्या स्वाधीन नाहीत उदाहरणार्थ मोठं होणं, दुखण्यातून बरं होणं, नोकरी लागणं, जगणं अशा अनेक गोष्टी माझ्या कर्तृत्वात मोडत नाहीत. मी प्रयत्न करू शकतो पण त्या स्वाधीन नाहीत, हे खरं.' हे विचार जर वेळेत कळलेले असले तर त्यामुळं मनुष्य दुःखात नाउमेद होणार नाही, अकारण अवाजवी आत्मविश्वास बाळगणार नाही आणि येणाऱ्या परिस्थितीला भगवंताची इच्छा म्हणून सामोरं जायला तयार होईल. या विचारांनी माणसाला दुबळेपण येण्याऐवजी उलट परिस्थितीला तोंड देण्याचा समर्थपणा येतो. अविचल राहण्याची शांत वृत्ती विकसित होते.

हीच गोष्ट माणसाच्या आयुष्यातल्या अपूर्णतेची आहे. राजापासून रंकापर्यंत सर्वांचेच प्रपंच अपूर्ण असतात आणि ती वस्तुस्थिती असते. म्हणून तर रंकाला मागावं लागतं यात विशेष नाही, राजालाही कुणाला काही मागावं लागतं. महाराज म्हणत, 'मागणं ही अपूर्णत्वाची खूणच आहे.' त्यात विचार करण्यासारखं हे आहे की, अशी मागितलेली गोष्ट मिळून माणसाचं समाधान होईल, याची खात्री नाही. त्याची त्या त्या वेळची एखादी नड भागेल, अपूर्णता दूर होईल, तेवढ्यापुरतं दुःख कमी होईल. पण अपूर्णत्व हा स्वभाव असल्यामुळं पुन्हा मागणं उत्पन्न होईल आणि अशा मागण्यानं

किंवा त्या मार्गानं त्याला आयुष्यात कधीही समाधान मिळणार नाही. हे विचार माणसाला वेळेत करता आले, तर त्याच्या आयुष्याला किती मोठा स्थैर्याचा पाया मिळेल !

पण असल्या प्रश्नांचा विचार लहान वयात करणं, असंच कुणीतरी 'चुकून' चुकीचं ठरवलं आहे ! महाराजांच्या शाळेतल्या शिक्षणातच ही चूक दुरुस्त होण्याची शक्यता आहे. खरंतर सुखदुःखाकडं बघण्याची, त्यांचं मूल्य ओळखण्याची, कुठल्याही परिस्थितीत आपल्या आनंदाच्या ध्येयाकडं अविरत वाटचाल करीत राहण्याची, त्यासाठी लागणारे विचार करण्याची माणसाला गरज आहे. माणूस विचार करतो आहे पण या विषयांचे विचार मात्र माणसानं दुर्लक्षिले आहेत. इतर असंख्य गोष्टींच्या काळज्या आणि त्यावरचे विचार तो करतो आहे. पण ज्यावरचा विचार त्याला खऱ्या अर्थानं या काळज्यांतून मुक्त करील, नेहमी आनंदात ठेवील ते विचार जर तो करीत नसेल, तर मग हे सगळे आयुष्यभर काळज्या वाढवणारे विचार, हा सारा मानवी शक्तीचा अपव्ययच नाही का ?

त्या अर्थानं 'कुणी विचार करी ना' असं म्हणावं लागतं ! मात्र ज्यांना हे आधी ठाऊक असेल किंवा जे या निमित्तानं कशाचा विचार करावा हे ओळखतील, करतील - ते तरी महाराजांच्या या शाळेत मनुष्य म्हणून एक पायरी पुढं जातील !

* * *

५. प्रपंचाचे रूप दावियेले, सत्य रे !

सामान्य माणसाला प्रपंच ही अत्यंत जवळची, सत्य आणि आवडती वाटणारी गोष्ट आहे. त्याचं बरंचसं आयुष्य हा प्रपंच करण्यात जातं. तरीही प्रपंचाचं खरं स्वरूप आपल्याला कळलं आहे का, असं जर विचारलं, तर मात्र त्याचं उत्तर देणं कठीण आहे. अनेकदा तर प्रपंच केला-झाला पण त्याचं स्वरूप मात्र खऱ्या अर्थानं कळलं नाही, हेच उत्तर बहुतांश लोकांच्याकडून येईल आणि ते प्रामाणिक असेल.

ज्या गोष्टीचं स्वरूप आपल्याला नीट कळलेलं नाही, ती किती वर्षं केली, कशा तऱ्हेची झाली, केवढी लहान किंवा मोठी होती-अशा साऱ्या गोष्टींना फार कमी अर्थ उरतो. कारण जर स्वरूप कळलं असेल, तर ती गोष्ट नीट, आवश्यक तेवढी, गरजेप्रमाणं, तिचं उद्दिष्ट लक्षात ठेवून आणि जास्तीत जास्त चांगल्या तऱ्हेनं करता येईल, हे उघड आहे. पण अशी प्रपंचाच्या अभ्यासाची दृष्टी ना कुणी बाळगीत, ना कुणी शिकवीत. तिची गरजही कुणाला वाटत नाही. खरंतर इतक्या जिव्हाळ्याच्या आणि अपरिहार्य गोष्टीवर कुणी फारसं विचार करीत नसावं, हे जगातल्या आश्चर्यांपैकीच एक आहे. पण संतांनी आणि श्री महाराजांनीही या प्रपंचाचा इतक्या बाजूंनी विचार केला आहे की, एखाद्या पन्नास-साठसाठ वर्षं प्रपंच करणाऱ्या पूर्ण प्रापंचिकानंही कधी केला नसेल ! पण संतांनी तो केल्यामुळं आपलं आयुष्य सफल करू इच्छिणाऱ्याला खूप मोठी संधी मात्र उपलब्ध झाली आहे, हे खरं.

प्रथमदर्शनी कुणालाही प्रपंचाचा काही अभ्यास असतो, किंवा करावा लागतो, त्यामुळं आपल्या आयुष्याचा स्तर बदलतो, अनेक ध्येयं साध्य होऊ शकतात - या साऱ्या गोष्टीच नवीन वाटतील. पण महाराजांचं म्हणणं जर अभ्यासलं, तर मात्र हा अभ्यास आधीच करायला हवा होता, अशी प्रतिक्रिया झाल्याशिवाय राहात नाही. त्या अभ्यासाचा उपयोग करून घेणाऱ्याला फायदा होईल, यात तर शंकाच नाही.

इथं एक गोष्ट प्रथम लक्षात घ्यायला हवी की, प्रत्येकाला आपला प्रपंच वेगळा वाटत असला, त्यात आपला स्वतःचा पुन्हा काही वैशिष्ट्यपूर्ण आहे, असंही वाटत असलं किंवा बाहेरून पाहता राजापासून रंकापर्यंत प्रपंचांचे अनेक प्रकार दिसत असले, तरी मूळ प्रपंच म्हणून वस्तू एकच आहे. दुसरं असं की, अनेक वर्षं तो केल्यानं आपल्याला प्रपंचातलं कळू लागलं असं जे वाटतं, तो बहुधा भ्रम असतो. पूज्य विनोबांच्या शब्दांत सांगायचं तर, घाण्याभोवती अनेक वर्षं फिरल्यानं बैल यंत्रशास्त्रज्ञ होत नाही, तर ते यंत्रशास्त्र शिकणारा, अभ्यासणारा यंत्रशास्त्रज्ञ होतो. नुसतं पाहूनसुद्धा तसं यंत्रही अत्यंत कमी कालावधीत तयार करू शकतो, दुरुस्त करू शकतो.

प्रपंचाचा अभ्यास करताना लक्षात येणारी पहिली गोष्ट ही की, महाराजांनी प्रपंचाला कमी किंवा जास्त असं लेखलेलं नाही, तर त्याचं योग्य मूल्य ओळखावं, यावर भर दिला आहे. सामान्य व्यावहारिक माणसाच्या दृष्टीनं परमार्थ करणं म्हणजे प्रपंच टाकणं, त्याची हेळसांड करणं, त्याकडं दुर्लक्ष करणं-असं असतं. त्यामुळं साध्या भाषेत देवदेव करणाऱ्या लोकांचे प्रपंच बुडतील, अशी त्याला अकारण भीती वाटते. त्यामुळं आपल्याला आवडणाऱ्या किंवा कराव्या लागणाऱ्या प्रपंचाला कमी लेखणारा हा परमार्थ न करण्याकडं त्याचा नकळत कल होतो. पण वस्तुस्थिती तशी नाही.

महाराज म्हणाले, मुळात प्रपंच टाकणंच कुणाला शक्य नाही. उगाच तो टाकतो म्हणण्यातही अर्थ नाही. त्यांचं म्हणणं तर स्पष्ट आहे, 'सामान्य माणसानं प्रपंच टाकला, तर त्यात त्याचं अकल्याणच आहे.'

प्रपंच हा कृतींचा असल्यामुळं, आणि माणसाला सतत कर्मांची, कृतींची सवय आणि गरजही असल्यामुळं, तसा त्या अर्थानं, प्रपंच स्वाभाविकच आहे. आणि अर्थातच तो करण्यानं माणसाचं नुकसान नाही. नुकसान यात आहे की, तो कसा करावा हे न शिकता मनुष्य तो करायला लागतो आणि शेवटी त्यात अडकून बसतो.

मुळात प्रपंचाचं स्वरूप लक्षात येत नाही. ते समजून घेण्याचा

प्रयत्न करावा यावर महाराजांचा भर आहे. प्रपंचातला त्रास पाहता, तो सोडावासा वाटतो, असं होतं खरं. कधी घरातल्या माणसांचा त्रास वाटतो, कधी नातेवाईकांचा वाटतो, कधी परिस्थितीचा वाटतो. अशामुळं प्रपंच सोडण्याकडं एकदम काहींचा कल होतो. पण महाराज म्हणत, 'प्रपंच काही आपण सोडावा म्हणून आपल्या मागं लावलेला नाही. तो आपल्यामागं का लागतो, हे हुडकून काढण्यासाठी त्याचा वापर करावा.'

आपल्यालाच अनेकदा प्रपंचाची, त्यातल्या मोठेपणाची, विकारांची भूल पडते. तो नुसता हवासा वाटत नाही, तर त्याच्याशिवाय आपण राहू शकणार नाही, अशा समजुतीत जगाकडं बघून हा प्रपंच माणूसच वाढवीत नेतो. मग कधीतरी जगानं टीका केली, मोठेपणा दिला नाही, विकारांना शरीर साथ देईनासं झालं की, प्रपंचाच कंटाळा येतो, जगापासून दूर जावं, असं वाटतं. याचं कारण खरंतर महाराज म्हणतात ते आपण विसरून गेलो, हे आहे.

एकतर माझ्या अशाच बेसावध कर्मांचे परिणाम साठून माझ्यामागं हा प्रपंच लागला आहे. त्यातून आत्ताची कर्मं कौशल्यानं कशी करावी,हे शिकून घेणं, हे या प्रपंचातल्या अनुभवातलं-वर्कशॉपमधलं काम आहे. ते लक्षात न घेता आपण जगाच्या मागं जातो, त्याच्या पद्धतींना, मोठेपणाला भुलत जातो आणि असं करता करता प्रपंचातून सुटण्याऐवजी जन्माला आलो त्यावेळी अडकलेलो असतो, त्यापेक्षा जास्त अडकतो. याबद्दल महाराज म्हणतात, संसार जसा सोडण्याकरता लावलेला नाही, तो कर्तव्यं पुरी करून ओलांडून भगवंत मिळवण्यासाठी दिलेला आहे, तसंच हेही लक्षात ठेवण्याची गरज आहे की, 'प्रपंच भगवंताला विसरून जाण्याइतका भोगण्याकरताही लावलेला नाही.' आपलं नुकसान होतं ते अशा तऱ्हेनं भगवंताला विसरून प्रपंचात अडकत जाण्यामुळं आणि आपल्याला अडकवणारे जगाचे - मायेचे मार्ग न ओळखता प्रपंचाचा अतिरेक करण्यानं. म्हणून महाराजांनी प्रपंच सोडण्यावर भर दिला नाही, तर हे स्वरूप ओळखून तो करण्यावर भर दिला आणि म्हणाले की, प्रपंचाचासुद्धा अतिरेक होणार नाही, याची काळजी घ्यावी.

जगाच्या ज्या मोठेपणा देण्याचा इथं उल्लेख केला, त्याच्यात अनेकजण अडकलेले असतात आणि त्यापोटी ते स्वतःचाही प्रपंच वाढवून बसतात आणि जगाचाही. वास्तविक जगानं चांगलं म्हटलं म्हणून आपण एखादी गोष्ट करणं किंवा करीत सुटणं म्हणजे जगाच्या चांगुलपणाला महत्त्व दिल्यासारखं आहे, हे महाराजांनी लक्षात आणून दिलं आहे. त्यांच्या दृष्टीनं जग मोठं म्हणतं पण ते ऐकून घ्यावं, त्याला किंमत देणं खरं नाही. कारण अशी किंमत देणं म्हणजे जगाला सत्यत्व देण्यासारखं आहे. ते आपल्याला मुक्त करण्याऐवजी पुन्हा प्रपंचातच ढकलील. सत्यत्व एक परमात्म्याशिवाय कशालाही नाही. ते असं दुसऱ्या गोष्टीला दिलं की, ते आपला घात करतंच. आपला हा अनुभवही असेल की, जग आज चांगलं म्हणेल, मोठेपणा देईल, तसं ते कधी वाईटही म्हणेल, निंदाही करील त्यामुळं या दोन्ही गोष्टींना आपणच महत्त्व न देणं, हा त्यातून सुटण्याचा मार्ग आहे. त्यातून आपोआपच अकारण वाढणाऱ्या किंवा भगवंताला विसरायला लावणाऱ्या अशा प्रपंचाची वाढ होत नाही. घडतात ती फक्त कर्तव्यं. त्या अर्थानं प्रपंच टाकायचा नसतोच.

यात अशी शंका येण्याची शक्यता आहे की, जग ज्या गोष्टींना मोठं समजतं, उदाहरणार्थ विद्वत्ता, शरीरबळ, पैसा, कलाकौशल्य-या गोष्टींना अर्थच नसतो का ? तर महाराजांचं म्हणणं तसं नाही. आपण जगात राहातो तर जगात ज्या गोष्टी अशा मोठ्या समजल्या जातात, त्या मनुष्यानं त्याच्यात्याच्या कुवतीप्रमाणं जरूर कराव्या. फक्त त्याला भुलून नव्हे. श्रींचं म्हणणं असं की, 'जगातला आपला हा सगळा वावर हा एखाद्या नाटकात भाग घेतल्यासारखा आहे.' ते लक्षात ठेवून ही कामं करीत असावं. विद्वत्ता, सत्ता, पैसा - अशा गोष्टी मिळवाव्यात पण त्या तात्पुरत्या असाव्यात, नाटकातल्यासारख्या असाव्यात. महाराजांचं म्हणणं तर उलटं असं आहे की, 'नाटकात कामच करायचं आहे, तर शिपायाचं का करावं, राजाचंच करावं !' पण महाराज सांगतात ते भान पुढं असणं आवश्यक आहे की, नाटक संपलं की राजानं राजेपण विसरायला हवं आणि शिपायानं शिपाईपण विसरायला हवं. भगवंतापुढं पुन्हा निरागस मूल होऊन जाता आलं पाहिजे, त्याला प्रपंच बाधणार नाही.

प्रपंचाचा अभ्यास करताना, त्याचं सत्य स्वरूप समजून घेताना लक्षात घ्यायची महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आपला स्वतःचा प्रपंच असो किंवा हा आजूबाजूला पसरलेला जगाचा व्यापारपसारा असो - हे सगळं आकाराला आलेलं आहे, दिसतं आहे, हे विसरून चालत नाही. याचा अर्थ असा की, ज्या गोष्टीला आकार येतो तिच्यात काहीतरी मूळ वस्तू असते आणि तिच्यात दुसरं काही मिसळल्याशिवाय तिला आकार येत नाही. माठात मूळ माती असली तरी पाणी मिसळून मगच तिला हळूहळू वाळवून, आकार देऊन माठाचं स्वरूप येतं. आज आपण बाहेर अनेकदा सोन्याचे दागिने पाहातो. ते सोन्याचे असले तरी दागिने बनताना-म्हणजे त्याला आकार येताना त्यात थोडातरी हिणकस धातू घालावा लागतो. त्या मिश्रणानंतरच त्याला दागिन्यांचा आकार येतो. पण हीण मिसळलेलं असलं तरीसुद्धा व्यवहारात आपण त्याला 'सोन्याचा दागिना'च म्हणतो. तसं भगवंताचं मूळ स्वरूप हे निर्गुण आहे, अमूर्त आहे, अत्यंत शुद्ध आहे, हे खरं. पण त्या अमूर्तात मायेची भेसळ झाली तेव्हाच त्याला जगाचा आकार आला. आपण काय, अलीकडचे लोक काय जगजग म्हणतो, ते खरं आहे म्हणतो पण जसा भेसळीचा असला तरी दागिना सोन्याचा असतो हे ओळखलं पाहिजे तसं जगजग म्हटलं तरी ते नुसतं भेसळ केलेल्या जडाचं नसून, मूर्ताचं नसून दागिना सोन्याचा असावा तसं भगवंताचंच आहे. जगाचं हे स्वरूप लक्षात ठेवलं तर तीच अवस्था आपली प्रपंचाबद्दलची आहे. त्यातही भेसळ आहे पण तो मुळात भगवंताचा आहे, हे लक्षात ठेवणं किती गरजेचं आहे ! ते लक्षात ठेवून जो प्रपंच करील त्याचा प्रपंच भगवंताचा असल्यानं त्या प्रपंचाची ठेवण या नेहमीच्या अडकवणाऱ्या प्रपंचापेक्षा नक्कीच वेगळी राहील, विधायक राहील !

प्रपंचातली नेहमीची जी सामान्य तक्रार असते ती इतरांच्या वागण्यामुळं होणाऱ्या त्रासाची असते. वास्तविक माझ्या वाट्याला आलेली कर्मं कौशल्यानं, भगवंताला अपेक्षित अशा पद्धतीनं करून मी प्रपंचापासून बाजूला राहून तो पाहाण्याचं कौशल्य मिळवणं, हे माणसाचं कर्तृत्व आहे. ते कर्तृत्व करायला माणसाला कर्मं आणि कर्तव्यं यांतला फरक नीट स्पष्ट

व्हावा लागतो. तो स्पष्ट करताना महाराज म्हणतात की, कर्माचं कर्तव्य केव्हा होतं तर, आपण दुसऱ्याकरता आपलं असलेलं कर्म केल्यावर त्याच्या संबंधित कर्म त्यानं करावं किंवा आपण कर्म केल्यामुळं त्यानं बरं वागावं, ही इच्छा ठेवली नाही तर होतं. मग कर्माचं कर्तव्य होतं. त्यासाठी हा अभ्यास हवा की, दुसऱ्यानं कसं वागावं हे न ठरवता, मी दुसऱ्याशी कसं वागणं योग्य आहे, हे मला ओळखता यावं आणि त्यानुसार वागता यावं. महाराज म्हणत की, 'फळाची अपेक्षा नसल्यानं दुसरा कसा वागतो, हा प्रश्नच येत नाही आणि कसाही वागला तरी त्या अर्थानं सुखही नाही आणि दुःखही नाही.' मग सुरुवातीला म्हटलेलं तक्रारीचं मोठं कारण मुळातच निघून जातं. अर्थात हा अभ्यास केला तरी तो टिकायला सतत सत्संग, नाम आणि या अभ्यासाची उजळणी - यांची गरज आहे, हे उघड आहे.

यातसुद्धा आपापली कर्तव्यं कळायला अनेकदा आपली मानवी बुद्धी अपुरी पडते. म्हणूनच आयुष्यात कर्तव्य ठरवण्यासाठी खरंतर सुरुवातीपासूनच एकतर माणसाजवळ उत्तम विवेकशक्ती प्रबळ हवी, ते सामान्य प्रापंचिकाच्या दृष्टीनं अवघड आहे. म्हणून महाराजांचा भर यावर आहे की, पहिल्यांदा मोठ्यांचं ऐकण्याचा सराव ठेवावा. त्यातून कर्तव्यं अधिक बरोबर होत जातात, हा सोपा मार्ग चालावा. नंतर मात्र हळूहळू संतांचं किंवा ग्रंथात सांगितलेल्याचं अमलात आणण्याचा, ते ऐकण्याचा अभ्यास करायला सुरुवात करावी. महाराज तर म्हणत की, संतांचं निमूटपणे ऐकण्यात आपलंच हित होतं आणि कर्तव्याचा मार्ग सुगम होतो. यासाठी उदाहरण देताना महाराज म्हणाले की, 'इतक्या प्रश्नांचा उहापोह करणारी एवढी सातशे श्लोकांची गीता 'तू सांगशील तसं करतो', असं अर्जुनानं म्हटल्याबरोबर समाप्त झाली !' ते आपलं आजच्या काळात संतांच्या सांगण्याबद्दल झालं, तर हाच प्रपंच आपोआप कर्तव्याचा होईल, न अडकवणारा होईल आणि मुक्तही करील !

महाराज म्हणाले, जर सगळंच भगवंतानं केलं आहे, तर फक्त परमार्थ त्याचा आणि प्रपंच काही चोराचा नव्हे, तोही भगवंताचाच असला पाहिजे. रोख असा की, भगवंताचा प्रपंच कर्तव्यांचा आहे. आमचा हौसेचा

होतो. कारण आमच्याकडं अभ्यास आणि सावधानता नाही. त्यामुळं खरा कर्ता म्हणून भगवंत आपला प्रपंच करून मोकळा होतो, आनंदात राहातो आणि आपण मात्र कर्तव्य नसलेल्या अनेक गोष्टी माहीत नसल्यानं, हौसेनं, व्याप वाढवण्याच्या आनंदानं करीत सुटतो आणि शेवटी आपल्या व्यापात-प्रपंचात आपणच अडकून बसतो. महाराज म्हणतात, 'प्रापंचिक माणूस तर आपणच व्यूह रचतो, फसतो आणि म्हणतो मात्र दुसऱ्यांनी मला फसवलं, म्हणून मी या प्रपंचात अडकलो.' अभ्यासाची दृष्टी असेल, तर महाराज म्हणतात ते किती खरं आहे आणि आपल्याला ते कसं अमलात आणता येईल, हे नक्की कळू शकेल.

प्रपंचाचा महाराजांनी असंख्य बाजूंनी विचार केला आहे. त्यांतल्या काही बाजू पाहू. शेकडो वर्षं माणसं प्रपंच करीत आहेतच आणि त्याच्याबरोबर त्याची सुखदुःखंही भोगत आहेत. पण विचार केला तर, हे लक्षात येईल की, श्रींच्या म्हणण्याप्रमाणं प्रपंच, प्रपंच म्हणून सुखही देत नाही आणि दुःखही देत नाही. आपल्या तो करताना ज्या अपेक्षा असतात त्यांच्या पुऱ्या होण्या, न होण्यावर, आपल्या मनाला सारखं सुखदुःख होत असतं आणि ते प्रपंचानं दिलं, असं मात्र आपण म्हणतो.

एकदा हे लक्षात आलं तर, सुखदुःखाचं कारण प्रपंच नसून आपल्या अपेक्षा आहेत, तर मग प्रपंचाला नावं ठेवण्याचं कारण नाही. तो टाकण्याचंही कारण नाही आणि मुद्दाम वाढवण्याचंही कारण नाही. महाराज म्हणतात की, एकदा हे अपेक्षांचं गणित लक्षात आलं तर 'प्रपंचात राहिलं तर बाधा नाही कारण मग प्रपंचात राहूनही न राहिल्यासारखं होईल.'

मनुष्य आयुष्यभर प्रपंचासाठी कष्ट घेतो, राबतो यात दुमत नाही. स्वतःचा, स्वतःवर अवलंबून असलेल्या माणसांचा एवढा व्याप सांभाळायचा म्हणजे त्याला तसा पर्यायही नाही. पण अभ्यासाची दृष्टी नसल्यामुळं एखाद्या अशिक्षित कामगारानं कारखान्यात कामाचे ढीग उचलावेत किंवा मजुरानं मजुरीनं दगडमाती इकडची तिकडं आणि तिकडची इकडं टाकावी आणि जे काही चाललं आहे, त्यातलं काही मात्र त्याला कळत नसावं, तशी अवस्था होते. म्हणून अनेकांच्या प्रपंचात फक्त पोटापाण्याची, सुखदुःख

देणाऱ्या मुला - बाळांची, नातेवाईकांची-अशी मजुरी त्यांच्या हाती पडते पण समाधान काही लाभत नाही.

म्हणून खरंतर ज्याला अभ्यासानं प्रपंच करायचा आहे, त्याला तो कशासाठी करायचा आहे, याचा हेतू माहीत असावा तर, त्याला कष्ट करतानासुद्धा सावध राहाता येईल, अनावश्यक कष्ट टाळता येतील आणि जे साध्य करायचं ते समाधानही साध्य करता येईल. म्हणून महाराजांचं म्हणणं आहे की, सर्व जीवनाचे, प्रपंचाचे कष्ट कशाकरता करायचे ते माहिती पाहिजे. प्रपंचाचा हेतूसुद्धा माणसाला समाधान, आनंद गाठून देणं हा आहे. ते समाधान भगवंताजवळ असतं, तो भगवंत मिळवण्यासाठी हे सारे प्रपंचाचे कष्ट आहेत. याचं भान ज्याला येईल त्याच्या कष्टांना दिशा राहील, मर्यादा राहील, कष्टांचं प्रमाणही कमी राहील आणि जे ध्येय साध्य करायचं त्यासाठी करायच्या गोष्टींनाही त्यात स्थान राहील.

त्यासाठी हे लक्षात ठेवणं अत्यंत आवश्यक आहे की, परमार्थाच्या रूढ कल्पना थोड्या तपासून घ्यायला हव्या. भजनपूजन, पाठपारायण, तीर्थयात्रा-अशा अनेक गोष्टी परंपरेनं पारमार्थिक मानल्या गेल्या आहेत. त्या तशी मदत करतीलही. पण खरा परमार्थ महाराज म्हणतात त्याप्रमाणं, 'वृत्ती बनवण्यात आहे.'

प्रपंचाकडं बघण्याची ही दृष्टी आली की, मग प्रपंच हा अडथळा नसून परमार्थाकडं जाण्याचा साधासोपा मार्ग आहे, हे लक्षात येईल. महाराजांनी या दोन्ही गोष्टींची अप्रतिम सांगड घातली आहे. त्यांचं म्हणणं असं की, परमार्थ वृत्ती बनवण्यात आहे. ती बनवण्यासाठी कृतीत सावधानता लागते. प्रपंच कृतींचा आहे. त्यामुळं त्याच कृती आपलं ध्येय लक्षात ठेवून जर करता आल्या तर त्यातून समाधान देणारी परमार्थाची वृत्ती बनवणं उलट सहज शक्य होईल. म्हणून ते म्हणाले की, 'परमार्थ ही वृत्ती आहे, प्रपंच ही कृती आहे, दोन्हींचा योग्य मेळ जर अभ्यासानं घालता आला, तर प्रपंच आणि परमार्थ या दोन गोष्टी वेगळ्या न उरता त्यात एक संयोग येतो, सहजता येते, आनंददायी एकपण येतं.'

यासाठी ज्या अनेक गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात त्यातल्या काही

अशा की, माणसाला जगायचं तर रोज अन्न मिळवावंही लागेल, बनवावंही लागेल, खावंही लागेल. ते करण्यात जो प्रपंच घडेल तो परमार्थाला पूरकच आहे. पण माणसाच्या मनाला असल्या कृतींची स्वाभाविक आवड असल्यामुळं, गरजेपुरता पैसा मिळवताना हळूहळू त्याचं व्यसन लागावं,तशी या सगळ्या प्रपंचातल्या गोष्टींची अवस्था होते. अभ्यास नसल्यामुळं आणि बेसावधता असल्यामुळं या गोष्टी हळूहळू वाढत जाऊन मूळ ध्येयाचं नुकसान कधी करतात, हे कळतही नाही.

म्हणजे असं, गरजेला अन्न हवं, त्यासाठी कराव्या लागणाऱ्या कृती म्हणजे प्रपंच. पण हे अन्न मिळवताना किंवा खाताना त्याची चव लागली, तर हळूहळू चवीत फरक हवासा वाटतो. मग तो करण्यासाठी जास्त वस्तू लागतात. अर्थात त्या आणण्यासाठी जास्त वेळ लागतो, त्या घेण्यासाठी जास्त पैसा लागतो. तो जास्त पैसा मिळवण्यासाठी आधी जास्त कष्ट करावे लागतात आणि नकळत जादा पैसा सरळ न मिळाला तर तो चुकीच्या मार्गानं मिळाला तरी चालेल, असंही वाटायला लागतं. मूळ गरजेच्या एका जेवणापासून माणसाचा अंतिमतः घात करणारी ही फरपट कशी होत जाते, हे सावध माणसालाच कळू शकेल. म्हणून तर अगणित माणसं प्रपंच करत असूनही, त्याचं जे ध्येय, त्या समाधानापर्यंत पोचलेले कमीच का दिसतात, हे लक्षात येतं !

काहींच्याकडून हे लक्षात आल्यावर एकदम प्रपंचाला, संबंधांना, वस्तूंना आवर घालण्याचे थोडे घाईघाईचे प्रयत्न सुरू होतात. त्याबद्दलही महाराज आपल्याला सावध करतात. ते म्हणतात की, प्रपंचात अनेक माणसांशी वेगवेगळ्या पायऱ्यांवर आपला संबंध येतो. ज्याचा जसा संबंध असेल, येईल त्यानुसार त्याच्याशी व्यवहार पाळलाच पाहिजे. कारण या संबंधालाही एका बाजूनं आपलं प्रारब्ध कारणीभूत असतं. ते या प्रपंचाच्या निमित्तानं पुरं करून फेडता येतं. व्यवहार सोडला तर या एका फायद्याला आपण मुकतो. दुसरं असं की, प्रपंचात जे जे आपल्या संपर्कात येईल त्याच्या निमित्तानं भगवंतच आपल्या संबंधात येत असतो. तो त्या रूपानं आपल्याला भेटतो, काही शिकवतोही. आपण जर घाईघाईनं जरूरीचा

प्रपंचसुद्धा तोडायचा प्रयत्न केला , तर याही फायद्याला आपण मुकण्याची शक्यता असते. म्हणून प्रपंच करण्याच्या बाजूनं किंवा तो आटोक्यात ठेवण्याच्या बाजूनं-दोन्ही बाजूंना आततायीपणा करू नये,असं महाराजांचं म्हणणं होतं.

तीच गोष्ट प्रपंचात उपासनेला द्यायच्या काही वेळाची. आपलं ध्येय भगवंत असल्यामुळं त्यासाठी कोणाच्याही प्रपंचात थोडातरी वेळ असा देवासाठी ठेवलेला हवा. त्यात बाराबारा, सोळासोळा तास नोकरीचं काम करावं लागतं. कुणाच्या प्रपंचात माणसं जास्त असतात म्हणून रात्रंदिवस राबावं लागतं - अशा अनेक अडचणी सामान्य माणसाला रास्त वाटतात. मोठमोठी सुशिक्षित माणसंही या अडचणींमुळं मला दिवसात देवाला द्यायला वेळ नाही, असं म्हणणं रास्त समजतात. या सर्वांची अशी कल्पनाही असते की, या अडचणी जरा मागं पडल्या म्हणजे मी देवाला वेळ देईन. त्याबद्दल सावध करताना महाराज स्पष्ट म्हणतात की, 'अडचण नाहीशी झाली की, मग भगवंताची उपासना करीन असं जो म्हणेल, त्याला कायमचंच थांबावं लागेल !'

काही माणसांना स्वभावाची ठेवण म्हणून किंवा व्याप वाढल्यास तो भगवंताच्या आड येईल म्हणून प्रपंच अगदी कमीत कमी ठेवावा, असं वाटतं. विशेषतः काहींची भूमिका तर आम्ही कुणाकडं जाणार नाही आणि आम्ही कुणाला बोलवणार नाही, इथपर्यंत ताणलेली असते. वरवर पाहाता, यामुळं हित होईल असं वाटतंसुद्धा. कारण आपला जाण्या-येण्यातला वेळ वाचेल. संबंध, वस्तू, देणंघेणं अशा अनेक गोष्टी कमी होतील. तेच दुसऱ्या बाजूला आपल्याकडं कुणी न आल्यामुळं त्या मार्गानंही साधेल असं वाटतं. पण याबद्दल सावध करताना महाराज म्हणतात, 'आपलं घर आल्या-गेलेल्याचं असावं. खेळीमेळीनं राहावं.'

हे म्हणणं वरवर थोडं अघळपघळपणाचं वाटलं, तरी त्यात प्रपंचात जो परमार्थ साधायचा आहे, आनंद मिळवायचा आहे, भगवंत मिळवायचा आहे-त्याची बीजं दडलेली आहेत. मुळात उगीच कुणाकडं कुणी येत नाही. नुसतं खाणंपिणं ठेवून ती गोष्ट एखाददुसऱ्या वेळेला साध्य होईल. पण

माणूस आपण होऊन सतत येत राहायला - आपली वृत्ती सेवेची लागते, आपण जगाच्या उपयोगी पडण्यासारखं आपल्याला काहीतरी मिळवावं लागतं, त्यासाठी कष्ट घ्यावे लागतात, शिवाय त्याचा लाभ दुसऱ्यांना देण्याची मोकळी वृत्ती लागते, निरहंकार असावं लागतं, निरपेक्ष असावं लागतं, तर माणसं आपण होऊन सतत येत राहातात. मग ते घर आल्या-गेल्याचं होतं. आता ते करताना परमार्थातल्या आत्ता उल्लेख केलेल्या गोष्टी आपोआप साध्य होतात आणि अमलातही येतात.

प्रपंचाचा अभ्यास करताना किंवा त्याचं स्वरूप ओळखताना जाणण्याची महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याची अपूर्णता. श्रीमंताकडं अमाप पैसा असेल पण मूलबाळ नसेल, कुणाच्या घरी मुलंबाळं असतील पण नोकरी बेताची असेल, कुणाला पैसा, मुलं अनुकूल असतील पण शरीरप्रकृती अनुकूल नसेल, कुणाला घरदार असेल पण त्याच्या वादांसाठी कोर्टकचेऱ्यांनी हैराण व्हावं लागत असेल - अगदी राजाचा प्रपंच झाला तरी काहीतरी उणीव ही राहीलच, हा प्रपंचाचा स्वभाव आहे. एकदा अभ्यासानं हे लक्षात आलं, प्रपंचाचं स्वरूप कळलं की, हे नाही-ते नाही अशा तक्रारी कमी होतात, अस्वास्थ्य कमी होतं.

त्याच्याच बरोबर दुसऱ्या बाजूला हेही लक्षात येतं की, अशा अगणित कृती करीत राहिलं तरी जो प्रपंच पूर्ण होत नाही, तो कुणाचाच, कुठल्याही कृतींनी, कधीच पूर्ण होणार नाही, समाधान देणार नाही. त्यासाठी याच प्रपंचात जो पूर्ण आहे-भगवंत आहे त्याला आणण्याची म्हणजे त्याचे गुण आपल्या वृत्तीत आणण्याची तयारी ठेवली, तसे प्रयत्न करीत राहिलं, तरच या प्रपंचात समाधान येईल, वाढत राहील. त्यासाठी कृती करताना भगवंताचं स्मरण, त्याच्या गुणांचं - निस्वार्थीपणा, निर्लोभता, प्रामाणिकता, निरपेक्षता - यांचं स्मरण आणि अंमल करता आला, तर आपल्याच कृती नुसत्या प्रापंचिक न राहाता समाधान देणाऱ्या ठरतील. मात्र कृती करताना हे टिकवायला लागणारी सावधानता महाराजांच्या या शाळेतल्या अभ्यासानंच येईल.

प्रपंचाचं स्वरूप समजून घेताना समोर येणारं आणखी एक सत्य

म्हणजे माणसाच्या चित्ताला रोजची असलेली काळजी, एक प्रकारचं भय, त्यातून अस्वास्थ्यही. कधीतरी जाणारे शांततेचे-स्वास्थ्याचे तीनचार दिवस सोडले, तर आपल्या प्रपंचात किंवा आपल्याशी संबंधित बाहेरच्या जगात काहीना काही घडामोडी, अप्रिय गोष्टी, त्रासदायक घटना, अपघात, मृत्यू, अपमृत्यू-अशा अनेक बाबी माणसाच्या वाट्याला येतात. त्यामुळं अनेकांचे प्रपंच हे अनेकदा समुद्रावर नावेनं हेलकावे खावेत तसे मनाला सतत अस्थिर ठेवणारे ठरत असतात.

पण अशावेळी महाराजांचं याबद्दलचं म्हणणं लक्षात ठेवावं, असंच आहे. त्यांनी प्रपंचाचं सत्य स्वरूप ओळखलेलं असल्यामुळं ते म्हणतात की, एकतर घडामोड हा जगाचा स्वभाव आहे. कुठल्या तरी रूपानं रोज काहीतरी आकाराला येणं म्हणजेच दुसऱ्या बाजूला काहीतरी मोडामोड होणं, कमीजास्त होणं. सतत असमान असलेल्या तराजूच्या पारड्यात जसं कधी डावं खाली जातं, त्यावेळेला त्यात काहीतरी जास्त पडतं, पण तेव्हा उजवं वर जातं. तेच उजव्यात काहीतरी जास्त पडतं, त्यावेळी ते खाली जातं, पण डाव्यात काही कमी होतं आणि ते वर जातं. त्याअर्थानं ही प्रपंचाची पारडी कधी समान राहात नाहीत, स्वाभाविकपणे स्वास्थ्य त्याअर्थानं राहात नाही.

ते तसं राहणार नाही, हे एकदा लक्षात आलं की मग, जसा एखादा त्याच्या स्वभावाप्रमाणं वागला आणि आपल्याला त्याचा परिचय असला तर, स्वभाव म्हणून ती गोष्ट सोडून देण्याची आपली तयारी होते आणि आपण आपल्या कामाला लागतो, तसं या प्रपंचातल्या घडामोडींकडं एकदा स्वभाव म्हणून बघण्याची वृत्ती आली की तसं होतं आणि साध्या भाषेत आपण मोकळे होतो, नामाला लागतो.

तेच काळजी, भयाबद्दल आहे. अनेकांचा वेळ त्यावर विचार करण्यात जात असतो, त्यानं अस्वस्थ होण्यात जात असतो आणि तटस्थपणे पाहिलं, तर त्याचा काही उपयोगही नसतो. मग त्याबद्दल महाराज जे म्हणाले, 'काहीही झालं तरी घाबरू नये. चढ-उतार चालायचेच !' त्या म्हणण्यातलं सत्यत्व आणि उपयोग कळेल.

प्रपंचातली आणखी एक सावधानतेची महत्त्वाची गोष्ट महाराजांनी

सांगितली आहे. आपणही पाहतो की, चालत जाताना एकमेकांची चौकशी करत जाणारा, एकमेकांच्या जाण्यायेण्याची दखल घेत जाणारा माणूस परिस्थितीनं श्रीमंत झाला, गाडीतून फिरायला लागला की, त्याच माणसांकडं बघण्याची त्याची दृष्टी बदलते. चौकशी तर सोडाच पण रिकाम्या गाडीतसुद्धा कुणाला घेण्याचं भान त्याला उरत नाही. इतरांबद्दल आधी असलेली मैत्री-सहानुभूती या गोष्टी जाऊन उलट, श्रीमंतीच्या मनातल्या नकळत असलेल्या तोऱ्यात तो त्यांच्याकडं तुच्छतेनं पाहात पुढं जातो. तीच गोष्ट रूप असलं की होते, सत्ता आली की होते, विद्वत्ता आली की होते, कुठं मानमान्यता मिळाली की होते.

यानं खरंतर आपलं स्वतःचंच नुकसान होत असतं, याची प्रपंचातल्या या सुबत्तेत, अनुकूलतांत जाणीवही राहात नाही. ते सारं आपण स्वतः जणु कष्टानंच मिळवलं आहे, या अहंकारात भगवंताचा विसर तर कधीच पडतो. अर्थातच प्रपंचाचं मूळ ध्येय गायब होतं. वस्तुतः या साऱ्या गोष्टी अशाश्वत आहेत, याबद्दलही बेसावध व्हायला होतं. परिस्थितीचा एक फटकारा राजाचा रंक करतो, रूप उतरून जातं, प्रतिष्ठेची अप्रतिष्ठा होते, मग गोळा झालेली माणसं पांगून जातात. हे खरंतर माणूस पाहात असतो. पण त्याची त्याला जाणीव राहात नाही. हाच प्रपंचातला भ्रम आहे.

जग मात्र अशा सुबत्तेला, समृद्धीला महत्त्व देत असल्यामुळं जग त्याचं कौतुक करतं. असा प्रपंच चांगला आहे, असं ठरवतं. त्यामुळं सामान्य माणूस अधिकच बेसावध होतो. म्हणून महाराज सावध करून म्हणत की, प्रपंचाचा मद असतो, हे लक्षात ठेवावं. त्याअर्थानं वर पाहिलं तसा जगानं चांगला ठरवलेला प्रपंच, महाराजांच्या दृष्टीनं जास्त मद-अहंकार निर्माण करायला कारणीभूत ठरतो, याबद्दल प्रापंचिकानं सावधच राहिलेलं बरं. महाराज म्हणत, 'लौकिकदृष्ट्या जितका प्रपंच चांगला तितका मद अधिक.' भगवंताच्या कृपेनं परिस्थितीची अशी वेगवेगळ्या बाबतीतली अनुकूलता जरी कुणाच्या वाट्याला आली, तरी सावधान राहून त्यामागची कृपा आणि त्याचबरोबर होऊ शकणारी आपली परीक्षा लक्षात ठेवून जर मनुष्य प्रपंच करील, तर त्याला हा मद बाधणार नाही.

ज्यांना देवाचं थोडंफार महत्त्व कळलेलं आहे, अशा माणसांच्या प्रपंचात जे देवाचं स्थान असतं, त्याबद्दलही थोडा अभ्यास करण्याची गरज आहे. यातल्या अनेकांना आपल्या प्रपंचात देव हवा असतो, पण तो त्यांच्या प्रपंचासाठी, त्यातल्या अडचणी दूर करण्यासाठी हवा असतो. त्यातसुद्धा त्यांचा पहिला विश्वास देवावर नसतो. स्वतःचं कर्तृत्व, ओळखीची माणसं, पैसा, सत्ता - अशा साऱ्या गोष्टींनी हरलं की मग, त्यांची देवाकडं धाव सुरू होते. यात देवाला असलेलं स्थान स्पष्ट आहे. म्हणून अशा माणसांच्या दिनक्रमात देवाचं स्थान किंवा त्याला द्यायचा वेळ सर्वांत शेवटी आणि उरला तर असतो. हे काही खऱ्या प्रपंचाचं लक्षण नाही. वास्तविक प्रपंचच देवावर सोपवून आणि त्याच्या इच्छेनं करण्याचा आहे. तो तसा केला आणि फळाच्या बाबतीत वृत्ती शांत ठेवली तर समाधान मिळतं. प्रपंच यशस्वी झाला की नाही याबद्दल, त्याअर्थानं महाराज म्हणतात की,'समाधान टिकलं तर प्रपंच नीट झाला, असं समजावं.'

महाराजांच्या सांगण्यातल्या आणखी एकदोन महत्त्वाच्या गोष्टी पाहाणं प्रपंचाच्या अभ्यासाला उपयोगी ठरेल. प्रपंचातली आणखी एक सावध राहाण्यासारखी गोष्ट म्हणजे प्रपंचाची लागणारी सवय. ती नुसत्या प्रपंचाचीच नसते, तर त्यात हळूहळू निर्माण होत जाणाऱ्या कर्तृत्वाची, त्यामुळं येणाऱ्या अनुभवाचीही असते. लहानपणी प्रपंचात माणसाला वेगवेगळ्या कर्तव्यांत, कामांत, व्यवहारांत लक्ष घालायला शिकवावं लागतं. अनेक गोष्टी त्याला शिकून घ्याव्या लागतात. थोरली भावंडं, मोठी माणसं यांच्याशी कसं राहावं, इथपासून ते आपल्या मुलांना सांभाळणं, वाढवणं, मोठं करणं इथपर्यंत. हे करताना ज्याच्यात्याच्या कुवतीप्रमाणं त्याला ते जमत जातं. त्यात्या प्रमाणात तो यशस्वी होतो.

यश कमीजास्त कितीही असो, त्यातून एक सवय नकळत दृढमूल होते ती म्हणजे, सगळ्या गोष्टीत लक्ष घालण्याची. त्यात्या गोष्टी आपल्या मनाप्रमाणं घडवून घेण्याची. हे सारं तरुणपणचा-प्रौढपणचा काळ असतो तोपर्यंत गरजेचं असतं, ठीक असतं. पण महाराज लक्षात आणून देतात की, इथपर्यंतचं ठीक असलं तरी लक्ष घालण्याच्या आणि स्वतःच्या

कल्पनांप्रमाणं ते घडवण्याच्या नकळत लागणाऱ्या सवयींबद्दल प्रपंचात सावधान राहाणंच चांगलं.

कारण असं की, अनेक घरांमध्ये अशी लक्ष घालणारी आणि आपल्या मनासारखं होण्यासाठी हट्ट धरणारी म्हातारी माणसं, हा एक मोठा अस्वास्थ्याचा विषय असतो. त्यांच्या त्या सवयींपोटी ती स्वतःही असमाधानात असतात आणि इतर पुढच्या कर्तृत्ववान पिढीलाही असमाधानात ठेवतात. म्हणून याबद्दल सांगताना महाराज म्हणाले की, 'वय झाल्यावर प्रपंचात मुळीच लक्ष घालू नये.' नातवंडांचं पहायला मुलं असल्यावर किंवा स्वयंपाकाचं पाहायला सून हजर असल्यावर, मोठ्यांनी जर हे महाराजांचं म्हणणं लक्षात घेतलं आणि निदान गरज नसताना मनानं बाजूला राहायचं ठरवलं, तर ते उभयताना प्रपंचात सुखाचंच होईल. त्यासाठी महाराजांचं आणखी एक उदाहरण जरूर लक्षात ठेवण्यासारखं आहे, ते म्हणजे, 'ओलं धोतर पडतं तसं रहावं.' हे म्हणणंही स्वतःला समाधानात ठेवणारं आहे, तसंच घरच्यांनाही.

प्रपंचाचं आणि परमार्थाचं खरं स्वरूप ज्यांनी अभ्यासलं त्यांच्या लक्षात येईल की, प्रपंचाला असत्य म्हणणं चुकीचं होईल. जरी त्यात भ्रम असला, त्याची भूल पडत असली तरी महाराज म्हणतात त्याप्रमाणं, 'प्रपंच हा सर्वस्वी सत्य नाही, तसा तो असत्यही नाही.'

आपल्याला देह खरा वाटतो, तहानभूक लागते, अन्नपाण्यानं ती शमते-तसा अनुभव येतो तोपर्यंत प्रपंच सत्यच आहे. फक्त तो पुरा करण्याचा आटापिटा करणं, तेच माझ्या आयुष्याचं ध्येय आहे असं वाटू लागणं असं झालं की, तोच प्रपंच असत्य ठरतो. कारण ही कधीच शक्य न होणारी गोष्ट आहे. प्रपंच साधन म्हणून सत्य आहे, तर साध्य म्हणून असत्य आहे.आपण रस्ता चालतो तो गावी पोचण्यासाठी.म्हटलं तर गावी पोचण्यासाठी रस्त्याला सत्यत्व जरूर आहे. त्यानंच गावाला पोचता येतं. पण असं आहे आणि त्यातही रस्ता चांगला आहे, रस्त्याला दुतर्फा झाडं आहेत, आजूबाजूला हिरवळ आहे-असल्या काही कारणांनी रस्ताच आवडू शकतो. कधीकधी तर त्या रस्त्यानं आपल्याला मुक्काम गाठता आला म्हणून रस्त्याचंच प्रेम

लागू शकतं. म्हणून जर कुणी रस्त्यातच विसावला, गावी पोचला नाही तर तो प्रवास फोल ठरतो, असत्य ठरतो. तीच अवस्था प्रपंचाची आहे. त्या अर्थानं तो असत्य आहे.

उलट ज्याला गावी जाण्याचं भान आणि जाण्याची निकड कळलेली आहे, तो उलट रस्ता लवकरात लवकर चालून आपलं गाव गाठण्याचा प्रयत्न करतो. तीच भूमिका प्रपंचाबद्दलही बाळगता येते आणि ती हिताचीही आहे. रस्ताही सत्य आहे आणि गावही सत्य आहे. त्यातल्या त्यात, गावी जाईपर्यंत रस्ता सत्य आणि गावी पोचल्यावर रस्ता असत्य आहे. तसाच हा प्रपंच परमार्थाला नेईपर्यंत सत्य, तर तो गाठून दिल्यावर असत्य मानला तरी चालण्यासारखा आहे.

प्रपंचाबद्दलच्या अभ्यासात महाराजांच्या शाळेत शिकण्यासारखा एक शेवटचा सोपा धडा आहे. पूर्वीच्या तुलनेनं आज बऱ्याच प्रपंचांत अनेक प्रकारची अनुकूलता आहे. प्रपंचाला पुरेसं न मिळणारे, प्रतिकूलतेत वावरणारे लोक पुष्कळ आहेत, ही वस्तुस्थिती असली तरी महाराजांचं म्हणणं विचारात घेण्यासारखं आहे. ते म्हणतात, 'निदान ज्याला प्रपंचाला पुरेसं मिळतं आहे, त्यानं तरी आणखी हाव न बाळगता, आहे त्या परिस्थितीत समाधान मानून आपलं लक्ष भगवंताकडं वळवलं, आपला काळ नामात घालवला, तर जगातला द्वेष, मत्सर, लोभ आणि क्षोभ पुष्कळ कमी होतील आणि सामान्य मनुष्य सुखी राहील.'

आपल्या प्रपंचाबरोबर इतर वंचितांचे प्रपंच सहजपणे सुखी करणारा इतका सोपा, व्यवहार्य मार्ग लक्षात ठेवला, तर प्रपंचाचं सत्यस्वरूप समजून घेण्याचा हा अंतिम आणि मोलाचा लाभ राहील !

* * *

६. पैसा मानवाचा दास

सामान्य-असामान्य अशा सर्वसाधारण माणसांच्या जिव्हाळ्याचा मोठा विषय म्हणजे पैसा. एकाकडं असलेली काही वस्तू, कौशल्यं आणि त्याच्याकडं नसलेल्या पण त्याला गरजेच्या असलेल्या काही वस्तू, सुखसोयी, साधनं यांची उणीव आणि त्याचबरोबर दुसऱ्याकडं अशाच तऱ्हेनं वेगळ्या असलेल्या काही वस्तू, कौशल्यं आणि त्याच्याकडं नसलेल्या पण त्याला गरजेच्या असलेल्या काही वस्तू, सुखसोयी, साधनं - या एकमेकांना देणं आणि एकमेकांच्या उणिवा पुऱ्या करणं आणि आपल्याकडं असलेल्या गोष्टींचा योग्य विनियोग करणं, हा खरा मूळ सामाजिक जीवनव्यवहार आहे.

तो जोपर्यंत याच पद्धतीनं प्रामाणिकपणे पुरा होत होता, तोपर्यंत तो नैसर्गिक होता, सहज होता, फार गुंतागुंत निर्माण न करणारा होता. या साऱ्यात एकाकडं असलेल्या आणि दुसऱ्याकडं नसलेल्या पण एकूण सर्वांच्या जीवनाला गरजेच्या असलेल्या वस्तू मुळात निसर्गनिर्मित होत्या किंवा कौशल्यं मनुष्यानं मिळवलेली असली तरी तीही त्या अर्थानं नैसर्गिकच होती. त्यामुळं त्या व्यवहाराला अस्वास्थ्य आणि गुंतागुंत यांचा कमी स्पर्श होता. उलट आपुलकी, माणुसकी, त्याग, वेळेला धावून जाण्याची प्रवृत्ती - अशा माणसांना जवळ आणणाऱ्या अनेक गोष्टींचा वावर समाजात होता. त्यामुळं लोभ, क्षोभही कमी होते. या सगळ्या व्यवस्थेमध्ये पूर्वी पैशाच्या जागी संचयाला सोनंनाणं, नंतरच्या काळात निघालेले सोन्याचांदीचे रुपये अशा काही गोष्टी होत्या. पण त्यांचा वापर राजेरजवाडे किंवा काही विशिष्ट व्यवहार एवढ्यापुरताच होता.

माणसाच्या शरीरकष्टांना, त्याला जरूर असलेल्या धान्याचं मूल्य होतं.धान्याला, घाणीवरच्या तेलाचं मूल्य होतं. एकमेकांच्या मदतीला धावून जाणाऱ्यांना, केळीच्या घडांचं मूल्य होतं, कृतज्ञतेला, अखेर श्रीफळाचं

मूल्य होतं. पण जसा माणसात एखादा कली शिरावा, तशी या मूल्यात तफावत आहे, तिच्या साहाय्यानं कुणाचं तरी नफा-नुकसान होतं आहे, अशा साध्या न्याय्य विचारानं झालेली सुरुवात, अखेर सूक्ष्म असलेल्या स्वार्थानं, याच मूल्यांचं रूपांतर आपण एखाद्या पैशासारख्या मध्यस्थात करू शकलो, तर बरं होईल, अशी झाली. कागदी चलन आलं. पण त्याच पैशानं दुसऱ्याचं नफा-नुकसान करणंसुद्धा त्यामुळं शक्य झालं, माणसांवरसुद्धा नियंत्रण मिळवता आलं. मदतीला ठेवलेला पैसा असा हळूहळू मालक झाला.

एकदा तो निर्माण झाल्यावर त्यानं श्रमांचं मूल्य ठरवलं, धान्याचंही ठरवलं, मदतीचंही ठरवलं. ते सारं आपल्या ताब्यात घेतलं आणि आता असलेल्या गोष्टी एकमेकांना देण्याऐवजी, त्या गोष्टींचा पैसा करू, तोच साठवू आणि आपल्याला गरजेच्या असलेल्या गोष्टीही कुणाकडून स्वीकारण्याऐवजी त्यांनाही पैसाच देऊ, असा या पैशानं माणसाच्या नैसर्गिक आणि स्वास्थ्याच्या व्यवहारात चंचुप्रवेश केला. माणसांचं आता एकमेकांपेक्षा पैशाकडं जास्त लक्ष राहू लागलं. सगळ्या गोष्टी आता त्याच्याच माध्यमातून करायची सवय लागल्यानं, त्या पैशाचा जास्तीत जास्त संचय करावा, जमेल त्या मार्गानं तो मिळवावा, असा नकळत कल झाला. त्याची परिणती माणसापेक्षासुद्धा पैसा मोठा होण्यात झाली ! आपलं सारं सुख, स्वास्थ्य, भविष्य त्याच्यावर अवलंबून आहे, असा भ्रम पैशानं वाढवीत नेला. या व्यवस्थेला बळी पडता पडता पैशानं हळूहळू धान्य, वस्तू, घरदारं काय यश, आरोग्य आणि अखेर माणूससुद्धा आपण विकत घेऊ शकू, इथपर्यंत माणसाच्या धारणा बदलल्या. त्याच प्रवासात माणसंही शेवटी पैशानं विकत देता-घेता यायला लागली. साऱ्या व्यवहाराचा प्रवास अनैसर्गिकतेमुळं लोभाकडं, क्षोभाकडं आणि त्यामुळं अस्वास्थ्याकडं सुरू झाला. तो आजही अधिकाधिक वेगानंच सुरू आहे.

अडचण ही की, हे सारं ओळखू शकणारा माणूस प्रगल्भ न झाल्यामुळं त्याला प्रत्यक्षात पैसा कामं करतो असं दिसू लागलं, वाटू लागलं. पैसावाल्यांना मिळणारी मानप्रतिष्ठा दिसू लागली.माणसाची सहजप्रवृत्ती दिसतं ते खरं मानण्याकडं असल्यानं, त्याला पैशाचं खरं स्वरूप

ओळखता आलं नाही आणि 'जे जे दिसे, घडे ते ते, खरे मानी जसे तसे' या न्यायानं त्याच्याही जीवनात पैशाचं स्थान खरंतर काम सोयीचं होण्यासाठी ठेवलेल्या नोकराचं होतं, ते आता मालकाचं होऊन बसलं. 'पैसा मानवाचा दास, आता मुकुट मस्तकास' असं झालं. स्पष्ट शब्दांत सांगायचं तर, माणूस, निसर्ग आणि परमेश्वर यांच्याहीपेक्षा पैशाचं स्थान मोठं झालं. माणसाच्या जीवनाचं ते ध्येय झालं. माणूस स्वास्थ्य हरवून बसला !

इतक्या साऱ्या पार्श्वभूमीवर मग महाराजांनी पैशाचा विचार करताना त्याच्या उपयुक्ततेवर आणि खरंतर त्याच्या घातकतेवर जे जे विचार मांडले, आपल्याला करायला सांगितले, त्यांचं महत्त्व लक्षात घेणं आवश्यक आहे.

एका बाजूला आपण एक मानवी व्यवहार म्हणून जी अर्थव्यवस्था स्वीकारली ती आता वाढली, तिनं मुळं धरली, तिच्याकडं महाराज दुर्लक्ष करीत नाहीत. आपल्या आजच्या रोजच्या दैनंदिन व्यवहारातलं पैशाचं स्थान महाराजांना ठाऊक आहे. पैशाच्या आधारानं होणारे व्यवहार ठाऊक आहेत. पण त्याची गरज आणि मर्यादा ते ओळखतात आणि खास करून त्यापासून निर्माण होणाऱ्या आणि आपल्या आयुष्याचं कायमचं नुकसान करणाऱ्या धोक्यांबद्दल आपल्याला सावधान करतात.

आपण व्यवहारात अनुभव घेतला असेल की, जवळ पैसा असला म्हणजे माणसाला आधार वाटतो. त्याच्या बऱ्याच गोष्टी मार्गी लागतील, घडवून आणता येतील, असं त्याला वाटतं. कारण त्याच्या या साध्या दृष्टीला तसं घडताना दिसतं आणि दिसतं ते खरं आहे, असं म्हणण्याची त्याची प्रवृत्ती आहे. त्यामुळं पैसा मिळवण्याकडं, तो जास्तीत जास्त मिळवण्याकडं आणि आधार म्हणून साठवण्याकडं त्याचा कल होतो. यात थोडं तथ्य असलं तरी, माणसाला गरजेच्या असलेल्या, त्याचं जीवन खऱ्या अर्थानं समृद्ध आणि सफल करू शकणाऱ्या अनेक गोष्टी या पैशाच्या आधारानं होत नाहीत, हे तथ्य महाराजांनी लक्षात आणून दिलं आहे.

वास्तविक आपण रोज वाढतो, जगतो, श्वास घेतो, ज्यामुळं आपल्या शरीरातल्या लक्षावधी पेशींना जीवन मिळतं - तो सूर्यप्रकाश आपण घेतो, कुणाबद्दल मनःपूर्वक शुभचिंतन करतो, कुणाचे आशीर्वाद मिळतात.

घोटभर पाण्यासाठी जीव कासावीस झाला असला तर कुणी माणूस, शेजारी धावून येतो आणि ते घोटभर पाणी देतो. आपलं दुःख पाहून कुणाच्या डोळ्यांत पाणी येतं. आपल्या यशानं कुणी आनंदित होतं. औषधपाण्याच्या उपलब्धता नसताना किंवा त्यात त्यांचे प्रयत्न संपलेले असतानासुद्धा आपल्याला जीवदान मिळतं. कुणी अगदी मोलाच्या प्रसंगी येऊन आपल्या आयुष्याला परमेश्वराचं वळण देऊन जातं. अशा असंख्य गोष्टी माणसाचं जीवन समृद्ध, शांत करीत असतात, त्यांच्या आधारानं ते जीवन चालतंही आणि त्यांचा पैशाशी कुठला संबंधही नाही.

पण दुर्दैव हे की, या गोष्टींची कल्पना पैसा माणसाला येऊ देत नाही. माणसाचं सगळं जणु काही तोच करतो आहे, असा आभास पैसा निर्माण करतो. त्यामुळं पैशाशिवाय घडणाऱ्या गोष्टींची जाणीव, कृतज्ञता पैसा माणसाला उरू देत नाही. माणसाच्या जीवनाचा एकमेव आधार पैसाच आहे, असा भ्रम निर्माण करण्यात तो इतका यशस्वी झाला आहे की, याबाबतीत ईश्वरसुद्धा मागं पडेल. 'ईश्वर माणसाच्या जीवनाचा खरा आधार आहे.' पण तो ईश्वरसुद्धा स्वतःबद्दलची ही 'वस्तुस्थिती' माणसाला जाणवून देण्यात पैशाइतका यशस्वी झाला नसेल !

म्हणून महाराज अगदी सुरुवातीला हे लक्षात घ्यायला सांगतात की, पैसा असावा, त्यानं बिघडत नाही, पण त्याच्या आधारानं आपलं जीवन चाललं आहे किंवा चालेल, अशा भ्रमाला कधीही बळी पडू नये. दुसरं असं की, पैसा असण्यानं मी सुखी होईन, असं कधीही वाटू देऊ नये आणि नेमके हेच मोठे भ्रम निर्माण करण्यात आज पैसा यशस्वी होतो आहे आणि दुसऱ्या बाजूला ईश्वर अंतरतो आहे. आजूबाजूला चाललेली पैशासाठीची धावपळ, त्यासाठी अवलंबले जाणारे भलेबुरे मार्ग, पैशाच्या प्राप्तीबद्दलची चिंता आपण पाहिली, तर या म्हणण्यातलं सत्यत्व आपल्याला पटू शकेल.

पैशाचा आधार माणसाच्या मनात इतका खोल गेला आहे की, काही वेळा सामान्य माणसाच्यासुद्धा ते लक्षात येऊ शकतं. आपण पाहिलं असेल, दिवसभर गिऱ्हाईकासाठी वेगवेगळ्या स्टॉपवर थांबून दहादहा-बाराबारा तास कष्ट करणाऱ्या आणि आजकालच्या खड्ड्यांच्या या निकृष्ट

रस्त्यांवरून रोजच्या रोज मणक्यांना बसणारे हादरे सहन करीत फिरणाऱ्या रिक्षावाल्यांबरोबर, दोनदोन रुपयांसाठी अनेक धनाढ्य माणसं वाद घालताना आपल्याला पाहायला मिळतील. बँकेतलं खातं बंद करताना साठ पैसे शिल्लक राहिले तर, वरचे चाळीस पैसे मी भरले तर मला एक रूपया परत कराल का, हे म्हणणारे श्रीमंत खातेदार पहायला मिळतात.

पैशाच्या आधाराचा भ्रम इतका खोल गेला आहे की, आपल्याच कामासाठी गरजेचा आहे म्हणून दुपारी बँकेतून काढायचा पैसा शक्यतो बँक बंद होताना संध्याकाळी काढताना लोक दिसतात. तासावर व्याजाचा हिशोब नसला आणि त्यामुळं असं करण्यात खरोखर काही फायदा नसला तरीही एका सूक्ष्म लोभापोटी हे घडताना दिसून येईल. म्हणून महाराज म्हणाले, पैशाशिवाय चालत नसलं तरी तो आपल्या वृत्तीवर जो विघातक परिणाम करतो, तो लक्षात घ्यायला हवा. त्याचा होणारा विघातक परिणाम लक्षात घेण्यात कोणताही माणूस बहुधा फसेल. ते टाळायचं असलं, तर त्याला पैशाच्या आधारानं सर्व होतं आहे, असं जे दिसतं त्यापेक्षा मूळ आणि खरं काय आहे, याची ओळख देणारा गुरूच गरजेचा आहे. म्हणून महाराज पुढं हेही स्पष्ट म्हणाले आहेत की, 'पैशाशिवाय चालत नसलं तरी पैशाइतकी वाईट वस्तू नाही ! '

पैसा वाईट आहे हे खरं. पण त्याच्या दुर्गुणाचा आपल्याला सावध होण्यासाठी, शिकण्यासाठी एक विधायक उपयोगही आहे. महाराजांनी तो लक्षात आणून दिला आहे. महाराजांची ही दृष्टी मात्र विलक्षण आहे. तो उपयोग असा की, ते म्हणत पैसा वाईट असला तरी 'माणसाची वृत्ती पाहायला तो उपयोगी पडतो !'

अनेक संतांनी याबद्दल वेळोवेळी सावधानता दिली आहेच. साईबाबा आपल्या भक्तांकडून पैसा मागून घेत. तो अनेकदा त्यांची वृत्ती पाहाण्यासाठी. त्यांना पैशाच्या वृत्तीवर होणाऱ्या परिणामांपासून वाचवण्यासाठी. काहीवेळा त्याची खूण अशी असे की, ते त्या क्षणी मागत बरोबर तेवढेच पैसे त्याच्या खिशात त्या क्षणी असत. अनेकदा तर याची त्याला स्वतःलासुद्धा कल्पना नसे. एवढे नसतील असं वाटून एका भक्तानं

तसं म्हटल्यावर त्यांनी मग असतील तेवढे दे, असं त्याला सुचवलं. प्रत्यक्ष सगळे खिसे बघितल्यावर तेवढेच पैसे त्याच्याकडं निघाले.

कसोटी अशी असे की, आता ते आहेत म्हणून देताना त्याची वृत्ती काय राहाते ? अनेकांना अशावेळी आपण परतीचा प्रवास कसा करणार, वाटेत जेवणखाण कसं होणार-अशा चिंता वाटत. त्या चिंता सामान्य माणसाला वरवर पाहिलं तर रास्तही वाटतील. पण अशी महाराज म्हणतात तशी पाहाण्याची दृष्टी असेल, तर हे लक्षात येईल की, परतीचा प्रवास काय, जेवणखाण काय त्यासाठी माणसाला गुरूपेक्षासुद्धा नकळत पैशाचा आधार जास्त वाटायला पैशानं लावलं ना ? खरंतर या गोष्टीच काय, आपलं सारं जीवन ज्यांच्या सत्तेनं चालतं त्यांच्या सत्तेपुढं या गोष्टी किती क्षुल्लक असतील आणि त्या किती सहज निभावल्या जातील ! पण या सत्याची जाणीव पैसा माणसाला होऊ देत नाही. उलट तो नसल्याची काळजी मात्र उत्पन्न करतो.

पैशाच्या वाईट असण्याचं फार महत्त्वाचं कारण हे की, जगात दुसरा माणूस, एखादी यंत्रणा, एखादी सत्ता आपल्या म्हणण्यासाठी चूक-बरोबर कशीही वागायला एकवेळ तयार होणार नाही - तिला स्वतःची मर्यादा, मतं, नियम असू शकतील. पण पैसा मात्र आपल्या मनात येईल तसा वागू शकेल. पैशानं भुकेसाठी झुणका-भाकर घ्यावी म्हणून तो वापरायचा ठरवला तरी तो वापरला जाईल. पण त्यानं एखादं व्यसन करायचं ठरवलं तरी तो वापरला जाईल. त्या अर्थानं पैसा खरंतर नगण्य आणि अणुवतच उपयोगाचा आहे. बाकी पैसा हे विनाशक अण्वस्त्रच आहे ! आपण हे पाहातोही की, अत्यंत चांगली नाती, आदर, प्रेम, कृतज्ञता, सदाचार, जिव्हाळा - अशानं वर्षानुवर्षं सुखासमाधानात असलेली अनेक माणसं, हा पैसा मध्ये आला की तुटतात, अविचारी होतात.

त्यातूनच प्रपंचात जर अशा अशुद्ध पैशाचा बेसावध साठा झाला तर असाध्य आजारपणं, भांडणं, कोर्टकचेऱ्या, अपंग मुलं, पुढच्या आळशी पिढ्या, फसवणुकी-अशा असंख्य वाटांनी तो निघून जातो, हे आपण पाहिलं असेल. त्यात पुन्हा, तो नसला तरी काळजी उत्पन्न करतो आणि असला

तरी काळजी उत्पन्न करतो !

म्हणून महाराज या पैशाचा संचय आणि त्यामागं लागलेल्या माणसांच्या वृत्तीबद्दल आणि त्या पैशाबद्दल सांगताना म्हणतात, 'पैसा घाणीतच राहातो, म्हणून तो संतांजवळ कमीच असतो.' याद्दष्टीनं हेही लक्षात घेणं आवश्यक आहे की, पैशानं आधी पाहिल्याप्रमाणं व्यवहारातल्या सगळ्या गोष्टी होत नाहीत, हे तर खरंच. पण महाराजांचं म्हणणं जरूर लक्षात ठेवावं की, 'पैशानं परमात्मा कधी मिळत नाही.' यावरून हेही ओळखावं की, जर कुणी तुम्ही पैसा द्या मी तुम्हाला परमात्मा मिळवून देतो, दर्शन घडवतो असं म्हणत असेल, तर त्यात तथ्य नाही, हे ओळखून आपण सावध व्हावं !

या पैशाचा संबंध व्यवहारात येणारच. तो नोकरीत येईल, उद्योगात येईल, देण्याघेण्यात, खरेदीत येईल-इतपत ठीक आहे. पण या व्यवहारापलीकडं ज्यावेळेला सत्संगाचा, सत्कर्मांचा, देवाधर्माचा, उपासनेचा प्रश्न येईल त्यावेळीही किंचित का होईना, या पैशाचा संबंध येईल, हे उघड आहे. त्याचा अजिबात संबंध येऊ न देता करण्यासारखी जी जी साधनं आणि सत्कर्मं असतील ती अशीच केली, तर ती शुद्ध राहातील, उपयोगी ठरतील. पण हे एवढ्या अशा साधनांपुरतं सांभाळणंच शक्य आहे.

परंतु अशा पैशाचा संबंध सत्कर्मांत येणं अगदी अपरिहार्यच झालं, तर पैशाचा मूळ गुण वाईट असल्यामुळं, तो कसा कमीत कमी ठेवता येईल, याचा विचार करावा. या अर्थानं सत्कर्माचं जे एक स्वाभाविक केंद्र समजलं जातं, अशा संस्थान, मठ यांना निश्चित स्वरूपाचं पैशाचं उत्पन्न असू नये, या म्हणण्यातलं तथ्य लक्षात येऊ शकतं. उत्पन्नाला अशी निश्चितता असली की, साधक, भक्त अधिकाधिक साधन करतील, असं वाटतं. हा पैशाचा भ्रमच आहे. कारण तसं न होता पैशाचा आधार वाटून, त्यांना भगवंताचा आधार कमी होईल आणि भक्ती लटकी पडेल, हेच अधिक खरं आहे !

ज्याचा पगाराचा पैसा महिन्याला पुरत नाही, त्याच्या शेवटच्या आठवड्यात नडीमुळं का होईना, त्याला भगवंताची आठवण, उरलेल्या तीन आठवड्यांपेक्षा जास्त राहाते, हा अनुभवच आहे. चित्ताला निश्चिंतता यायची

असली किंवा त्यासाठी भगवंताचं स्मरण करायचं असलं, तर पैशाच्या सुबत्तेपेक्षा पैशाची कमतरताच जास्त उपयोगी पडते, हा महाराजांचा रोख जरूर लक्षात घेण्यासारखा आहे.

अगदी कष्टानं मिळवलेल्या पैशाचंसुद्धा दानानं शुद्धीकरण केल्याशिवाय तो आपल्याला स्वास्थ्याचा ठरत नाही. परमार्थात असो, प्रपंचात असो, दुसऱ्याचा पैसा घेताना महाराज म्हणत की, त्याची वृत्ती आणि वासना त्या पैशाबरोबर येत असतात, हे लक्षात ठेवावं. त्या अर्थानं ज्याचा पैसा शुद्ध नाही, सत्प्रवृत्तीचा नाही, तो घेणं टाळावं. महाराज म्हणत, 'नाम न घेणाऱ्याचा पैसा घेऊ नये.' अनेकदा हा अनुभव येतो की, कष्टाच्या आणि शुद्ध पैशातली काडीसुद्धा वाया जात नाही. पण अगदी मठ, संस्थानातसुद्धा अशुद्ध पैसा आला, तर अन्न वाया जाणं, अकारण खर्च होणं, तिथल्या माणसांच्या प्रवृत्तीवर विपरीत परिणाम होणं, अशा मार्गांनी तो नुकसान करून जातो.

आपण आपल्या आजच्या व्यवहाराचा अपरिहार्य भाग झालेल्या या पैशाचा बाहेर दिसत असलेला आधार जसाच्या तसा खरा न मानता-त्याचं मूळ, त्याची उपयुक्तता, मर्यादा आणि विशेषतः त्याची हानी करण्याची अपरिमित क्षमता, यांबद्दल सावध राहावं. तर या बाबतीत निदान आपलं जीवन आपण शुद्ध आणि त्यामुळं सुखी करू शकू आणि ज्या भगवंताच्या प्राप्तीसाठी आपण जन्माला आलो, त्या ध्येयाच्या प्राप्तीच्या आड तरी निदान, हा पैसा येऊ देणार नाही !

* * *

७. थोर आपण लक्ष द्यावे

देव, अंधश्रद्धा अशा विषयांचा तर्कशुद्ध पाठपुरावा करणं, भोंदुगिरी, जादूटोणे करून लोकांना गंडा घालणाऱ्यांना आळा घालणं, ही समाजहिताची कामं करणारे निःस्वार्थी लोक आणि त्यांचं काम हे थोरच होय. फक्त या विषयातही अनेक सावधगिरी बाळगणं हिताचं आहे. कारण मुळात उपयोगी पडणारं आणि ध्येय असलेलं खरं पीक चांगलं यावं म्हणून तणं काढण्यासारखं, हे काम आहे. स्वाभाविकपणे त्याला एक नकारात्मकता आहे. त्यानं जमिनीची मशागत होते पण पेरणी किंवा पीक ही मुख्य सकारात्मक कामं वेगळीच असतात. देवत्वाचं, सद्गुणांचं पीक येण्यासाठी महाराजांच्या म्हणण्याच्या अनुरोधानं विचार करूया. तो विचार अशा निःस्वार्थी कामांतही उपयोगी आहे आणि देवत्वाच्या मार्गानं जाऊ इच्छिणाऱ्यांना सावधानता बाळगण्यासाठीही उपयोगी आहे.

याचा विचार करण्याचं कारण असं की, अंधश्रद्धेनं मानले जाणारे असे खोटे देव-बुवा-भोंदुगिरी या टाकताना, त्याच्याबरोबर खरा, शाश्वत आणि गरजेचा देव जर टाकला गेला, तर होणारं नुकसान अपरिमित आहे. त्यापासून माणूस एकतर अश्रद्धेकडे जातो आणि दुसऱ्या बाजूनं त्याला स्वतःला देवत्वात परिवर्तन करून स्वतःचं आणि समाजाचं जीवन उन्नत करण्याची संधी देणारा खरा देव अंतरतो, याचं भान ठेवणं आवश्यक आहे.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणं भोंदुगिरी, फसवणुकी यांचा निषेध आणि त्याग याची गरज ही निर्विवाद आहे. फक्त त्यानंतर उरलेल्या माणसाच्या जीवनाला विधायक वळण देऊ शकणारी शक्ती फक्त शुद्ध बुद्धीत, विवेकात आणि त्यानुसार आचरणातच राहते. हा मार्ग तलवारीच्या धारेवर चालण्यासारखा आहे. तो अपवादभूत लोकांनाच कदाचित जमेल. कदाचित म्हणण्याचं कारण असं की, माणसाचं मन कुठल्याही क्षणी, त्याच्या आयुष्याच्या अगदी शेवटच्या क्षणीसुद्धा एखाद्या मान-मान्यतेला,

अपेक्षेला बळी पडू शकतं. इतकंच काय, मनाचा व्यापार इतका सूक्ष्म आहे की, 'मी आयुष्यभर विवेकानं राहिलो', याचासुद्धा अहंकार माणसाला धुळीला मिळवू शकेल !

यासाठी त्याला या साऱ्या सद्‌गुणांची ओळख देणारा, त्याच्या जीवनाला सात्त्विक वळण देणारा, मनाला भुरळ पडल्यास-भ्रम झाल्यास त्याला सावधान करून पुन्हा सन्मार्गावर आणून ठेवणारा, सत्याचाच विजय होईल याची खात्री अंतर्मनाला देणारा-असा गरजेचा देव आणि त्यावरची श्रद्धा किंवा निःस्वार्थी गुरू आणि त्यावरची श्रद्धा यांची गरज उघड आहे. अंधश्रद्धा टाकताना त्याबरोबर चुकून जरी ही श्रद्धा टाकली गेली, तरी सामान्य माणसाला देवत्वाची एक पायरी तरी पुढे नेऊ शकणारी एक मूलभूत गोष्ट आपण गमावून बसू, यात शंका नाही. देवावरची धूळ झटकताना किंवा निर्माल्य टाकताना चुकून देवही टाकला जावा, तेव्हा होणाऱ्या नुकसानीसारखं नुकसान, काही वेळा या वरवरच्या अंधश्रद्धेच्या विचारात घडण्याची शक्यता असते आणि तिच्याबद्दल सावधान राहाणं आपल्याच हिताचं आहे.

खरंतर अंधश्रद्धेचा त्याग म्हणजे अनेक माणसांच्या दृष्टीनं - देव ही केवळ कल्पना आहे, अर्थातच ती कल्पना अनावश्यक आहे आणि त्यामुळं तिचा त्याग करणं, म्हणजे अंधश्रद्धेचा त्याग - अशी समजूत आहे. वस्तुतः देव ही कल्पना नसून वस्तुस्थिती आहे. तिचा त्याग करणं म्हणजे आपले डोळे मिटून आता मी सूर्याचा त्याग करतो म्हणण्यासारखं आहे. त्यानं कदाचित स्वतःला प्रकाश दिसत नाहीसा होईल, आपण ते उच्चरवानं सांगूसुद्धा शकू, त्याला माझा अनुभव प्रमाण आहे, असं म्हणू शकू पण आकाशात सूर्य राहील आणि प्रकाश तळपतही राहील !

जे माझ्या मानण्यावर अवलंबून असतं,ते मी नाकारू शकतो. जिचं अस्तित्व माझ्यावर अवलंबून असेल, तिचं अस्तित्व मी नष्ट करू शकतो. पण देव माझ्या मानण्यावर ना अवलंबून, ना त्याचं अस्तित्व अवलंबून. त्यामुळं अंधश्रद्धांचा त्याग हा वर म्हटला त्या प्रमाणात बरोबर असला, तरी त्यात या शाश्वत, प्रेरक आणि निःस्वार्थी संतमहात्म्यांच्या अनुभवाचा

विषय असलेल्या देवाचा त्याग करण्याची कुठलीच गरज नाही. मात्र त्याचं स्वरूप, गरज, आपलं त्याबाबतीतलं कर्तव्य, त्यानुसार स्वतःच्या वृत्तीतले बदल - या साऱ्या संतप्रणीत गोष्टी लक्षात घेण्याची गरज आहे, हे नक्की.

जाताजाता आणखी दोन मुद्द्यांचा विचार करून पुढं जाऊ. एक म्हणजे देवाचं अस्तित्व ठरवायला अनुभव हे प्रमाण असलं, तरी 'माझा अनुभव' हे प्रमाण म्हणणं धाडसाचं आहे. माझा अनुभव प्रमाण म्हणणं हा बुद्धिवादानं नकळत येणारा एक दोष आहे. त्यात एका बाजूनं अहंकार आहे, दुसऱ्या बाजूनं मी म्हणजे फक्त माझा देह, एवढंच गृहीत आहे.

महाराज म्हणत, व्यवहारात आपल्याला समजूत असण्याची किती गरज आहे, हे कळतं. पण बुद्धीनं ती समजूत, ते शहाणपण येत नाही, हा आपला अनुभव आहे. तरी पुन्हा आपण बुद्धी कमवायचा प्रयत्न करतो. महाराज म्हणाले, या बुद्धिवादानं आपला लाभापेक्षा घातच जास्त केला आहे. नकळत अहंकारानं विवेक अंतरतो आणि अश्रद्धेनं परमात्मा अंतरतो. चार्वाकांचा निरीश्वरवादाचा पारंपरिक विषय क्षणभर सोडून दिला तरी, आजच्या तथाकथित विज्ञानवादी माणसांचा निदान डार्विनच्या म्हणण्यापासूनचा 'वुई डोन्ट नीड स्टिनकिंग गॉड, लाइफ हॅपन्स बाय चान्स, नॉट बाय डिव्हाइन इंटरव्हेन्शन' सारांशानं देव नाही, सगळं योगायोगानं चाललं आहे, असा विश्वास आहे. असं म्हणण्यात, मुळात ज्या तर्काच्या आधारावर विज्ञानाची इमारत उभी आहे, तिच्याच विरुद्ध आपण बोलतो आहोत, याकडं दुर्लक्ष झालं आहे. यातून एक वैज्ञानिक अंधश्रद्धा निर्माण झाली आहे.

आम्हाला दिसत नाही, कळत नाही, ते नाही या म्हणण्यानं काही प्रमाणात फायदा झाला हे खरं असलं, तरी त्या नादात निर्गुण देव अंतरला. त्यामुळं झालेलं नुकसान मोठं आहे. विज्ञान यथावकाश शुद्ध, तटस्थ संशोधनानं आपल्या मर्यादा ओळखून तिथं येईलच, पण तोपर्यंत महाराजांनी ज्या पद्धतीनं अंधश्रद्धेचा, ती टाळण्याचा विचार केला, तो समजून घेणं सश्रद्ध माणसांनाच नव्हे, तर सर्वांनाच नक्की फायद्याचं ठरणारं आहे, म्हणून त्याचा विचार पुढं करू.

अंधश्रद्धेत जो अनुभवावर खरं ठरवण्याचा विचार आहे, त्याबद्दल महाराजांचं म्हणणं मौलिक आहे. त्यांना एकदा विचारलं की, तर्कानं किंवा ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज यांच्यासारख्यांच्या सांगण्यावरून भगवंत आहे आणि तो खरा कर्ता आहे, याची खात्री होते. आम्हाला स्वतःला भगवंताचा असा अनुभव येऊन खात्री करून घेता येईल का ?

हा विषय समजावून देताना महाराज म्हणाले की, आपली बुद्धी आपल्याला निकाली आणि अंतिम उत्तर देऊ शकेल, एवढी समर्थ नक्कीच नाही. तिला निर्गुणाचा अनुभव घेण्याची क्षमता नाही. अशा अनुभवासाठी अंतःशुद्धी लागते. त्या बुद्धीत देहबुद्धीमुळं भ्रमही आहे. भगवंतानं प्रत्यक्ष येऊन सांगितलं, तरी तो अनुभव खरा आहे की भास आहे, असं पुन्हा आपल्याच मनाला वाटल्याशिवाय राहणार नाही. काहीतरी प्रकारचा भ्रम उत्पन्न करणं आपल्या बुद्धीतच आहे. आजसुद्धा पूर्ण विज्ञानवादी आणि त्या अर्थानं निस्वार्थबुद्धीनं संशोधन करून निष्कर्ष देणारी कित्येक मंडळी, आपलेच निष्कर्ष काही काळानं पूर्ण चुकीचे होते, हे सांगतात. महाराजांच्या म्हणण्याची सत्यता पटायला एवढंसुद्धा पुरेसं आहे.

महाराजांनी मांडलेल्या अंधश्रद्धेचा विचार करण्यापूर्वी एक गोष्ट लक्षात घेतलेली बरी की, माणसं अश्रद्ध व्हायला कारण तथाकथित देव मानणाऱ्या सश्रद्ध माणसांनी देवाचं जे अवडंबर माजवलं, तेही कारणीभूत आहे. खरंतर मूळ श्रद्धेशी, परमार्थाशी याचा काहीच संबंध नाही. 'परमार्थ म्हणून करणारे जे लोक दिसतात किंवा परमार्थाच्या नावाखाली जे व्यवहार होतात, ते पाहिले असता खऱ्या परमार्थाच्या अस्तित्वाची जाणीव होत नाही.' उलट असलेल्याची थोडीफार श्रद्धाही उडून जाते, अर्थात याला असे लोक आणि त्यांचा व्यवहार कारणीभूत आहे. खरा देव, श्रद्धा, परमार्थ किंवा खरा परमार्थ करणारे नव्हेत !

महाराजांच्या दृष्टीनं खरी अंधश्रद्धा प्रपंचातच आहे. प्रपंचाचा अनुभव पिढ्यान्‌पिढ्या वर्षानुवर्षं अगणित लोकांनी घेऊन तो दुःखाचा आहे, हे कळूनसुद्धा त्याची आसक्ती सुटत नाही, तो उलट आणखी आणखी करावासा वाटतो, याच्यापेक्षा आणखी अंधश्रद्धा कुठली ! आपण जर प्रचीतीनं शहाणे

होणार नसू, तर अंधश्रद्धच आहोत, असं म्हटलं पाहिजे. आपण धड कर्ते नाही, धड भोक्ते नाही, धड ज्ञाते नाही, हा अनुभव वास्तविक ज्याला त्याला आहे. तर मग कर्ता दुसरा कुणीतरी आहे, भले मला तो दिसत नसेल किंवा दिसण्याची क्षमता नसेल, तरी हे सत्य माझ्या प्रचीतीला येऊनही मी स्वतःला कर्ता समजतो, ज्ञाता समजतो, हा भ्रम आणि अंधश्रद्धा नव्हे का ? त्यानं नुकसानच झालं आहे.

खरं जर माणसाला अंतिम सत्याची प्रचीती हवी असेल आणि अंधश्रद्धा नको असेल, तर त्याला तीनही मार्ग परमार्थात ठेवलेले आहेत. एकतर हजारो वर्षांपूर्वीच्या शुद्ध तपःपूत ऋषींनी उपनिषदांसारख्या ग्रंथांतून किंवा अलीकडच्या श्री ज्ञानेश्वर, तुकारामांसारख्या निःस्वार्थी आणि आपल्या उद्धाराची अपार तळमळ बाळगणाऱ्या संतांनी लिहून ठेवलेल्या ग्रंथांत खऱ्या देवाचं स्वरूप, मार्ग हे सारं दिलेलं आहे. आपली बुद्धी किती झाली तरी त्यांच्यापेक्षा मोठी खचित नाही. तेव्हा त्यांचं म्हणणं प्रमाण मानून, साधन करून प्रत्यक्ष अनुभव पहावा, हा एक मार्ग.

आजच्या काळातही खऱ्या संतांची परंपरा अबाधित आहे. त्यांना या शाश्वत सत्यस्वरूप परमेश्वराचा अनुभव आहे, त्यांनी तो मार्ग चाललेला आहे, गाठलेला आहे. ते तळमळीनं आपल्याला सांगतात, ते गुरुवचन हा मार्गसुद्धा आपल्याला उपलब्ध आहे. आपली फसवणूक होण्याची शंका असेल, तर वर ग्रंथांत संतांनी सांगितलेला मार्ग चालत राहावं. आपली वेळ येताच आपल्याला जरूर असेल, तर परमेश्वर हे देहातले महात्मे आपल्याला भेटवून देईल.

तिसरा मार्ग आपला स्वतःचा प्रपंचाचा, मनाचा, जगाचा सारा अनुभव शांतपणे, तटस्थपणे पहावा. तरीही आपल्याला खऱ्या कर्त्याचा जरूर अनुभव येईल. पण महाराज म्हणत, पहिल्या दोन प्रचीतीनं तर मनुष्य अनुभव घेऊ शकेल, तरेलच. पण हा आत्मप्रचीतीचा मार्ग असतानाही तो शहाणा होत नाही, हे नवल आहे. त्या अर्थानं ते म्हणाले की, 'खरी अंधश्रद्धा आज प्रपंचातच आहे कारण प्रपंचात दुःखाचे इतके धक्के बसूनही आपण जागे होत नाही, डोळे असून पाहात नाही ! '

आज व्यवहाराचा विचार केला, तर आपल्या हे लक्षात येईल की, कुणी बुवाबाजीनं, भोंदुगिरीनं काही मिळवलं असेल, तर त्यातही ते मिळवणाऱ्याची मुळात पैशावरची अंधश्रद्धाच आहे. ती दूर व्हावी हे बरोबरच आहे. पण व्यवहारात आज सत्तेनं काहीही करू, पैशानं काहीही करू - या स्वरूपात ही अंधश्रद्धा असंख्य लोकांच्या ठिकाणी नाही का ? ज्या अंतिमतः फोल ठरतात अशा पैसा, सत्ता, प्रतिष्ठा, शिक्षणं, संरक्षणं असल्या अनेक गोष्टी आपण मिळवणं रास्त ठरवतो, याही अंधश्रद्धाच आहेत. त्या दूर होणं तितकंच किंबहुना त्यापेक्षा जास्त हिताचं आहे. कारण त्या प्रचंड व्यापक आणि प्रतिष्ठित आहेत.

आपल्या बुद्धी आणि स्वभावाप्रमाणं आयुष्यभर वागूनही आपलं किंवा समाजाचं आपण अंतिम कल्याण करू शकत नाही, हा अनुभव असूनही, आपल्याला आपली बुद्धी आणि स्वभाव यांची खात्री वाटते. पण आपलं अंतिम हित जाणणाऱ्या आणि करू शकणाऱ्या संतांची वाटत नाही, ही माणसाच्या, या अर्थानं असलेल्या अंधश्रद्धेची आणि बुद्धीची शोकांतिका आहे. म्हणून जगभर एवढा क्षोभ पसरलेला आहे. अशा अंधश्रद्धांचा त्याग करणाऱ्या संतांचं आणि त्यांच्या मार्गानं जाणाऱ्यांचं जीवन मात्र शांत आहे, समाजातला क्षोभ कमी करणारं आहे !

श्रद्धेबद्दल महाराजांचं म्हणणं तर खरं विलक्षण आणि आपल्याला जागं करणारं, उपयोगी पडणारं आहे. ते म्हणतात, 'श्रद्धा नसल्यामुळंच आपण उलट आंधळे झालो आहोत.' त्यामुळं सर्वत्र असूनही भगवंत आपल्याला दिसत नाही, त्याच्यावर सोपवता येत नाही, आपली कर्तव्यं करता येत नाहीत, आपल्या जीवनाचं सार्थक करता येत नाही.

मला वाटतं, त्या अर्थानं खरा प्रश्न आपण 'श्रद्धाअंध' आहोत, हा आहे, तेवढं दूर केलं आणि उघड्या डोळ्यांनी मार्ग चाललो, तरी खरा देव गाठू !

* * *

८. मर्म हुडकण्या जिणे लाभले

सगळीच माणसं जगत आहेत. पण व्यवहारात मनुष्य इतका गुंतून गेलेला आहे की, आपण माणूस म्हणून काही वेगळे आहोत, आपल्या आयुष्याला सृष्टीतली सर्वोच्च निर्मिती म्हणून तितकंच सर्वोच्च ध्येय आहे, याची जाणीव ठेवून जगणारी माणसं आपल्याला जरा शोधावीच लागतील. ज्यांना ही जाणीव आहे त्या माणसांच्यातसुद्धा आपण माणूस आहोत, मनुष्याच्या जन्माला आलो, ते जणु काही आपल्या कर्तृत्वानं आलो, अशीच अनेकांची समजूत असते. आत्ताच्या आयुष्याचा विचार केला, तर आपण माणूस म्हणून जन्माला येण्यात आपलं कर्तृत्व नाही, हे उघड आहे. आपला मनुष्यजन्म, ही खरंतर निसर्गाची-ईश्वराची आपल्याला मोठी देणगी आहे, मोठी संधी आहे.

या मनुष्यजन्माच्या जिण्याचा उद्देश नक्कीच असेल. तो हुडकून काढणं आणि ते ध्येय गाठणं, हेच त्या संधीचं खरं चीज ठरेल. महाराज म्हणत, 'जीवन हे भगवंताचं देणं आहे.' ते देण्यामागचं मर्म हुडकून काढण्यासाठी जिणं लाभलं असलं, तरी त्यातसुद्धा सर्वांत महत्त्वाचा विचार आणि अडचण ही की, या जिण्याची मर्यादा आपल्याला माहीत नाही. आपलं ध्येय गाठायला पाच-दहा वर्षं मिळणार की पाच-दहा महिने याचीसुद्धा आपल्याला कल्पना नाही. म्हणून या बाबतीत सावध असेल, तोच यशस्वी होईल, हे उघड आहे.

महाराजांनी स्पष्ट म्हटलं आहे, 'आपल्याला ठराविक वेळेच्या आत म्हणजे, मरणाच्या आत आपलं ध्येय गाठायचं आहे. त्याला मृत्यूची मर्यादा आहे.' परंतु या जगण्याच्या धावपळीत आपल्याला ध्येयाचंही भान नाही आणि मृत्यूचंही भान नाही. खरंतर या मर्यादेच्या आत आपलं जीवनाचं ध्येय हुडकून, ते गाठण्याचं कार्य आपण आटोपलं पाहिजे.

महाराजांनी मनुष्यजन्माचा जो विचार केला, तो ध्येयप्राप्ती आणि मृत्यूचं भान या दोन्हींच्या प्रकाशात केला आहे. जगात ज्ञानाला मोठी

किंमत आहे. विद्वानांना मान आहे. पण महाराजांच्या दृष्टीनं ज्याचं हे मनुष्यजन्माचं ध्येय ठरलं असेल, तोच खरा विद्वान. बाकीची विद्वत्ता ही त्यांच्या दृष्टीनं पैसा, लौकिक मिळवायला उपयोगी असेल. पण मनुष्यजन्माचं सार्थक करायला उपयोगी नाही.

आपली स्वतःची जन्माची स्थिती पाहावी. कुठं जन्माला यावं, कधी जन्माला यावं, स्त्री-पुरुष कुठल्या जन्माला यावं, कुणाच्या पोटी जन्माला यावं-इथंपासून ते मनुष्य कुठल्या अवस्थेत जाणार, कधी जाणार, शरीराच्या कशा स्थितीत जाणार इथंपर्यंत आपल्याला सगळं अज्ञानच आहे. त्याचबरोबर या सगळ्याला आपण बांधलेही गेलेले आहोत. त्यात मायेमुळं बांधलेले गेलो आहोत की स्वतंत्र आहोत, याचाही उलगडा नीट होत नाही. म्हणून महाराज म्हणतात त्याप्रमाणं, 'एकूणच बद्ध दशेत येऊन मुक्त होऊन जाणं, यात मनुष्यजन्माचं सार्थक आहे. नाही तर असेच हेलपाटे आणि येरझारा घालीत बसावं लागेल.' या अर्थानं देहानं मृत्यू येण्यापूर्वी भगवंत मिळवणं, हे आपल्या मनुष्यजन्माचं ध्येय आहे, मर्म आहे.

या ध्येयाची नीट ओळख व्हायला, त्यासाठी जगण्याचे मार्ग कळायला, त्यानुसार वाटचाल करायला लागण्यापूर्वी महाराजांनी दिलेली एक खात्री लक्षात ठेवावी. अनेकांना असं वाटतं की, हे भगवंत, ध्येय, समाधान मिळवणं, सगुण-निर्गुण, शाश्वत-अशाश्वत - अशा साऱ्या गोष्टी आमच्या आटोक्याबाहेर आहेत. त्या खऱ्या असतीलही, पण ती काही पुण्याई घेऊन आलेल्या माणसांची कामं असतील किंवा ती करणारे लोकच वेगळे असतील. ही समजूत खात्रीशीरपणे आणि अनुभवानं दूर करताना महाराज म्हणतात, 'प्रत्येक माणूस भगवत्प्राप्तीचा अधिकार घेऊनच जन्माला आलेला असतो.' खरंतर त्याचा मार्गसुद्धा तितकाच सोपा, निरुपाधिक आणि सर्वांना जमणारा असलाच पाहिजे, असतोही.

याचं अधिक स्पष्टीकरण करताना महाराज म्हणतात की, उलट जीवनाचं कोडं उकलण्याची शक्ती फक्त माणसाच्या ठिकाणी आहे, म्हणून मनुष्यप्राणी हा सर्व प्राण्यांमध्ये श्रेष्ठ आहे.

निसर्गातली उत्क्रांती म्हणून शरीर, मन, मेंदू- यांचा विचार तर

केलेलाच आहे. पण इतर प्राणी आणि माणूस यांच्यात अनेक फरक येतात, हे आपल्या लक्षात येईल. प्राण्यांच्या शरीरामध्ये शक्तीच्या दृष्टीनं जास्त क्षमता आहे. प्राणी तहान-भूक भागवण्यापासून झोपेपर्यंत सर्व प्रकारच्या कृतीसुद्धा करू शकतात. पण माणसाच्या ठिकाणी जीवनाचा अर्थ लावण्याची, त्याचं ध्येय हुडकून काढण्याची, त्यासाठी लागणारं स्थलकालाचं भान असण्याची, सूक्ष्म असलेलं पण अनुभवायला येणारं भगवंताचं समाधान किंवा आनंद असं स्वरूप जाणण्याची जी क्षमता आहे, ती प्राण्यांच्या ठिकाणी नाही.

याचा विचार करून खरंतर माणसानं आपल्या ध्येयाच्या प्राप्तीला अनुकूल असलेल्या क्षमतांबद्दल भगवंताचं कृतज्ञ राहायला हवं. अशा अलौकिक गोष्टी देणाऱ्या भगवंताबद्दल त्याला इतर कशाहीपेक्षा जास्त प्रेम वाटायला हवं, हे उघड आहे. ते वाटलं तर माणसाच्या आयुष्याला आज जी नुसत्या सुखदुःखाची कळा आली आहे, ती येणार नाही. तो आपलं जीवन या कृतज्ञता आणि प्रेमाच्या शक्तीनं मुळातूनच बदलून टाकू शकेल, याची खात्री बाळगावी.

त्या अर्थानं ध्येयहीन जीवन हे तसं पशुजीवनच आहे. पशु जगतो तो त्याच्या देहाच्या धारणेकरता. आपणही जर नुसत्याच देहाच्या धारणेचा आणि सुखांचा विचार करीत राहिलो, तर आपला प्रवास देहाच्या जास्तीत जास्त सुखाची काळजी घेण्याकडं होईल. त्यापोटी सुखसाधनांची वाढ मनुष्य करू शकेल. ते आज आपण किती पराकोटीला गेलं आहे, हे पाहातो आहोतच. यालाही एका परीनं मनुष्याचा जन्म मिळाला हेच कारण आहे. कारण त्याशिवाय देहसुखाच्या साधनांची एवढी झेप घेणं, पशूला शक्यच नाही. पण याचा परिणाम जर ध्येयाच्या विस्मरणात झाला, तर माणूस, माणूस म्हणून जन्माला आला खरा, पण त्या अर्थानं त्याचा शेवट अधिक उत्तम माणसात किंवा ध्येय गाठलेल्या-भगवंतमय झालेल्या माणसात न होता, त्या अर्थानं निकृष्ट पशुजीवनात होईल, हे उघड आहे. माणसाला आपल्या आयुष्यातल्या कितीतरी बाबतीतल्या अपूर्णतांची जाणीव होण्याची क्षमता आहे, म्हणूनच पूर्णत्वाकडं त्याची धाव जाऊ शकते. देहबुद्धीला धरून

विचार करणाऱ्या माणसाची धाव, हे पूर्णत्व गाठताना दृश्यापलीकडं जात नाही. आपल्या आयुष्यातलं अपूर्णत्व कमी करण्याची जाणीव असली, तरी माणसं कमी पडली तर लोकसंग्रह कर, वस्तू कमी पडल्या म्हणून वस्तू गोळा कर, घरदारं कमी वाटली म्हणून आणखी घरं बांधीत जा-असा त्याचा अपूर्णत्व कमी करून पूर्णता आणण्याचा प्रयत्न आपल्याला चालू असलेला दिसेल.

पण आपल्याच काय आपल्या आजूबाजूच्या शेकडो लोकांचे प्रपंच पाहिले, तरी अशा दृश्य वस्तू अगदी कल्पनेपलीकडं गोळा करूनसुद्धा यातल्या कुणाचाच प्रपंच कधी पुरा झालेला नाही, हे माणसाला दिसू शकतं. या अर्थानंसुद्धा अपूर्णत्वाची नुसती जाणीवच नव्हे, तर खरं पूर्णत्व असल्या दृश्यातल्या गोष्टी गोळा करण्यात नाही, हे ओळखण्याचं सामर्थ्यसुद्धा मनुष्यजीवनातच आहे. अर्थात हे जाणण्याइतपत सावधानता आणि ज्ञान त्यानं मिळवण्याला मात्र काही पर्याय नाही.

हे ज्ञान स्वतःला तटस्थ अनुभवानं येण्यासारखं आहे. पण ते थोड्यांनाच जमेल. म्हणून त्यासाठी महाराज म्हणत तसं, खरं पूर्णत्व कशात आहे आणि ते कसं येईल, हे सांगणाऱ्या अजून एका वस्तूची गरज आहे आणि माणसाच्या आयुष्यात त्याचीही सोय भगवंतानं करून ठेवलेली आहे. ज्यांनी हा विचार करायचाच नाही, असं ठरवलं आहे आणि आहे ते देहापुरतं संकुचित जीवन जगायचं ठरवलं आहे, त्यांचा शेवट दुःखात किंवा सुखाच्या आभासात होणार, हे उघड आहे. त्यांचा विचार करायचा आपल्याला कारण नाही. पण महाराज म्हणतात तसं, माणसाकडं स्वतःचा विनाश आणि स्वतःचा विकास करून घेण्यासाठीच्या दोन्हीही गोष्टी दिलेल्या आहेत. वापर त्याच्या हातात आहे. अज्ञान बुडण्याकरता दिलं, तर आत्मज्ञान तरण्याकरता दिलं. आता खऱ्या ज्ञानाची कास धरणं, हे आपल्यावरच आहे.

विचार केल्यानं हे लक्षात येतं की, पूर्ण-अपूर्ण, पूर्णत्व आणण्याचे मार्ग, त्याचं ज्ञान-हे सारं करणारे आपण आणि आपली बुद्धी ही तेवढी शुद्ध, सूक्ष्म कुठं आहे ? त्यातही बुद्धीच्या कक्षेत न येणारे-पूर्णत्व, समाधान, शांती यांसारखे विषय आपण या आपल्या अपूर्ण, अर्धवट ज्ञानाच्या, अशुद्ध बुद्धीच्या

भूमिकेवरून कसे समजून घेणार, हा एक प्रश्न आणि मार्ग कळला तरी तो चालून हे पूर्णत्व किंवा समाधान गाठायला ज्या पद्धतीचं कर्तृत्व गरजेचं आहे - म्हणजे खरंतर शरणागतीची जी गरज आहे - ते कर्तृत्वसुद्धा आपल्या या मर्यादित शक्तीला जमण्यासारखं नाही. यासाठी आपण आणि आपली ही मर्यादित बुद्धी यापलीकडं गरजेची असलेली तिसरी वस्तू म्हणजे निःस्वार्थी संत किंवा सद्‌गुरू होत. संशय, शंका, मर्यादा अशांनी ग्रस्त असलेल्या अज्ञानाच्या भूमिकेवरून पूर्णत्वाचं ज्ञान करून घेणं कठीण आहे. त्यासाठी पूर्णत्वाचा अनुभव असलेल्या, ज्ञानाच्या भूमिकेवरून ते देऊ शकणाऱ्या आणि आपल्या कल्याणाच्या व्यतिरिक्त कोणतीही अपेक्षा नसलेल्या गुरूंकडूनच आपलं हे जीवनाचं ध्येय नीट कळेल, मार्ग कळेल, त्यातले अडथळे कळतील, अडचणीत मदत होईल आणि शेवटी आपला मार्ग आपणच चालून आपलं जीवन खऱ्या अर्थानं सफल करू शकू.

आपल्या आयुष्याचं मर्म एकदा हुडकलं, ते चालण्याचा मार्ग कळला की, त्या प्रकाशात आपण आत्ता जे जगतो, ते आता थोड्या वेगळ्या पद्धतीनं आणि वेगळ्या भूमिकेनं जगतो. प्रपंच तसाच राहातो पण तो आपला मीपणा वाढवणारा न होता, तो त्यांच्या कृपेचा आणि या मार्गाला मदत करणारा ठरतो. या अर्थानं पाहायला लागलं की, आजच्या आपल्या स्वार्थाच्या, देहाच्या सुखसोयी-साधनं गोळा करीत जाण्याच्या, पैसा-प्रतिष्ठा अशांच्या मागं लागून जगण्याच्या-कल्पनांचं फोलपण आणि अनावश्यकता लक्षात येते. त्या अर्थानं खऱ्या परमार्थात आपली आजवरची मीपणाची बेसावध जीवनपद्धती चुकते आहे, हे लक्षात येतं आणि याला महाराज 'हा परमार्थाचा पहिला अनुभव आहे ', असं म्हणतात. कारण माझं बरोबर आहे म्हणणारा सुधारण्याची किंवा योग्य मार्गानं जाण्याची शक्यता नसतेच. ज्याला चुकांची जाणीव झाली, त्याचाच सुधारण्याचा आणि पूर्णत्वाचा मार्ग मोकळा होतो.

अनेकांना यात आपल्या पूर्वकर्मांची, जगताना चुकल्याची, जन्मतः घेऊन आलेल्या स्वभावाची-अशा अडचणी जाणवतात. पण खऱ्या तळमळीच्या चालणाऱ्याला त्यामुळं अडथळा येत नाही. अगदी जो स्वभावसुद्धा बदलणार नाही आणि तेवढा तरी दोष, अडचण कायम राहाणार

असंसुद्धा मानू नये, असा महाराजांचा अभिप्राय आहे. त्यांचं म्हणणं योग्य विचार, या प्रवासाला पूरक असलेला असा अभ्यास-शिक्षण, अनुकूल परिस्थितीसाठी आपले प्रयत्न आणि सत्संगतीची जास्तीत जास्त तळमळ- अशा अनेक मार्गांनी हा स्वभावसुद्धा पालटू शकतो आणि आपल्याला आपलं ध्येय गाठायला अनुकूल होऊ शकतो, याची खात्री महाराज देतात.

हे जे पूर्णत्व माणसाच्या जगण्याचं ध्येय आहे, ते मिळवण्यासाठी आपल्याला जगात पूर्ण वस्तू कोणती, याचं आकलन होणं गरजेचं आहे. जे पूर्ण आहे, ते शाश्वत असतं, आनंदमय असतं - अशी वस्तू फक्त भगवंतच आहे. त्याला मिळवणं म्हणजे कुठं जाऊन गाठण्याची किंवा मोलानं मिळवण्याची गरज नाही. प्रत्येकाच्या ठिकाणी तो विद्यमानच आहे. आपणच आपल्या या पूर्णतेच्या चुकीच्या कल्पना, अज्ञान, देहाचं अपरिमित प्रेम, व्यवहारांची गुंतागुंत, विकार, स्वार्थ - असल्या गोष्टींनी तो झाकून टाकला आहे. त्यामुळं तो मिळवणं म्हणजेच असल्या गोष्टी टाकण्याचा अभ्यास करीत जाणं आणि आपल्याला त्या भगवंताची जाणीव जागृत राहील, अशा तऱ्हेनं जगणं, हेच आयुष्यातलं खरं काम आहे. महाराज म्हणत तसं, हे काम वाटतं एवढं अवघड नाही. त्यांनी दोन उदाहरणं दिली आहेत.

महाराज म्हणाले, अग्निसारखा प्रकाशमय असलेला परमात्मा अगदी जवळ असला तरी निखाऱ्यावर राख जमावी आणि निखारा दिसत नाहीसा व्हावा, तशी आपल्या आयुष्यात देवाची अवस्था आहे. आपल्या हे लक्षात आलं आणि तेवढा निर्धार केला, निष्ठा ठेवली तर साधी फुंकर घालण्यानंसुद्धा निखारा दिसू लागतो. तेवढंच साधन भगवंताचं ध्येय गाठायला गरजेचं आहे.

दुसरं असं की, आपण एवढं विशाल जग बघतो. त्यात इतक्या असंख्य गोष्टी दिसतात. दगड-मातीपासून माणसांपर्यंत एवढे प्रकार दिसतात. पण जग इतकं विशाल असूनसुद्धा आपण, एवढेसे असलेले आपले डोळे मिटून घेतले की, ते नाहीसं होतं. तर जग आणि माझ्यासह त्या जगात मी अडकल्यामुळं मोठी वाटणारी अडचण, डोळे मिटल्यावर क्षणात जाणाऱ्या जगासारखी, निर्धारानं आणि सहज राहाण्यानं नाहीशी होऊ शकते. आपण

आपल्या या ध्येयाची वाटचाल करताना - त्यातला हा सोपेपणा जरूर लक्षात ठेवावा. त्यानं खऱ्या कामाला नेहमी उत्साह मिळत राहील.

हा प्रवास करायला लागलं, तर अनेकदा आजवरचं जगाशी जे आपलं वागणं होतं, त्यात गुंतणं होतं, त्यातलं आता कर्तव्य शिल्लक उरतं पण गुंतणं उरत नाही. त्या अर्थानं त्याची हाव उरत नाही आणि जगाच्या वागण्याचा त्रासही होत नाही. एकदा पुढच्या गावाला जायचं ठरवल्यावर पहिलं गाव सोडावंच लागतं. तसं काही वेळा आपल्याला मायेनं गुंतवून टाकणारे नातेवाईक, लोक, त्यांच्या अपेक्षा - असली गावं या प्रवासात सुटतात. त्याच्या थोड्या व्यावहारिक प्रतिक्रियाही पचवाव्या लागतात पण ती या आपल्या उद्धाराची किंमतच समजावी. यात मुद्दाम जगाशी कुठला संघर्ष करण्याची आवश्यकता नाही. कारण महाराज म्हणतात ते लक्षात ठेवावं की, माझा उद्धार, माझी भगवंताची प्राप्ती ही जगात राहाणं, त्यांचे व्यवहार सांभाळणं यांमुळं अडत नाही. खरं काय साधायचं असेल, तर माझं जे सर्व जगाशी माझेपण आहे, ते गेलं पाहिजे. त्याकरता साऱ्या व्यवहारात अनासक्त राहिलं, कर्तव्य केलं आणि स्मरण जास्तीत जास्त जागृत ठेवलं, तर आपलं ध्येय गाठणं अवघड नाही.

या ध्येयाची दुसरी बाजू म्हणजे या देहाचं, जगाचं मला वाटणारं खरेपण आणि प्रेम जाऊन, माझ्या ध्येयाचं आणि भगवंताचं खरेपण आणि प्रेम येणं - ही आहे. हे नुसते पोकळ शब्द अर्थातच आपली प्रगती घडवणार नाहीत ! त्यासाठी आपली वृत्ती बनवणं गरजेचं आहे. भगवंत निःस्वार्थी प्रेमानं आपलासा होतो, तेव्हा आपलं मनुष्यजन्माचं ध्येय पूर्ण होतं. जीवनात येणारं समाधान जीवनाला कायमचं पूर्णत्व देतं. त्या अर्थानं आपण मनुष्य म्हणून जन्माला आल्याचं कामही साध्य होतं. आजच्या जगण्याला जी स्वार्थी प्रेमाची सवय आहे, ती घालवायला सुरुवात करणं, ही या ध्येयाकडच्या वाटचालीची दिशा आहे.

त्याची अत्यंत व्यवहार्य सुरुवात सांगताना महाराज म्हणतात की, आपल्याला कितीही लांबच्या गावाला जायचं असलं, तरी त्या प्रवासाची सुरुवात जशी आपण आहोत तिथून टाकलेल्या पहिल्या पावलानं होते,

तशी या भगवंतावरच्या प्रेमाच्या लांबच्या ध्येयाची सुरुवात, 'आजवर जे कुटुंब माझ्याकरता आहे, अशा भावनेनं मी नकळत जगत होतो, त्याऐवजी आता सावधानतेनं मी कुटुंबाकरता आहे, या भावनेनं जगण्यात होते.'

ध्येयाच्या वाटचालीची सुरुवात करण्यासाठी वर सांगितलेल्या सोप्या पण अंतिमतः मोलाच्या ठरणाऱ्या गोष्टीसारखीच आणखी एक गोष्ट पाहू. या साऱ्या वाटचालीची ओळख देणारे जे संतांचे ग्रंथ, संत, सत्पुरुष, गुरू असतील त्यांचं निःशंकपणे ऐकणं आणि त्यातही त्यांच्या सांगण्यात माझं खरं कल्याण असलं पाहिजे, या भावनेनं ऐकणं आणि कृती करणं हा दुसरा मार्ग आहे. त्याचं मर्म अशात आहे की, आपल्याला एखादी गोष्ट करायला किंवा न करायला सांगण्यात गुरूला स्वतःला काहीच मिळवायचं नसतं. कारण ते तळमळीच्या निःस्वार्थी भूमिकेवर असतात. ते आपल्याला सांगतात ते अशासाठी की, त्या ऐकण्यातून, तशा कृती मनापासून करण्यातून, आपल्या ध्येयाच्या आड येणारी जी अंतिम गोष्ट - मीपणा आहे, तो मीपणा यातून अखेरीस दूर होतो. महाराज म्हणाले, 'एखाद्याला गावाला जायचं आहे. गुरूंनी जाऊ नको म्हटलं, त्यानं मनापासून ऐकून तो गावाला गेला नाही.' ही घटना वरवर पाहाता साधी वाटली, तरी त्याची इच्छा, त्याचा संकल्प, स्वतःचंच बरोबर असण्याचा मीपणाचा भाव आणि नकळत अहंकाराचा नाश एवढी त्याची व्याप्ती आहे. असं मनाविरुद्ध वागताना सुरुवातीला थोडा त्रास होतोच. पण अखेर त्यात कल्याण होतं.

इथं एक लक्षात घ्यावं की, आपल्या वाटचालीला अशी मदत करायला गुरू तयार असले, तरी अनेकांची कल्पना आपण त्यांना नमस्कार करू आणि त्यांनी त्यांच्या सामर्थ्यावर आपला उद्धार करावा, अशी असते. याबद्दल स्पष्ट सांगताना महाराज म्हणाले, 'गुरूच्या पायावर मस्तक ठेवून चालत नाही, त्याच्या आज्ञेप्रमाणं सतत वागलं, तरच तो उद्धार करतो.'

हे सारं लक्षात ठेवून मनुष्यजन्माचं खरं ध्येय गाठून आपण मुक्त होऊन गेलो, तर त्यात आपलं सार्थक तर आहेच, पण आपल्याला मनुष्यजीवन देणाऱ्या निसर्गाला-भगवंतालाही समाधान आहे !

* * *

९. लाभावीण शीण कोण करी

आपण माणसांच्या जगात जगतो. आपला आयुष्यात आई-वडिलांपासून माणसांचा जो संबंध यायला सुरुवात होते, ती आयुष्याच्या अखेरपर्यंत. काही वाट्याला येतात, काही कार्यकारणानं जोडावी लागतात, काही आपण हौसेनं जोडतो. आपण पुढंपुढं जगात मोठीमोठी गणली जाणारी कितीतरी माणसंही पाहातो. पण इतक्या असंख्य माणसांचा आयुष्यभर संबंध येऊनही एक गोष्ट किती लोक लक्षात घेत असतील, याची शंका आहे. ती गोष्ट अशी की, 'इतक्या साऱ्या संबंधात निरपेक्ष संबंध कुणाचा आहे ? ' अनेकांना तर ही गोष्ट कधी समोरही आली नसेल. आली तरी त्यावर विचार करावा, असंही वाटलं नसेल. पण आपण नीट शोध घेतला, तर लक्षात येईल की, निरपेक्ष आणि तरीही कल्याणाचा संबंध किंवा तसं माणूस हे या संबंधाच्या विश्वातलं सुवर्ण आहे. याला खूप अर्थ आहेत. त्याचा जमेल तेवढा विचार आपण करू.

जगात प्रत्येकाच्या संबंधामागं कारण आहेच आणि ते सर्वसाधारणपणे त्यांना एकमेकांची असलेली गरज, हे अगदी प्राथमिक कारण आहे आणि कळत असो, नकळत असो, ज्याला त्याला दुसऱ्याकडून आपला स्वार्थ साधावा, ही संबंधामागची मूलभूत प्रेरणा आहे. म्हणून अनेकदा संबंधांचा माणसाला उपयोग होतो, त्याचा व्यवहार चालतो. पण त्यापेक्षा त्याला संबंधांचे चटकेच आयुष्यात जास्त बसतात.

कुटुंबातली माणसं एकमेकांना दुरावणं, समाजात भेदाभेद, कटुता, द्वेष-अशा अनेक गोष्टी आपल्या अनुभवाला येतात. याचं अगदी टोकाचं स्वरूप म्हणजे सामान्यांपासून देशादेशांपर्यंत चाललेल्या कोर्टकचेऱ्या ते युद्ध, हे होय. स्वार्थ आणि अहंकार यांच्या प्रेरणा जितक्या प्रबळ होत जातील, तितकं संबंधातलं अस्वास्थ्य वाढत जातं आणि त्याचा परिणाम म्हणून त्यात्या समाजाचं जीवन निकृष्ट निकृष्ट होत जातं.

आपल्या कुटुंबात, नात्यात, मैत्रीत आपण हे कित्येकदा अनुभवतो

की, दहावेळा दुसऱ्याच्या उपयोगी पडून त्याचा स्वार्थ साधून द्यायचा प्रयत्न केला आणि अकराव्या वेळेला आपल्याला त्याला मदत करता आली नाही, तर त्याला नुसताच राग येत नाही, तर संबंध तुटण्यापर्यंत वेळ येते. अशावेळी दहा वेळच्या मदतीची आठवण ठेवण्याचं भानसुद्धा माणसाला या स्वार्थी जगात राहात नाही. म्हणून सगळीकडं असमाधान, वितुष्ट, हेवेदावे आणि त्यारूपानं अशांती माणसांना अनुभवायला येते.

एवढा अनुभव जमेला असतो. त्याचं कारण आपल्यासह सर्वजण, 'स्वार्थास तत्पर जगी जो तो तयाच्या' अशा पद्धतीनं जगत राहातो, हे आहे. त्याहीमागचं कारण अहंकार हे आहे. हे अनेकदा मनोमन लक्षात येऊनसुद्धा माणूस या अस्वास्थ्यातून सुटण्याचे मार्ग शोधीत नाही, हे नवल आहे. त्याला स्वतःला हे लक्षात येत नसेल, जमत नसेल, तर कुणा जाणत्याकडं जाऊन ते समजून घेत नाही, प्रपंचासाठी एवढे कष्ट करतो पण या शांततेच्या आणि आनंदी संबंधांसाठी वेळ द्यायला तयार होत नाही, कष्ट करायला तयार होत नाही. मायेचा पगडा इतका विलक्षण आहे की, 'हे असंच आहे आणि असंच असणार, याची तो मनाला खात्री पटवीत राहातो आणि स्वार्थ, अहंकार हे संबंधांचा जणु नैसर्गिक भाग आहेत, अशी मनाची समजूत घालतो !'

माणसांच्या संबंधांत एकमेकांच्या गरजा एकमेकांना असणार, कारण सारीच अपूर्ण आहेत. हे जरी खरं असलं, तरी असं निकृष्ट जीवन जगणं, हे सक्तीचं नाही, नैसर्गिक नाही उलट बदलण्याची, प्रगतीची गोष्ट आहे, हे जेव्हा लक्षात येईल तेव्हा निरपेक्ष,कल्याणाच्या संबंधांचा शोध होईल. तेव्हा त्याचं सापडणारं जे महत्त्वाचं उत्तर, त्याला गुरू असं म्हणतात !

कुटुंब, मैत्री, नोकरी, व्यवसाय, सामाजिक कार्यं, संस्था-अशा असंख्य संबंधांच्या बहुतांश स्वार्थी बाजारात, गुरू ही एकच अशी वस्तू आहे, जिला आपल्याकडून काही नको आहे. उलट आपल्यालाच लौकिकापासून अलौकिकापर्यंत सारं द्यायला ते तयार आहेत. त्याचं कोणतंही मूल्य त्यांना नको आहे, आपल्या कल्याणापलीकडं त्यांची त्यात कोणतीही भूमिका नाही. असं असूनही पुन्हा ते आपला संबंध कुणा व्यक्तीवर लादत

नाहीत. व्यवहारात जरा मनाविरुद्ध झालं, तर क्षमा होण्याची शक्यता कमीच उलट संबंध तुटण्याचीच शक्यता जास्त-असल्या जगात असूनही गुरू मात्र सांगून न ऐकणाऱ्याला पुन्हा सांगायला तयार होतात, वागताना चुकणाऱ्याला सावरून घेऊन चुकांना क्षमा करायला तयार होतात, त्यांना स्वतःला आपल्याकडून त्रास होत असला, तरी तो सोसून पुन्हा आपल्यासाठी ते कितीही झळ सोसायला तयार होतात-हे सारं केवळ विलक्षण आहे.

आपला लोकांचा, संबंधांचा निकृष्ट अनुभव पाहाता हे आपल्या दृष्टीनं किती मोलाचं आहे, किती दुर्लभ आहे, हे आपण विचार करून ठरवावं. जो कुणी निर्गुण भगवंत आपल्याला फक्त ठाऊक आहे, तो असलाच तर याच रूपानं आपल्याला भेटेल, हे आपल्या लक्षात येऊ शकेल. त्यातल्या त्यात आईच्या प्रेमात थोडीतरी निःस्वार्थीपणाची झलक काहींना पाहायला मिळत असेल. पण त्यात पुन्हा मायेची गुंतवणूक आहे, सूक्ष्म अपेक्षा आहेत, मुलापासून आपल्याला त्रास होऊ नये, आपली अप्रतिष्ठा होऊ नये-अशा कितीतरी गोष्टी असल्याही संबंधात आहेत.

पण गुरू स्वतः तर मायेच्या बाहेर आहेतच, आपल्यालाही मायेत गुंतवीत नाहीत. त्यांना कुठलाही लाभ नसताना ते आपला त्रास सहन करायला सदैव तयार असतात. अनेक शिष्यांमुळं गुरूंचीच अप्रतिष्ठा होत असली, तरी शिष्यांना ते टाकायला तयार होत नाहीत. उलट पुन्हा त्याच्यासाठी नव्या उमेदीनं शिणायला तयार होतात. असा निरपेक्ष, दैवी संबंध आपल्याला या जगात कुठं पाहायला मिळेल ?

अगदी तांत्रिकदृष्ट्या जरी पाहिलं, तरी हे सारं करण्यामागची त्यांची प्रेरणा केवळ दैवी इच्छा इतकीच आढळेल आणि अपेक्षा असेलच तर आपलं कल्याण व्हावं, त्यांनी स्वतः जे गुरुपद प्राप्त केलं, ते आपल्याला मिळावं, भगवंताच्या निखळ प्रेमाचा त्यांनी घेतलेला अनुभव आपल्याला यावा - यापलीकडं काही सापडणार नाही आणि तेच खरं गुरुपद. श्री महाराज किंवा हे ज्ञानेश्वर, तुकारामांसारखे अलौकिक संत-सद्गुरू ही त्याची मूर्तिमंत उदाहरणं होत. त्या अर्थानं विचार केलाच तर ते आपल्या या स्वार्थी जगाच्या बाजारात जगून गेले, यापलीकडं त्यांचा आपल्यावर कोणता

मोठा उपकार असेल ?

असा गुरूंचा संबंध शोधावा, मिळवावा, त्यातून आपला उद्धार साधून घ्यावा, असं माणसाला का वाटत नसेल, याचा विचार केला तर एक लक्षात येईल की, एकतर जगाची रीत अशी स्वार्थाची आणि गुंतवण्याची असल्यामुळं माणसाला असं काही असू शकेल, ते आपल्याला लाभेल, या कल्पनेवरच विश्वास बसत नाही. मुळात त्यालासुद्धा संस्कारानं म्हणा, वातावरणानं म्हणा, देहाचं, सुखाचं इतकं प्रेम लागलेलं असतं, स्वार्थ-अहंकार-विकार इतके खोल मुरलेले असतात की, ते त्याला मागं खेचतात. दिसलं, कळलं तरी हा मार्ग चालू देत नाहीत. काही वेळा तर मीपणाचा, अहंकाराचा पडदा इतका दाट असतो की, माणसाला डोळ्यांवर सारा आल्यावर दिसत नाहीसं व्हावं, तसं त्याचं या एवढ्या दुर्लभ गुरुपदाच्या बाबतीत होत असलं पाहिजे, असं वाटतं.

हे एका गोष्टीवरून लक्षात येतं ती अशी की, काहींना गुरूंच्या ठिकाणचं हे अलौकिक सामर्थ्य कळतं. ते त्यांच्याकडं जातातही. पण उद्धारासाठी जात नाहीत, गुरूंच्या शक्तीचा उपयोग करून आपली अडलेली कामं मार्गी लावून घ्यावी, त्यांचा वापर करून घ्यावा-अशा उद्देशानं जातात. हे करायलासुद्धा त्यांचा मुरलेला स्वार्थच कारणीभूत ठरतो, असं लक्षात येईल. अनेकजण मानतात पण प्रसंगाला त्यांचा विश्वास खरा ठरत नाही. कर्तृत्व, व्यावहारिक संबंध, सत्ता, पैसा, कोर्ट-असल्या साऱ्या गोष्टी उपयोगी पडत नाहीशा झाल्या की, मग गुरूंची आठवण होते. यावरून त्यांच्या तथाकथित विश्वासाची, निष्ठेची कल्पना आपल्याला येईल.

काहीजण गुरूंचं आज्ञापालन करतात. त्याचं त्यांना मोठं कौतुकही असतं. पण महाराजांनी म्हटल्याप्रमाणं 'प्रत्येकजण थोड्या मर्यादेपर्यंत ऐकतो. तेसुद्धा बारीकसारीक गोष्टीत. कपडे कोणते करावे, भाजी कोणती आणावी वगैरे गोष्टी विचारतो. करतोही. पण नोकरी सोडून ये म्हणून सांगितलं, तर मात्र तयार होत नाही. त्याच्या या आज्ञापालनातसुद्धा खाण्यापिण्याच्या वगैरे सोयी आहेत, तोपर्यंत त्याच्या परमार्थाची मजल आहे. खरं म्हणजे सर्व सोडून परमार्थ करण्याची गुरूची आज्ञा आहे.' ते

पाळणाऱ्याची सगळी जबाबदारी घेण्याचं त्यांचं सामर्थ्यही आहे. पण इथंपर्यंत जाणारे कमीच. म्हणूनच गुरूंसारखे एवढे 'लाभावीण शीण करणारे' असूनसुद्धा उद्धरणारे कमी आढळतात, त्याचं कारण हेच आहे. ते दूर करणं आपल्याच हातात आहे.

काहींना या संतांबद्दल, गुरूंबद्दल कळलं तरी त्यांची जिज्ञासा मर्यादित असते. ती पुन्हा लौकिक स्वरूपाचीच असते. त्यांचं नावगाव काय, ते शिकले काय, साधना कुठली, गुरू कोण, राहतात कुठे, त्यांचा प्रपंच कसा आहे, त्यांची घरदारं, व्यवहार कसे आहेत-असल्या गोष्टी समजून घ्यायला जातात. तेवढ्यातच राहतात.

वास्तविक, गुरूकडं जावं, तर आपण स्वतः कसे आहोत, कसं असायला हवं, त्यासाठी काय करायला हवं-अशा गोष्टी समजून घ्याव्यात. खरे गुरू आरशासारखंच काम करीत असतात. त्यांच्याकडं जाऊन आपल्याच जीवनाचा ग्रंथ वाचायचा असतो. त्यांचे भौतिक तपशील कळून त्याचा उपयोग नसतो. त्यासाठी जाऊही नये. ते जाणं म्हणजे आरशाची काच कुठली, चौकट कसली, त्याला माउंट कोणती आहे, चौकटीचा प्रकार, रंग कसला आहे-असल्या गोष्टींसाठी आरशाकडं गेल्यासारखं आहे. अर्थातच, म्हणूनच अनेकांना गुरू असून, त्यांच्याकडं वारंवार जाऊनसुद्धा त्यांना आत्मदर्शन होत नाही.

संतांच्या आणि आपल्या भूमिकेमध्ये मुळात फरक आहे. तो जर समजून घेतला नाही, तर संतांचा खरा फायदा होत नाही. संत खरंतर ईश्वराच्या भूमिकेवर जगत असतात. महाराज म्हणाले तसं, 'त्यांचं स्वरूप, कार्य हे आपल्या देहबुद्धीच्या पलीकडची गोष्ट आहे.' लोकांच्या उद्धाराचं, त्यांना भगवंताच्या निःस्वार्थी प्रेमाची कल्पना आणून देण्याचं, ते प्रेम त्यांच्यात निर्माण करण्याचं त्यांचं कार्य असतं.

महाराज म्हणाले, 'आपली परमोच्च भूमिका सोडून आमच्यात येऊन ते त्यांना करावं लागतं. परंतु अंतरी ते अलिप्त असतात. एखादा संत आपल्या जवळ असेल, तरी तो संत आहे हे आपल्याला कळणार नाही. कारण त्याचं संतपण आतल्या वृत्तीत असतं. बाकी सर्व व्यवहार संत

आपल्यासारखेच करतात.'

हे सारं अशासाठी समजून घ्यायचं की, त्यांच्या स्थितीची आणि कार्याची आपल्याला कल्पना असेल, तर आपलं कामही आपल्याला नेमकं करता येईल. आपण पूर्ण प्रापंचिक भूमिकेवर आणि ते अंतरी पूर्ण भगवंताच्या भूमिकेवर-असं मुळातच अंतर आहे. त्यात इतका फरक आहे की, तो स्पष्ट करताना महाराज म्हणतात, 'आपल्याला कोरून काढलं तरी प्रपंचच निघेल. संतांना कोरून काढलं तरी भगवंताचं प्रेमच निघेल !'

आपण हे लक्षात घ्यावं की, भूमिकांमध्ये इतका विरोध असताना आणि त्यांना कोणताच वैयक्तिक लाभ नसताना आपल्याला या आसक्तीच्या प्रपंचातून बाहेर काढणं, भगवंताची गोडी लावणं, त्याला गुरुपदाला नेणं, अशी कार्यं ते अथक करीत असतात.

श्री पंत महाराजांच्या शेवटच्या आजारात लोकांच्या भेटीगाठी पूर्ण बंद होत्या. अंतकाळ जवळ आला होता. तरीसुद्धा मुंबईहून एक जिज्ञासू साधक अनुग्रहाची ओढ लागून बाहेर आले होते. कुणी त्यांना अर्थातच सोडलं नाही. तरी ते वाट पाहात बसून राहिले होते. पंतांच्या कानी हे गेलं. त्यांनी खुणेनं तशाही अवस्थेत त्यांना आत सोडायला सांगितलं. जवळ बसवून अनुग्रह देऊन त्यांचं जीवन कृतार्थ केलं. त्यांच्या देहातल्या आयुष्यातले ते अखेरचे शिष्य. इतरांचा अर्थातच हे करण्याला पंत महाराजांच्या प्रकृतीमुळं विरोध होता. पण त्यांना पंत म्हणाले, अरे तो माझा बाळप्पा आहे ! बाळप्पा महाराज हे श्री पंतांचे गुरू. त्यांनी हा अनुग्रहाचा अधिकार दिला. आयुष्याच्या शेवटच्या क्षणीही या गुरूंनी दिलेल्या विद्येचा कुणाच्या कल्याणाला उपयोग होत असेल, तर ती आपली गुरूंनी घेतलेली परीक्षा आहे, इतकी सावधानता त्यांच्यात एका बाजूनं दिसते, तर आलेल्याच्या तळमळीचं सार्थक करून त्याच्यावर कृपा करण्याची त्यांची दैवी बुद्धीही प्रत्ययाला येते. 'जगासाठी झिजविती जीवा', या उक्तीचा गुरूंच्याकडं प्रत्यय येतो, तो असा. यातून आपण जरूर काही शिकावं.

आपल्या पूर्ण स्वार्थाच्या आणि त्यांच्या पूर्ण निःस्वार्थाच्या जीवनपद्धतीत असा विरोध असतानासुद्धा संतांनी प्रापंचिकांमध्ये वावरून

त्याबद्दल तक्रार न करता लोकांना निःस्वार्थी करण्याचं, त्यांना भगवंताचं प्रेम लावण्याचं, त्यांना विषयांच्या आणि विकारांच्या पकडीतून सोडवण्याचं काम अलगद केलं आणि ते करतानासुद्धा महाराजांसारख्यांनी आपल्या प्रेमानं लोकांना आपलंसं केलं. म्हणून म्हटलं आहे की, 'नकळत सकळा वळण लाविते, तरी लागतो लळा ! ' अशी ही गुरूंच्या, संतांच्या उपदेशाची लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना जवळ करणारी, त्यांच्यावर कृपा करणारी 'शाश्वत शाळा' आहे. या शाळेत शिकण्याचे अनेक मुद्दे आपण आत्तापर्यंतच्या मर्यादेत पाहिले आहेतच. पण याच्या शाश्वततेबद्दल सांगताना महाराज म्हणतात, सृष्टीच्या सुरुवातीपासून हा भगवंताचा मार्ग चालत आलेला आहे. त्यात त्या अर्थानं वेगळं, नवीन असं नसून आजच्या काळाच्या, परिस्थितीच्या, माणसांच्या मनोवृत्तीच्या पार्श्वभूमीवर - सांगण्याची भाषा, मुद्दा, उदाहरण - अशा गोष्टी बदलल्या असतील. तरी शाश्वत भगवंत तोच, मार्ग तोच आणि मिळणारा आनंदही तोच, जो ऋषीमुनींपासून आजकालच्या महाराजांसारख्या संतांपर्यंत सर्वांनी अनुभवला आणि सांगितला.

संतांच्या सहृदयपणाची कल्पना करणंही सामान्य, कोरड्या, स्वार्थी प्रापंचिकाला कठीण आहे. तरीही अशा संतांच्या ग्रंथांच्या, जीवनाच्या अभ्यासानं ते शिकता येईल. यासाठी त्यांची सहृदयता किंवा आपल्यासाठी खाली येण्याची तयारी किती आहे, हे थोडं पाहावं. वास्तविक, या संतमार्गानं जाण्यात खरं कल्याण आहे, ही निःसंशय खात्री आणि अनुभव असूनसुद्धा महाराज म्हणाले की, 'जर एखादा माझ्या प्रपंचात मी सुखातच आहे, असं म्हणत असेल, तर त्याला हा मार्ग सांगायला जाऊ नये ! ' आपण विचार करावा, आपल्याला एखादी गोष्ट नुसती माहिती झाली, चांगली आहे हे कळलं, तरी स्वतः काही न करता, त्याचा अनुभव नसतानासुद्धा दुसऱ्याला ती सांगण्याची ऊर्मी आपल्याला आवरत नाही. पण कल्याण कळूनसुद्धा एखाद्याची ऐकण्याची मनःस्थिती नसली, तर त्यांची त्याच्या कल्याणासाठी सांगताना थांबण्याची केवढी तयारी असेल !

आणखी एक प्रसंग लक्षात घेण्यासारखा आहे. महाराजांकडून उपदेश घेतलेली एक व्यक्ती त्याचा अवलंब करू शकली नाही. उलट

व्यसनांसारख्या गोष्टींत अडकून दूर गेली. अर्थात लोकांनीही त्यांना दूर केलं. इतकं की, त्या गावी श्री महाराज ज्या घरी उतरले होते, त्या घराच्या मालकांनी आणि इतरांनीही हे गृहस्थ बाहेर आले असता, गेटवरूनच महाराज भेटणार नाहीत, असं परस्पर सांगून टाकलं. पण आपल्या वागण्याचा पश्चात्ताप होऊन भेट मिळाली नाही, तरी ते गेटच्या बाहेर बसून राहिले. ते बाहेर आहेत याची महाराजांना कुणी कल्पनाही दिली नाही. महाराजांनीच भेटीचे लोक संपल्यावर, बाहेर अजून एक गृहस्थ आहेत, त्यांना आत पाठवा अशी आज्ञा केली. त्यामुळं त्यांना आत सोडणं भाग पडलं. महाराज जवळ बसवून घेऊन त्यांना म्हणाले, 'सगळ्या जगानं तुम्हाला टाकलं तरी मी तुम्हाला टाकणार नाही ! '

आपल्या कल्याणासाठी ही गुरुमार्गाची वाटचाल करायची असली, तरी त्यात देहातल्या गुरूंकडं जाताना माणसाची बुद्धी आड येण्याची शक्यता असते. तिचा विचारही महाराजांनी करून ठेवला आहे. ते म्हणाले, 'गुरू झाला तरी मनुष्यच आहे. त्याच्यामध्ये काहीतरी दोष दिसणं आणि त्यामुळं त्याच्याविषयी अश्रद्धा उत्पन्न होणं शक्य आहे.' त्यासाठी शास्त्र किंवा संतग्रंथ यांच्या आधारानं चालावं. गुरू शोधेपर्यंत बुद्धी पूर्ण चालवावी. नंतर मात्र गुरुपदाची जबाबदारी असलेल्या भगवंतावर पूर्ण विश्वास ठेवून गुरू सांगेल तसं वागावं. त्यात आपली देहबुद्धी आणू नये. असं वागणाऱ्याचं कल्याण करण्याची जबाबदारी गुरूवरच नव्हे, तर भगवंतावरही आहे, हे लक्षात ठेवावं. गुरूत दोष पाहण्यातसुद्धा आपली चूक होण्याची शक्यता असते. कारण ते ज्या पातळीवर आणि ज्यांच्या प्रेरणेनं जगतात, तिथं आपल्याला पोचणं अवघड असतं. अशा मार्गानं ही थोडीशी हानीही टळू शकेल.

सारांशानं, आपल्याला या स्वार्थी आणि त्यामुळं दुःखाच्या ठरणाऱ्या प्रपंचाच्या कचाट्यातून, तो न टाकता, अलगद सोडवून आपलं आनंदमय भगवंताशी कायमचं नातं जोडून देणाऱ्या आणि तेही निरपेक्षपणे आणि केवळ आपल्या कल्याणासाठी करणाऱ्या महाराजांसारख्या गुरूंचा शोध घ्यावा आणि आपलाच उद्धार आपण करून घ्यावा, हे उचित होईल !

* * *

विभाग : दुसरा

‘बोधाचे सुवर्णकण !’

****
*****
***
**
*

बोधकृपाशब्दे सावधान, केले रे !

संतांची सर्वांत मोठी कृपा ही की, ते स्वतः मुक्त असून आपल्या या स्वार्थांनी आणि विकारांनी बद्ध माणसांत जगणं त्यांनी पत्करलं. खरं पाहाता, त्यांच्यावर तसं बंधन त्या अर्थानं नव्हतं. कित्येक महापुरुषांनी निर्जन स्थळी राहाणं पसंत केलं. पण भगवंताच्या प्रेरणेनं काही संतांनी आपल्यात येऊन, मिसळून, राहून, आपलं सारं सहन करून अक्षरशः 'घरी, मंदिरी, झाडाखाली, झोपडीत, महाली' या परमार्थाच्या शाळा चालवल्या.

जगरहाटीप्रमाणं मीपणा, देहसुखाची साधनं, मोठेपणाच्या-प्रतिष्ठेच्या पोकळ कल्पना-यामागं धावणाऱ्या सामान्यांच्या जगात राहूनही, त्यांनी या आसक्तीत रमलेल्यांना बोध करून, स्वतः झळ सोसून सोसून आसक्तीतून अलगद सोडवलं. त्यात्या काळच्या रूढी, अवडंबरं, समजुती, धर्मबंधनं, देवांच्या-परमार्थाच्या विपरीत कल्पना, समाजाच्या ठेवणी-अशा अनेक गोष्टींत सामान्य माणसं नकळत अडकलेली असतात. त्यामुळं त्यांचा खऱ्या देवाकडचा प्रवास अडखळतो. संतांनी हे दूर करताना अनेक लोकांचे विरोध, निंदा, आघात हेही सहन केलं. पण ईश्वरी कार्य सुरूच ठेवलं.

श्री महाराजांनी असंच कार्य करताना व्यवहाराच्या आणि परमार्थाच्या ज्या अनेक गरजेच्या गोष्टींत सावधान केलं, त्यांत अनेकदा अवडंबरांना-समजुतींना धक्का आहे,काल्पनिक अडथळ्यांना मार्ग आहे, आड येणाऱ्या गोष्टींच्या तक्रारींना योग्य उत्तर आहे. खऱ्या परमार्थाचा प्रवास करण्यासाठी शिकू इच्छिणाऱ्यांना या बोधाच्या मननानं हा सार्थकाचा प्रवास सोपा होवो, ईश्वरीकृपेनं लवकर होवो ! या शिकवणुकीचं मोल जाणून वेचलेले हे काही -

'बोधाचे सुवर्णकण !'

१.

● देहाचं प्रेम ●

निसर्गाक्रमानं माणसाचं शरीर थकतं. मनुष्य पराधीन होत जातो. त्याच्या स्वतःच्या साध्यासाध्या गोष्टींसाठीसुद्धा त्याला दुसऱ्यावर अवलंबून राहावं लागतं. मदतीला माणसांना बोलवावं लागतं. नोकरी-धंद्यामुळं मोठी माणसं आणि शिक्षणामुळं तरुण मुलं दिवसभर बाहेर असतात.

अशा घरांतून तर वृद्ध माणसांसाठी नोकरचाकर ठेवावे लागतात. ते या वृद्ध माणसांच्या मनाप्रमाणं अनेकदा कामं करत नाहीत. पण माणसं मिळणंही कठीण असतं, म्हणून या इतर कर्त्या माणसांसमोर काही पर्यायही नसतो. या आहे त्या माणसांशी जुळवून घेताना या वृद्ध माणसांची चिडचिड होते. त्याचा परिणाम त्यांचं स्वास्थ्य जाण्यात, तो राग पुढं मोठ्यांच्यावरही निघण्यात होतो. संबंधांत उगाचच अस्वास्थ्य निर्माण होतं.

निसर्गाक्रमानं वार्धक्य येऊन असं पराधीनपण येणं, हा एक भाग झाला. पण काहींच्या वाट्याला अनेकदा अपघातांनीसुद्धा पराधीनता येते. ती काही वयावर अवलंबून असते, असं नाही. काही अपघातांनी येणारी व्यंगं, उणिवा यांच्यावर दीर्घकाळ उपचार चालतात. काही गोष्टी बऱ्या न होणाऱ्याही असतात. त्यानंही असं पराधीनपण येतं.

दुर्दैवानं असे अपघात होऊन येणाऱ्या पराधीनपणाबरोबर आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळं मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, कर्करोग-अशा असंख्य प्रकारच्या व्याधींना माणसांना सामोरं जावं लागतं. काही व्याधींच्या बाबतीत उपचार, पथ्यं यांच्या नियमिततेनं ते आजार आटोक्यात राहातात. पण पूर्णपणे जात नाहीत आणि जरा ढिलाई झाली, तर ते परत आटोक्याबाहेर जाऊ शकतात. त्यात आजकालच्या उपचारांनीसुद्धा नवी आजारपणं निर्माण होतात, ती वेगळीच. वर उल्लेखलेल्या व्याधींतल्या काही व्याधी असाध्य स्वरूपाच्या असतात. त्यात येणारी पराधीनता ही अर्थातच जास्त असते आणि किती काळ सोसावी लागेल, हेही सांगता येत नाही.

असल्या परिस्थितीत आपल्याला असं पराधीनपण वाट्याला येऊ

नये, त्यामुळं आपल्या बाबतीत खर्चाचा, कष्टांचा बोजा इतरांवर पडू नये, असं माणसाला वाटत असतं. हे वाटणं वरवर पाहाता प्रामाणिक आहे, योग्य आहे, असंच वाटेल.

पण यात खऱ्या परमार्थाचा आपल्याला अभ्यास करायचा असेल, तर महाराज म्हणतात ते लक्षात घेणं आवश्यक आहे. मुळात परमार्थ हा देहावर आपलं असलेलं प्रेम, आसक्ती कमी करण्याचा आहे. त्यापासून मुक्त होण्याचा आहे. त्या दृष्टीनं विचार केला, तर आपल्यापासून दुसऱ्यांना त्रास होऊ नये म्हणून, देह पराधीन होऊ नये, असं वाटणं हे प्रामाणिक दिसलं तरी महाराज म्हणतात की, 'तेसुद्धा देहाचं एक प्रकारचं प्रेमच आहे.' माझ्या देहापासून दुसऱ्यांना त्रास होऊ नये, असं वाटण्यात मी अजूनही देह माझा समजतो आणि तो माझ्या नियंत्रणात असावा, इतका सूक्ष्म अहंकार आहे, हे क्वचित लक्षात येतं. महाराजांनी त्याबद्दल सावध केलं आहे.

आयुष्यभर सुदृढ देहाच्या अनुकूलतेमुळं कर्तबगारी करण्याची सवय झालेल्यांना या पराधीनपणाचा जास्त त्रास होतो. याच्यामागं आपण कुणावर अवलंबून नाही, या भावनेनं जो अहंकार वाढला, तो या पराधीन होण्यात आड येत असतो. दुसऱ्याला त्रास होऊ नये, असं वाटणं, म्हणणं हे बाह्यतः प्रामाणिक वाटलं तरी आता प्रत्येक गोष्टीसाठी दुसऱ्यावर अवलंबून राहण्यात, अहंकाराला जो धक्का बसतो, तो खरा नडतो, आतून दुःख देतो. अर्थात पारमार्थिक दृष्टीनं विचार करण्यात इतरांना होणाऱ्या त्रासाबद्दल काही न वाटणं, असं अभिप्रेत नाही किंवा त्रासाचं समर्थनही नाही, हे समजून घ्यावं.

वास्तविक आपलं जर देहावर प्रेमच नसेल, त्याची आसक्ती नसेल, तो भगवंतावर सोडलेला असेल, तर ते पारमार्थिक जगण्याचं लक्षण आहे. तो देह स्वाधीन असला, तरी भगवंताच्या इच्छेनंच-माझ्या कर्तृत्वानं नव्हे आणि पराधीन असला, तरी भगवंताच्या इच्छेनं आणि परमार्थातलं काही शिकण्यासाठीच असतो, हे लक्षात घेतलं, तर या पराधीनपणाचा त्रास नाही, त्यामुळं स्वतःला आणि इतरांना अस्वास्थ्यही नाही !

●

२.

● नोकरीतली दुःखं ●

प्रपंचाची जबाबदारी घेतली म्हणजे माणसाला त्याच्या कुवतीनुसार मिळेल तशी नोकरी करावी लागते. त्यात अगदी शिपायाच्या शरीरकष्टांच्या कामापासून, साहेबांच्या मानसिक तणावाच्या आणि जबाबदारीच्या नोकऱ्यांपर्यंत सगळे प्रकार येतात. नोकरीच्या ठिकाणी एक व्यवस्थापन असतं. त्यात पदं, अधिकार यांच्या चढत्या उतरत्या श्रेणी असतात. प्रत्येकाला निर्णय घेण्याचे, त्यात्या श्रेणीप्रमाणं अधिकार असतात. त्यात्या कामाप्रमाणं त्यात्या नोकरीत ज्याचात्याचा पगारही कमीजास्त असतो.

वास्तविक नोकरी करणाऱ्याला याची कल्पना असायला पाहिजे. नोकरी लागण्यापूर्वी तो बेकारीच्या किंवा दुसऱ्या ठिकाणच्या कमी प्रतीच्या नोकरीत असताना, या नोकरीसाठी कितीतरी धडपडत असतो. त्यासाठी कोणतंही काम करण्याची, जबाबदारी स्वीकारण्याची, जादा वेळ द्यायची तयारी ठेवीत असतो. अनेकदा नोकरीची संधी आली नाही, तर त्याच नोकरीसाठी तो व्याकुळ झालेला असतो. नोकरी मिळण्याच्या क्षणाची वाट पाहात असतो. मिळाल्या क्षणी त्याला आनंद होतो, हे स्वाभाविक आहे. पण ती मिळाल्यावर त्याची सगळी व्याकुळता, वाट पाहाणं, कुठल्याही कामाची तयारी असणं-हे तो कधी विसरून जातो, हे त्यालाच कळत नाही.

तो तिथं एकदा रुळला आणि त्यातही कायम झाला, तर त्याच्या मनाला एक बेसावधता येते. त्याला हा स्थैर्याचा भ्रम कारणीभूत असतो. कारण कायम झालं तरी, अगदी रीतसर अनेक कारणांसाठीसुद्धा, त्याची ती नोकरी जाऊ शकते. पण या भ्रमात तो हे सारं विसरून जातो.

मग आपण अनेकदा अशा तक्रारी ऐकतो, मला हवं होतं ते काम दिलं नाही, ज्याला ते येत नाही त्याला ते दिलं गेलं, माझ्यावर अन्याय झाला, हे एकदा वाटू लागलं की, आहे त्या कामातही माणसाचं लक्ष लागत नाही, त्याच्या डोक्यातून याचं शल्य जात नाही.

काही लोक म्हणतात, कारण नसताना मला वरिष्ठांची बोलणी

खावी लागली, न झालेल्या कामांना काही मी सर्वस्वी जबाबदार नव्हतो, पण माझी वाईट शब्दांत हजेरी घेतली गेली, अपमान केला गेला.

काहीजण म्हणतात, मी संस्थेसाठी जीव तोडून राबलो, अपेक्षेपेक्षा जास्त फायदा संस्थेला मिळवून दिला, पण प्रमोशन देताना मला डावललं गेलं, माझ्या डोळ्यांदेखत पुढंपुढं करणारी, खालून आलेली, अकार्यक्षम माणसं बढती मिळवून गेली. याचं दुःख, खंत अनेकांच्या डोक्यातून वर्षानुवर्षं जात नाही. अनेकांना नोकरी सोडल्यावरसुद्धा असे अपमान, दुःख, त्रास विसरता येत नाहीत. अगदी नामाला बसलं तरी त्यात्या वेळी आणि असं नंतरही त्यात लक्ष लागत नाही. अपमान डोक्यातून जात नाही.

अशा लोकांनी श्रीमहाराजांनी जे सत्य समोर ठेवलं आहे आणि आपल्याला सावध केलं आहे, ते लक्षात घेणं किती मोलाचं आहे ! महाराज म्हणाले, नोकरीत आपल्याकडं पद असलं, अधिकार असले तरी त्यामुळं जे स्वातंत्र्य आणि सत्ता असल्याचं आपल्याला वाटतं, तो खरंतर भ्रम आहे. आपण सुरुवातीला नोकरीचं स्वरूप पाहिलं, त्यात हे सारं गृहीत धरलेलं आहे. महाराज पुढं स्पष्ट म्हणाले, नोकरी ही कितीही प्रतिष्ठेची वाटली, तरी ती 'संभावित म्हणजे प्रतिष्ठित भीक आहे', हे कधी विसरू नये. आपल्याला गरज म्हणून आपण त्यांच्या दारात उभे राहातो, तो दिवस विसरू नये. मग या गोष्टींचा असा त्रास होणार नाही.

महाराज अन्यत्र म्हणतात, 'नोकर म्हणून जिथं संबंध आला, तिथं कुठलंही पद असलं तरी अपमान हा आलाच. नोकरी अपमानाचीच आहे.' आपला अनुभवही हे सांगतो की, उच्चउच्च पदावरच्या लोकांनासुद्धा नोकरीत त्यांच्यापुढं कुणीतरी वरिष्ठ असतोच आणि वेळ आली तर तो अशा पदावरच्या लोकांचासुद्धा अपमान करायला मागंपुढं पाहात नाही. तीच वेळ त्याच्यावरही येऊ शकते, हे लक्षात ठेवावं. भिक्षा, अपमान हे नोकरीचं वास्तव आहे, तर 'नोकरीत दुःखं' राहणारच. जर हे कायमचं लक्षात राहिलं, तर त्रास वाचेलच पण असल्या गोष्टी आपल्या नामाच्या आडही येणार नाहीत !

•

३.

● प्रवासातली माणसं ●

मनुष्य समाजात राहातो. पण त्यातही तो जास्तीत जास्त काळ आणि अधिक जवळिकीनं त्याच्या कुटुंबात राहातो. त्याच्या कुटुंबातल्या माणसांचा त्याचा संबंध चोवीस तासांचा असतो. वेगवेगळ्या नात्यांनी तो त्यातल्या माणसांशी बांधला गेलेला असतो. तशी गरज म्हणून पाहिलं, तर सगळ्यांचीच एकमेकांना गरज असते. नुसत्या मोठ्यांचीची लहानांना गरज असते, असं नाही तर अनेकदा लहानांचीसुद्धा मोठ्यांना गरज असते.

रोजच्या जेवणाखाणापासून लग्नाकार्यांपर्यंत अनेक बाबतीत कुटुंबातली माणसं बरोबर असतात. एकमेकांना हक्कानं मदत करतात, मागतातही. त्या अर्थानं मनुष्य घरी आल्यावर जसा एक प्रकारे निवांत असतो, तसा तो त्याच्या प्रपंचात असला, त्यात त्याला राहाता आलं म्हणजे त्याला एक प्रकारचा निवांतपणा किंवा सुख लाभतं.

पण याच्याच बरोबर हाही अनुभव कुटुंबातल्या जवळजवळ प्रत्येक माणसाला आयुष्यात कधी ना कधीतरी, किंबहुना सततच येत असतो की, जितकं सुख त्याला कुटुंबाकडून-त्यातल्या माणसांकडून होत असतं, तितकं किंवा त्यापेक्षा जास्त दुःख, निराशा, अपेक्षाभंग- असलेही अनुभव त्याला कुटुंबियांकडूनच जास्त येतात. जगाचा संबंध कारणाकारणानं येतो. तिथलं सुखदुःखही तसंच कारणाकारणानं मिळतं. पण या कुटुंबाच्या जवळच्या आणि नित्याच्या संबंधांमुळं हे असं दुःखही त्याला नित्यच मिळत राहातं. प्रत्येकाच्या ते घेण्याच्या, सांगण्याच्या, आपल्यातच ठेवण्याच्या, मनातच कुढत राहण्याच्या, कधी प्रसंगानं बाहेर ते सांगण्याच्या पद्धती-अर्थातच ज्याच्यात्याच्या स्वभावाप्रमाणं वेगवेगळ्या असतात.

एखादी वस्तू मागितली-ती वेळेवर मिळाली नाही, एखादं काम सांगितलं-केलं नाही, असल्या साध्यासाध्या गोष्टींपासून माणसाच्या वाट्याला याच प्रपंचात कुटुंबातून दुःख येत असतं. अगदी तळहातावर वाढवलेलं मूल आयुष्यातले निर्णय घेताना त्याच्या आईवडिलांचा साधा

विचारही घेत नाही. अनेकदा कुटुंबातून विभक्त होतं-इथंपर्यंत सगळे अनुभव प्रापंचिक माणसं आपापल्या परीनं जगभर घेत असतात.

हे दुःख नित्याचं, जवळचं आणि सर्वांचं असल्यामुळं त्याचा विचार महाराजांनी केला आहे. मुळात हे दुःख अशामुळं येतं की, जगात वावरताना माणसाला स्वतःची एक प्रतिमा जपायची असते. त्यामुळं त्याचे स्वार्थ, विकार, आग्रह यांना मुरड घालूनच त्याला जगावं लागतं. पण कुटुंबात मात्र त्याला वाटतं, ही माणसं माझी हक्काची माणसं आहेत. त्यामुळं त्याच्या या साऱ्या प्रवृत्ती तिथं जास्तीत जास्त वावरतात. अपेक्षा नकळत खूप वाढतात. अर्थातच त्यांचा भंग होण्यानं दुःखही खूप वाढतं. म्हणजे याचं मूळ जगातल्या माणसांत आणि कुटुंबातल्या माणसांत आपण मनानं जो फरक गृहीत धरलेला आहे, त्यात आहे. म्हणून महाराजांनी सांगितलं, 'प्रवासातल्या माणसांवर आपण विश्वास ठेवतो, अपेक्षा बाळगतो तितकंच बायकोमुलांच्या बाबतीत ठेवावं, अधिक नाही आणि सर्वांनी तसंच म्हणावं.'

आपण एखाद्या स्टेशनवर रेल्वेत बसतो. त्यावेळेला तिथं कुणीतरी प्रवासी आधी डब्यात बसलेलेच असतात. गाडी पुढं जात जाते. स्टेशनं लागतात. वेगवेगळे प्रवासी येऊन बसतात. आपली ओळख निघते, अगदी आपण जेवतोखातोसुद्धा बरोबर. मोठ्या प्रवासात तर सामानावर लक्ष ठेवायला सांगण्यापासून सगळ्या गोष्टी होतात. ज्याचंत्याचं स्टेशन आलं की, तो उतरून जातो. आपण निरोप घेऊन मोकळे होतो. कुटुंबातसुद्धा आपल्या आयुष्यभराच्या प्रवासाची परिस्थिती खरंतर अशी आहे.

येतो तेव्हा आईवडील आधीच डब्यात बसलेले असतात. पुढच्या स्टेशनवर मुलंबाळं डब्यात येतात, मोठी होतात. आपली स्टेशनं आली की, उतरून निघून जातात. त्यावेळी त्यांच्याशी या प्रवासातल्या माणसांसारखं आपल्याला वागता आलं, प्रवासात जशा, जेवढ्या अपेक्षा कमी असतात, तेवढ्या ठेवता आल्या, तर आपल्या आयुष्यातल्या या एका मोठ्या दुःखातून सुटून आपण साधनेला मोकळे होऊ, नाही का ?

●

४.

● सावल्यांची सोबत ●

माणसाला कर्मं टळत नाहीत. टाळण्याची गरजही नाही. त्याचं साध्य काहीही असलं, तरी ते गाठायला मुख्यतः ही कर्मंच उपयोगी पडतात. त्याच्या पोटपाण्यापासून सगळ्या गोष्टींसाठी त्याला अखंड कर्म करीत राहावं लागतं. त्याच्यात्याच्या संस्कारांप्रमाणं, समजुतींप्रमाणं तो त्याच्या साध्य करण्याच्या गोष्टी ठरवतो. अनेकदा घरातल्या संस्कारांप्रमाणं ठरलेली मुलांची ध्येयं, ती मुलं मोठी झाली, बाहेर पडली, इतरांच्या सहवासात आली की, बदलतात. पण ध्येयांकडचा प्रवास मात्र सुरूच राहातो.

मनुष्य शिक्षण घ्यायला गेला, तर त्याला मनासारख्या साईडला-गावी-संस्थेत प्रवेशात अडचणी येतात. कधी ते सारं झालं, तरी कुणाला त्याच्या मनासारखी जेवणाखाणाची सोय होत नाही. तिथलं हवामान मानवत नाही. याही गोष्टी झाल्या तरी काही वेळा मनासारखी संगत मिळत नाही. तेही साधलं तरी, एरवी घरी असताना घराचं न वाटणारं महत्त्व, बाहेर गेल्यावर वाटायला लागतं. त्यातून कुणाला होमसिकनेस येतो. या साऱ्या अडीअडचणींचा परिणाम त्याच्या शिक्षणातल्या प्रगतीवर, दर्जावर होतो.

अडचणी अशा एकमेकांत गुंतलेल्या असतात. अशा स्वरूपाच्या वरच्या अडचणींवर मात करता आली नाही किंवा त्या नीट समजून घेता आल्या नाहीत, त्यावर कसा विचार करावा हे कळलं नाही, तर शिक्षणावर जो परिणाम झालेला असतो, त्यापोटी कमी मार्कांनी किंवा कसंतरी पास व्हावं लागतं. त्यामुळं चांगली नोकरी मिळताना पुन्हा अडचण येते.

खरंतर आपल्याला अडचणींचा प्रश्न नीट सोडवता आला नाही किंवा त्यांच्याकडं बघण्याची दृष्टी आली नाही, यात दोष असेल, तर तो आपलाच आहे. मग त्याचा परिणाम म्हणून अशी चांगली नोकरी मिळण्यात आलेली अडचण खरंतर मान्य व्हायला हवी. पण अनेकांना ते जमत नाही. कारण कमी पगाराच्या किंवा साध्या ठिकाणच्या नोकरीमुळं त्यांच्या ज्या उच्चभ्रूपणे जगण्याच्या कल्पना असतात, त्यात अडचणी निर्माण होतात. वास्तविक

माणसानं त्याच्या कुवतीला योग्य असलेली आणि मिळालेली नोकरी अडचण न समजता स्वीकारायला हवी. त्याप्रमाणं जगायला हवं.

असा लहानपणी सुरू झालेला हा अडचणींचा प्रवास शिक्षण, नोकरी, धंदा, गिऱ्हाईक, प्रकृती, कुटुंबातली माणसं, छंद, आवडीनिवडी, समाजकार्यं-अशा साऱ्या बाबतींत आणि साऱ्या माणसांच्या आयुष्यात जवळजवळ अखेरपर्यंत सुरू राहातो. अडचणींवर मात करणारे लोक हे तसे अपवादभूत असतात आणि तेही या ना त्या अडचणीत असतातच.

म्हणून या अडचणी आणि त्यामुळं अनेकदा येणारं नैराश्य, दुःख, इतरांना-परिस्थितीला-व्यवस्थेला दोष देण्याची प्रवृत्ती या साऱ्या गोष्टींचा विचार करताना श्री महाराज म्हणतात, 'वस्तूबरोबर तिची सावली येते. जगात आपल्याला येणाऱ्या अडचणी या आपल्या सावलीसारख्याच आहेत आणि त्या अर्थानं विचार केला, तर त्या आपल्याबरोबरच जाणार.' अभिप्राय असा की, आपण वर पाहिल्या त्यांतल्या अनेक अडचणी या आपल्या प्रारब्धामुळं, चुकीच्या कर्मांमुळं, योग्य वेळी मार्गदर्शन न घेण्यामुळं, आग्रहांमुळं - अशा आपल्याच ठिकाणच्या अनेक गोष्टींमुळं येत असतात. या अर्थानं ती आपल्याच कर्मांची-स्वभावाची सावली असते. या अडचणींच्या दुःखातून, कचाट्यातून सुटण्याचे दोन मार्ग आहेत.

स्वतःमुळं निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्यासाठी आपली समजूत विकसित करणं आपल्याच हातात आहे. ते अशा महाराजांसारख्या संतांच्या उपदेशानं करता येईल. दुसरं असं की, आपण भगवंताच्या इच्छेवर जगत असलो तर, काहीही झालं तरी ती अडचण न वाटता भगवंताची इच्छा वाटेल. पहिला मार्ग अहंकाराच्या उन्हात उभं न राहाण्याचा आहे. तर दुसरा देवाच्या इच्छेच्या छत्राखाली राहण्याचा आहे. दोन्हींनाही अडचणींच्या सावल्या पडत नाहीत. तरीही त्यातून एखादी अडचण आलीच तर तिला सावली समजावं लागतं, हे लक्षात असलं तर शांत राहून त्यातून मार्गही काढता येईल. एकूण अडचणींमुळं येणारी अशांती दूर करणं शक्य आहे !

●

५.

● बाळाचं संगोपन ●

प्रापंचिक माणसाला मुलंबाळं, त्यांचं संगोपन करणं, त्यांना वळण देणं, वाढवणं-या गोष्टी नवीन नाहीत. तान्ह्या अर्भकाला तहानभूक कळत नाही. तिथंपासून मोठी माणसं त्याची काळजी घेतात. त्याला एकदा थोडे शब्द, भाषा, माणसं, वस्तू कळू लागलं की, काळजी घेणाऱ्यांना आता दुधापाण्याच्या गोष्टी बाजूला पडतात, पडायला हव्यात. ज्यांच्या त्या गोष्टी मागं पडतात, ते आता मुलाला जगाची ओळख करून देण्याच्या आणि जगायला शिकवण्याच्या कामात असतात.

आजकाल तर लहानमूल जन्मायच्या आधीपासून त्याच्या मोठं होण्यापर्यंतच्या संगोपनावर कितीतरी पुस्तकंसुद्धा उपलब्ध असतात. पण आपल्याला हे स्वाभाविक वाटलं, तरी असाही अनुभव आपल्याला असेल की, लहान मुलाला कळत नाही तेव्हा त्यानं काय खावं, प्यावं, किती-केव्हा खावं - याची काळजी घेण्याचीसुद्धा मोठ्यांना एक सवय लागते. मुलांना हे कळायला लागलं आणि त्यानुसार ती प्रत्यक्ष वागायला लागली तरी, काही आईवडिलांना त्यांना ते कळतं आहे, हे दुर्दैवानं कळत नाही ! मग नसलेले प्रश्न निर्माण झालेले आपण घरोघरी पाहातो.

लग्नाच्या वयाच्या मुलालासुद्धा काय खावं, काय खाऊ नये, हे सांगताना दिसणारे पालक भेटतील. तशा अनेक माता लग्न झालेल्या मुलालासुद्धा ते सांगताना भेटतील. अर्थात आता तिथं त्याची पत्नी असताना याची काळजी करणं म्हणजे जर संगोपन असेल, तर आपलं काहीतरी चुकतं आहे आणि आपणच त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांना आणि अस्वास्थ्याला आमंत्रण दिलेलं आहे, हे लक्षात घ्यावं. त्यातूनही किती-काय खावं, यासाठी समजा खरोखरच असा कुणी तरुण अजून आईवर किंवा पुढं पत्नीवरही अवलंबून असेल, तर मात्र आपण संगोपन करताना चुकलो आहोतच, हे उघड आहे.

मुलांना खाण्यापिण्यापासून सर्व प्रकारे सांभाळण्याच्या - संगोपन

करण्याच्या या ज्या कल्पना आहेत, त्यांनी निर्माण होणारी आणि टाळण्यासारखी असलेली दुःखं पाहून महाराज म्हणतात ते लक्षात घ्यावं हे बरं. ते म्हणाले की, 'मुलाबाळांचं रक्षणसुद्धा मायेत अडकून करू नये, कर्तव्य म्हणून करावं.' एकदा पालक मायेत अडकले की, खाण्यापिण्याची काळजी करणं तर सोडाच, पण त्यांना घरंदारं बांधून देऊन त्यांच्या मुलाबाळांना वळण लावण्यापर्यंत त्यांना सांभाळीत राहातात. अशानं त्यांचं तर नुकसान आहेच, पण भगवंतासाठी स्वतःला वेळ न उरून, स्वतःच्याही आयुष्याचं नुकसान आहे. त्यामुळं आपण कर्तव्याच्या सीमा ओलांडून मायेत आणि आसक्तीत अडकत नाही ना, हे पाहाणं आपल्याच हिताचं आहे.

त्याहीपेक्षा महाराजांना अधिक काळजी वाटते, तो विषय लक्षात घेण्यासारखा आहे. स्वतःची आणि जगाची वागण्याची पद्धत आपण कधी तपासलेली नसते. म्हणून स्वार्थानं जगायच्या जगरहाटीत आपण स्वतः कधी सामील झालो, ते आपल्यालाही कळलेलं नसतं. त्यामुळं निरागस असलेल्या, कुणाहीकडं चांगल्या भावनेनं पाहणाऱ्या, सहजपणे निःस्वार्थी असलेल्या मुलांना आपण स्वतःपुरतं पाहायला, जगायला शिकवतो. आपण स्वतः तसं वागत असल्यामुळं त्यांना ते पटतंही. विशाल असलेलं मूल स्वतःपुरतं पाहायला लागून संकुचित झालं की, महाराज म्हणतात, आपल्याला ते आता 'मोठं झालं' असं वाटायला लागतं !

या बाबतीत जिवाचं जे नुकसान होतं, त्याबद्दल महाराज म्हणाले, जीव संकुचित होत जातो, त्याला स्वार्थ कळायला लागतो, साधायला यायला लागतो, इतरांची पर्वा न करता जगायला यायला लागतं. याला लोक त्याला 'आता कळायला लागलं', असं म्हणतात. वास्तविक या गोष्टींनी त्याचं अंतिमतः नुकसान होतं. विशाल, निःस्वार्थी आणि प्रेममय भगवंत अंतरतो आणि त्याकडची वाटचालसुद्धा अकारण अवघड होऊन बसते. महाराजांचं हे म्हणणं लक्षात घेऊन, मुलांच्या संगोपनाच्या आपल्या कल्पना सुधारून घेतल्या, तर सर्वांचंच खरं हित होईल !

●

६.

● कमी का पडतं ? ●

जगात कुठंही जा, कुणालाही विचारा, आपल्या प्रपंचात काही कमी नाही ना ? तर सहजपणे आणि सगळीकडं मिळणारं उत्तर वेगवेगळं असलं, तरी प्रत्येकाला काहीतरी कमी पडलेलं आहे, एवढं उत्तर सगळीकडंच मिळतं. काय कमी आहे, असं विचारलं तर त्याची उत्तरं वेगवेगळी असतात. पण जे कमी आहे, त्याचं अर्थातच दुःखही त्यामुळं सगळीकडं आहे.

एखाद्या गरीबाचा प्रपंच आहे. अन्नाला कमी आहे, वस्त्राला कमी आहे, भांड्याकुंड्याला कमी आहे, असं आढळेलही. पण त्याचा पूर्वीचा प्रपंच पाहिला, तर त्यावेळी त्याच्याकडं जे अन्न, वस्त्र, भांडीकुंडी होती, त्यात कष्टानं मिळवून मिळवून, भर घालून त्याचा आजचा प्रपंच घडलेला दिसतो. तसा विचार केला आणि त्यावेळी त्याला भेटलो असतो, तरी तेव्हाही त्याला कमी आहे, हेच उत्तर मिळालं असतं. आज हे सगळं नक्की त्यापेक्षा जास्त आहे, तरी अजून कमी आहे, हेच उत्तर मिळतं.

याउलट ज्यांचे प्रपंच समृद्ध आहेत, त्यांना हा प्रश्न विचारला तरी त्याचं उत्तर त्यांना अजून काही कमी आहे, हेच आहे. वास्तविक घरात असंख्य उंची वस्तूंची रेलचेल आहे. दारात गाड्या लागल्या आहेत. घरी नोकरचाकर आहेत. उद्योगधंदे आहेत. ते उत्तम चाललेले आहेत. तरी पुन्हा कमी आहे, ही भावना आहे.

त्याबद्दल त्यांना विचारलं, तर ते म्हणतील, माझ्याकडं गाडी आहे ती पाच-दहा लाखांचीच आहे. पण मी अजून वीस लाखांची घेऊ शकत नाही. माझा हा बंगला वगळता माझ्याकडं फक्त दोनच प्लॉट आहेत. इतरांकडं पाचपाच दहादहा ठिकाणी प्लॉटमध्ये गुंतवणुकी आहेत. मला अजून साधं फार्म हाऊससुद्धा बांधता आलं नाही. शेअरमध्ये तर मी अजून काहीच गुंतवणूक करू शकलो नाही. माझ्या मुलीचं लग्न झालं, जावयांना पगार भरपूर आहे. पण त्यांना अजूनही प्रशस्त बंगला घेता आला नाही. दारात चांगली गाडी नाही. तिच्याही प्रपंचात कमीच आहे.

आपल्या लक्षात येईल की, तुलनेनं एवढा प्रपंच असून गरीबालाही कमी आहे आणि श्रीमंतालाही कमी आहे. वरवर पाहाता, गरीबाला कमी आहे, हे पटतं पण अशा एवढ्या परिस्थितीत असलेल्या श्रीमंताचीसुद्धा अनेक गोष्टी अजून कमी आहे, अशी तक्रार असते. त्यासाठी तो अजून रात्रंदिवस डोकं लढवतो, कष्ट करतो, फॅक्टरींना जोडून फॅक्टरी काढतो आहे. असल्या बाबतीत त्याला अजून कमी आहे, हे आपल्याला एकवेळ पटणार नाही. काहींना तर ही महत्त्वाकांक्षा बरोबर वाटण्याचीही शक्यता आहे.

असं जर असेल, तर या कमी पडण्याचा नक्की अर्थ काय, यावर विचार करणं गरजेचं आहे. महाराज म्हणत, 'प्रपंचात आपल्याला नक्की किती मिळालं म्हणजे पुरेल हे सांगता येणं कठीण आहे.' अनेक प्रपंच पाहिले, तर महाराजांच्या म्हणण्यातली सत्यता पटते.

महाराजांचं म्हणणं आहे की, 'कमी पडण्याचं कारण गरीबी-श्रीमंती नसून माणसाच्या मनाला लागलेली हाव आहे.' जगात उपलब्ध असलेल्या सगळ्या गोष्टी मिळाल्या, तरी हाव पुरी होईल, हेच मुळात शक्य नाही. आणि अर्थात अशा सगळ्या गोष्टीही कुणाला मिळणं शक्य नाही. मग जर हे ओळखलं नाही, तर कमी असण्याचं दुःख कुणाचंही आणि आयुष्यभर कधीही दूर होणार नाही.

प्रामाणिकपणे विचार केला, तर खरोखर जगण्यासाठी लागणाऱ्या गरजेच्या किमान गोष्टी आज जगात सर्वांना पुरतील एवढ्या आहेत. काहींना त्यातही काही कमी पडत असेल, हे खरं आहे. पण त्याला कारण पुन्हा त्या ज्यांच्याकडं आहेत, त्यांची हाव संपत नाही, हेच आहे. म्हणून महाराज म्हणाले की, 'जगातली मनाची हाव मोठी कठीण आहे.' ती ओळखता आली आणि दूर करता आली, तर खरोखरच कुणाला कधीच काही कमी पडणार नाही. कारण खरा पुरवणारा भगवंतच आहे आणि त्याला काही कमी नाही. आपला प्रश्न सोडवायला निदान महाराज म्हणाले ते लक्षात ठेवावं, 'ज्याला पोटापुरतंच पाहिजे आहे, त्याला कधीच कमी नाही !'

●

७.

● आगळा थर्मामीटर ●

विज्ञानानं ज्या प्रगती केल्या आणि त्याचा वैद्यकीय क्षेत्राला जो उपयोग झाला, त्यानं निदान करणं आणि उपचार करणं यांची नवनवीन साधनं निर्माण झाली. त्यात आजारी माणसाचा ताप पाहण्यासाठी अगदी पूर्वी निर्माण झालेले थर्मामीटर-तापमापक हे साधन आपल्याला परिचित आहे. त्याच्या शरीरप्रकृतीत काही कारणानं बिघाड होतो. शरीराचं तापमान वाढतं. ते किती वाढलं हे लक्षात घेऊन त्याप्रमाणं डॉक्टर त्याच्यावर उपाययोजना करतात.

पूर्वीच्या काळी असं साधन नव्हतं तेव्हा साध्या स्पर्शानं किंवा नाडीवरूनसुद्धा वैद्य या तापाचं प्रमाण ठरवीत आणि आवश्यक ती उपाययोजना करीत. थर्मामीटरनं तापाच्या रूपानं शरीरातल्या बिघाड मोजण्यात सोपेपणा, अधिक अचूकता आणली. व्यक्तींच्या अनुभवांच्या, बुद्धिमत्तेच्या फरकामुळं होणाऱ्या व्यक्तीनिविष्ट संभाव्य चुकाही टाळण्यात अशा थर्मामीटरनी सहाय्य केलं.

याचा इथं उल्लेख करण्याचं कारण असं की, शरीर जड, दृश्य. त्या अर्थानं त्याचं तापमानही दृश्य आहे. त्यातले बिघाड हुडकणं एका परीनं सोपं आहे. पण महाराजांनी परमार्थाच्या क्षेत्रात माणसाच्या प्रकृतीत साधनेच्या दृष्टीनं जे बिघाड होतात, ते हुडकून काढण्यासाठी याच थर्मामीटरचा दृष्टांत घेऊन सोप्या शब्दांत आपल्याला काही मोलाचं सांगितलं आहे. ते कळायला थर्मामीटरच्या भाषेत सोपं पडतं.

परमार्थात माणसाची देवावर, गुरूंवर श्रद्धा असते. त्यांनी सांगितलेल्या साधनाच्या मार्गानं तो वाटचाल करीत असतो, हे चांगलंच आहे. यात अनेकदा त्याला या वाटचालीबद्दल स्वतःला समाधान वाटतं. आपली गुरूंवरची निष्ठा, भगवंताची खात्री यांसारख्या गोष्टी आपल्या जीवनात आता मुरल्या आहेत, असं त्याला वाटू लागतं. ते कदाचित बरोबरही असेल. पण शरीरातले बिघाड दृश्य असल्यामुळं जसे चटकन जाणवतात

किंवा तपासता येतात, तसे या पारमार्थिक प्रकृतीतले बिघाड चटकन कळतील, असं नाही. ते मोजता येतील, असंही नाही. यासाठी काही सोय महाराजांनी सुचवली आहे.

ज्याचा देवावर, गुरूंवर विश्वास आहे, त्याची आध्यात्मिक प्रकृती उत्तम आहे. पण त्यात बिघाड झाला, तर तो कसा ओळखावा, त्यासाठी महाराज म्हणाले, भगवंताची निष्ठा पुरेशी नसणं किंवा त्याता बिघाड होणं, हे दाखवणारा एक थर्मामीटर आहे. त्याला महाराज 'काळजीचा थर्मामीटर' म्हणतात. ते म्हणाले, आपली भगवंतावर निष्ठा आहे, तर आयुष्यात घडणाऱ्या गोष्टी त्याच्या इच्छेशिवाय घडणंच शक्य नाही. भले ते व्यावहारिकदृष्ट्या गैरसोयीचं, दुःखाचं असेलही. पण एका बाजूला निष्ठा आहे, असं म्हणताना वेगवेगळ्या कारणांसाठी जर माणसाला काळजी लागत राहिली, तर ओळखावं की, या निष्ठेच्या पारमार्थिक प्रकृतीत बिघाड आहे. ताप जसा बिघाड असला तरी कधी कमी - कधी जास्त असतो, तशी काळजीसुद्धा कधी कमी - कधी जास्त वाटते. ती वाटण्याचाच अर्थ निष्ठेत त्या प्रमाणात बिघाड आहे. काळजीचा थर्मामीटर भगवंताच्या निष्ठेतला बिघाड-उणीव बरोबर दाखवतो.

माणसाच्या वाट्याला प्रपंचात आजारपणं येतात. अनपेक्षित खर्च उद्‌भवतात. फसवणुकी होतात. नोकऱ्या जातात. अपघात होतात. अनेकदा तर यांतलं काहीच न होता, ते होईल की काय, असंसुद्धा वाटत राहातं आणि माणसाला काळजी लागते. त्यावेळी हा विचार करावा की, ज्या भगवंतावर, गुरूंवर आपली निष्ठा आहे, असं आपण म्हणतो, साधन करतो, ते बरोबर चाललं आहे असं वाटतं-त्या भगवंताच्या, गुरूंच्या इच्छेशिवाय काहीही होणार नाही आणि जे होईल ते कल्याणाचंच होईल, हा निष्ठेचा अर्थही आपल्याला ठाऊक आहे. तर आता ही काळजी कुठून आली ? त्यावेळी निष्ठेतला बिघाड-ताप काळजीच्या थर्मामीटरवर पहावा, आपली निष्ठेतली खरी प्रगती ओळखावी आणि बिघाड दुरुस्त करावा !

●

८.

● साधूंवरचं स्वामित्व ●

ज्यांना संतांचं महत्त्व कळतं, त्यांच्याकडं ते जाऊ लागतात. त्यांनी सांगितलेलं साधन करतात, नाम, पूजा, पारायणं, यात्रा-अशी त्यांनी सांगितलेली साधनंही करतात. त्या साधनांचा त्यांना अनुभव येतो. संतांचा, गुरूंचा वेळोवेळी सहवास लाभतो.

साधूंच्या वृत्तीतच आनंद असतो. तो भगवंताचा असतो. ते मान-अपमान, सुखदुःख, अपेक्षा, जगाची आसक्ती-अशा अनेक गोष्टींच्या पलीकडं वावरतात. त्यामुळं त्यांचा आनंद कायम टिकूनही असतो. अशा शाश्वत आनंदाची ओढ त्यांच्या सहवासात कुणालाही लागते. त्यांच्या सहवासात काहीच न करताही अशा आनंदाचा अनुभव येतो. त्यामुळं मनुष्य त्यांच्या सहवासात जास्तीत जास्त राहाण्याचा प्रयत्न करतो.

इथंपर्यंतचा प्रवास स्वाभाविक आहे. भगवंताची गोडी, शाश्वत आनंदाचा अनुभव आणून देणं, हे संतांचं ईश्वरी प्रेरणेनं चाललेलं निरेपक्ष कर्तव्य असतं. त्यांच्या मनात आपल्यासारखे प्रापंचिक भेदभाव नसल्यामुळं, त्यांना ते मान्यही नसल्यामुळं, स्वाभाविकपणे येणाऱ्या प्रत्येकावर त्यांचं मनःपूर्वक प्रेम असतं. एकाच्या कल्याणासाठी जे ते करतात, तेच ते सर्वांच्यासाठी करतात. महाराजांच्यासारखे जे साधू तर आपलं कुठलं वेगळेपण दाखवू न देता प्रापंचिक माणसांबरोबर व्यवहारातही बरोबर राहतात, मिसळतात. निष्कपट प्रेमामुळं ते सर्वांना आपले वाटतात.

यात वेगवेगळ्या प्रसंगांत बरोबर असल्यामुळं त्यांच्या बरोबरच्या माणसांना साधूंना व्यावहारिक मदत करण्यासाठी अनेक प्रसंग येतात. सहवास जास्त मिळतो. याचा एक परिणाम महाराजांनी लक्षात आणून दिला आहे. त्याचा अनुभवही जवळजवळ सगळ्या संतांच्या बाबतीत आपल्याला पाहता येतो. बरोबरचा माणूस जितका काळ जास्त सहवासात राहील किंवा त्यांची कामं जास्त करील, त्याला त्यांच्यातल्या भगवंतांचं, त्यांनी सांगितलेल्या साधनाचं जास्त प्रेम लागण्याऐवजी त्यांच्या सहवासाचं,

त्यांच्या देहाचं नकळत जास्त प्रेम लागतं. याला एकतर त्याचा प्रापंचिक स्वभाव, सवय कारणीभूत असते. त्यातूनच त्याचं नुकसान होणारी एक प्रवृत्ती साधूंच्या जवळ राहणाऱ्या अनेक मंडळींच्यात उद्‌भवते. ती म्हणजे त्यांना ते आपले आहेत हे वाटण्याबरोबरच ते 'आपलेच' आहेत, असं वाटू लागतं. जसं प्रपंचातल्या जवळ राहणाऱ्या, जास्त सहवास असलेल्या माणसांच्या बाबतीत त्यांच्यावर आपला हक्क किंवा स्वामित्व माणसाला वाटू लागतं. तोच प्रापंचिक स्वभाव तसाच राहिला, तर अशा मंडळींना संतांच्यावरही आपला अधिक हक्क किंवा स्वामित्व आहे, असं वाटू लागतं. त्यांची आपली जास्त जवळीक आहे, असं नुसतं वाटतं असं नव्हे, तर इतरांपेक्षा ती जास्त आहे, असं वाटतं आणि त्यापेक्षाही ती इतरांना जाणवून देण्याकडं त्यांचा कल होऊ लागतो. यात त्यांच्या परमार्थाचं नुकसान होतं.

अर्थातच साधूंना याच्याशी काहीच देणंघेणं नसतं. ते माणसांचंच काय, जगाचंसुद्धा स्वामित्व मानीत नसतात. फक्त एका परमेश्वराचं स्वामित्व मानतात. त्यांना असल्या प्रापंचिक स्वामित्वाची जाणीवही होत नाही आणि ती ते मानीतही नाहीत.

साधूंच्या लक्षात असं वागणारे लोक येत नाहीत, असं नाही. पण त्यांचं सर्वांच्यावरच प्रेम असतं, त्यामुळं तसंच त्यांचं ते यांच्यावरही कायम राहातं. संत त्यांच्या पद्धतीनं काही घटना घडवून आपल्या अशा शिष्यांचं होणारं नुकसान टाळण्याचा प्रयत्न करतात. खरंतर संत बाह्यांगात नसतात. त्यामुळं तसं नुसतं जास्त बरोबर राहण्यानं आध्यात्मिकदृष्ट्या प्रगती होत नाही. संत ज्या स्मरणात, वृत्तीत राहतात, त्यात जास्त राहण्यानं त्यांचा खरा जास्त सहवास मिळत असतो. ज्यानं माणसाची खरी प्रगती होते आणि खऱ्या अर्थानं संतांची स्वामित्वाची नव्हे पण प्रेमाची आपुलकी त्यांना लाभते. ज्याला खरी प्रगती करून घ्यायची आहे, निदान यातून होणारा धोका टाळायचा आहे, त्याच्यासाठी महाराज म्हणाले, 'साधू थोड्यांचा नसतो', हे लक्षात घ्यावं !

●

९.

● जन्मोत्सव की करमणुकीचा कार्यक्रम ? ●

आपल्याकडं जे अनेक धार्मिक कार्यक्रम आहेत, त्यांत वेगवेगळ्या देवांचे जन्मोत्सव हा एक मोठा भाग आहे. त्याचबरोबर परमार्थाच्या क्षेत्रातही संतांचे जन्मोत्सव यांनाही मोठं महत्त्व आहे.

त्यात्या तिथी जवळ आल्या की, लोकांची त्या दिवशी करायच्या कार्यक्रमांची आखणी सुरू होते. काही जन्मोत्सव त्यात्या दिवसापुरते तर काही तीन दिवस, आठ दिवस चालणारेही असतात. ज्याचा जन्मकाळ करायचा तो राम, कृष्ण किंवा दत्त एकच, त्याच्या त्यांच्यात्यांच्या जन्माची वेळही तीच असते. जन्मकाळाची साधारण प्रचलित असलेली घटना, कथा, हेही सारं तेच असतं. ते अर्थात तसं राहणारही. वर्षानुवर्षं हे सारं तेच असल्यामुळं माणसांना ते पाठ होऊन जातं. त्यामुळं मूळ जन्माचा कार्यक्रम त्यावेळेला ठरल्याप्रमाणं उरकून घेण्याकडं माणसांची प्रवृत्ती होते. या साऱ्यात बदल करता येणं शक्य नसतं.

होतं काय की, माणसाच्या प्रापंचिक स्वभावाला आणि मनाच्या तशा ठेवणीला सातत्यानं जसं, तेच नाम आपल्याला भगवंत भेटेपर्यंत घेत राहण्यात अडचण येते, तळमळ टिकवता येत नाही, तसं या मूळ जन्मकाळांत काही बदल करता येत नसल्यामुळं, माणसाचं मन आपले मार्ग शोधतं. मनाला तर सतत बदलांची आवड आहे. ते एका मूळ ध्येयात सतत रमून राहू शकत नाही. म्हणून मग हे जन्मकाळ सोडता उरलेल्या वेळेत त्यानिमित्तानं काय करावं, हे जे स्वातंत्र्य माणसानं गृहीत धरलेलं आहे, त्या इतर वेळेत आणि कार्यक्रमात काय काय करता येईल, इकडं माणसाचं मन वळतं.

मग उत्सव करणारी मंडळी एकत्र येऊन या इतर कार्यक्रमांची योजना आखतात. त्यांत कीर्तन, पुराण - प्रवचन अशा पारंपारिक कार्यक्रमांबरोबर जादूच्या प्रयोगांपासून गाण्यांच्या मैफिलींपर्यंत किंवा त्यापेक्षाही नवनवीन कल्पना सुचतात, राबवल्या जातात. त्याला धरून

मिरवणुका, शोभायात्रा अशा गोष्टी असतात. त्यातल्या त्यात जास्तीत जास्त लोक गोळा होतील, असं करण्याकडं मनाचा कल असतो. नावीन्याची आवड हा विषय स्वतंत्र असला तरी, बदलांचं प्रेम हा मनाचा स्वभाव असतो. त्यामुळं इतर कार्यक्रमांच्या बाबतीत ते तर घडतंच पण कीर्तनकारसुद्धा तेच नकोत, नवीन नवीन आणू, असे निर्णय होतात. त्यात पुन्हा इतर ठिकाणच्या उत्सवापेक्षा आपला उत्सव मोठा, वेगळा कसा राहील, याचीही चिंता अनेकांना असते.

याबद्दल आपल्याला आपल्या हितासाठी सावध करताना महाराज म्हणाले, 'खरंतर परमात्मा सदासर्वकाळ आहेच. तरी त्याचा जन्म दरवर्षी आपण करतो, तो तसा का करतो, याच्या हेतूचा विसर पडून कसं चालेल ? देवाचा जन्म दरवर्षी करून त्याच्यात काहीच फरक पडत नाही. तसा जन्मकाळ दरवर्षी करण्यानं फरक पडला, तर तो आपल्यात पडावा म्हणून तो करायचा असतो ! भगवंताच्या अशा प्रत्येक जन्मकाळानंतर जन्म केल्याचं फळ म्हणून आपलं अज्ञान नष्ट व्हावं, परमात्म्याची निष्ठा वाढावी, जगण्यात निश्चिंतपणा यावा. परंतु प्रत्यक्षात पाहिलं, तर तसं होताना दिसत नाही. आमच्या काळज्या, भीती, अज्ञान सगळं तसंच कायम राहातं. मग प्रभूचा जन्म करण्याचं खरं रहस्य आपल्याला समजत नाही.' ते समजलं नाही, तर असे जन्मकाळ, जन्मोत्सव वर्षानुवर्षं जरी केले, तरी पारमार्थिकदृष्ट्या प्रगतीसाठी त्यांचा आपल्याला उपयोग होणार नाही.

जन्मकाळ केल्यानंतर त्यापूर्वीच्या आपल्या मनस्थितीत, आपल्या प्रपंचाच्या आसक्तीत काही फरक पडून ती कमी झाली का, जगाचं आपलेपण कमी होऊन आता भगवंत जन्माला आला आहे, तर त्याचं आपलेपण, तो आल्याचा विश्वास आणि त्याचा परिणाम आपल्या व्यवहारावर दिसतो का पहावं. प्रभूच्या जन्माचा खरा अर्थ, जन्मकाळ करण्याचा खरा हेतू साध्य झाला नाही, तर महाराज म्हणतात,'असे जन्मकाळ आणि त्यानिमित्तानं होणारे अनेक कार्यक्रम हे नुसते करमणुकीचे कार्यक्रम ठरतील !'

●

१०.

● परमार्थातला विमानमार्ग ●

आपल्याला आपल्या गावापासून ज्या गावी जायचं आहे, त्या गावी जाण्यासाठी रस्ता, नदी, समुद्र किंवा आकाशातून जाणारा विमानाचाही मार्ग असतो. पूर्वीच्या काळी किंवा आजही अनेक ठिकाणी जिथं असे साधे रस्तेही नाहीत, तिथं असलेल्या जंगलातून, झाडाझुडूपातून आपली पोचण्याची जागा लक्षात ठेवून, दिशांच्या अंदाजानं आपली वाट आपण काढीत जाणारे लोकही आपल्याला भेटतील.

परमार्थाच्या प्रवासाचंही थोडं असंच आहे. खरंतर हे कळावं म्हणून प्रवासाच्या भाषेत सांगायचं. वस्तुतः आपल्याच अंतरंगात आपलं जाण्याचं ठिकाण आहे. पण ते कळण्यासाठी आणि केवळ त्यावर स्थिर राहण्यासाठी आधी जो प्रवास करायला लागतो, त्या अर्थानं आपली ही परमार्थाची साधनं आहेत, मार्ग आहेत. परमार्थातसुद्धा पायवाटा, रस्ते आहेत, जलमार्ग आहेत.

झाडाझुडूपांतून स्वतःचा मार्ग स्वतः काढून जाण्यात काट्याकुट्यांच्या इजा होतात. रस्ता चुकून जंगलात हरवण्याचे धोके असतात. जंगलदऱ्यांतल्या होणाऱ्या प्रवासात दमछाक घडते.पण ते करण्याचं धैर्य दाखवणाऱ्यांसाठी पूर्वापार चालत आलेले योगमार्गासारखे जंगलातून वाट काढीत जाण्याचे मार्गही आहेत.

गुरूंनी शिष्याला त्याच्यापुरतं सांगितलेलं साधन वर्षानुवर्षं एकट्यानं, एकांतात नित्यनेमानं करीत राहाण्याची सबुरीची परीक्षा पाहाणारा पायवाटेचा मार्गही आहे. त्यात एकाला चालता येईल तसा आणि तोच मार्ग दुसऱ्याला चालता येईल, असं नाही.

काही रुळलेल्या रस्त्यांचे मार्गही उपलब्ध असतात. पूजा, देवदर्शन, उपास, स्तोत्र, पठण, पारायण-असे कमीअधिक रुंदीचे मार्ग असलेले रस्तेही परमेश्वराकडं जातात. फक्त चालतानाचे कष्ट, मूळ हेतूचं भान, सातत्य-अशा अनेक गोष्टी या रस्त्याच्या मार्गानं जाताना सावधानतेनं कराव्या लागतात.

आपण काळाच्या कक्षेत आहोत, मायेच्या तावडीत आहोत हे ज्यांच्या लक्षात येईल, त्यांना भवनदी-भवसागर आणि त्यातून तरून जाण्यासाठी जलमार्गाची तरतूदही आहे. पण त्यासाठी रोजचा दिवस विलक्षण वेगानं जाणाऱ्या पाण्यासारखा मृत्यूच्या दिशेनं प्रवास करतो आहे, याचं सतत भान राहून, त्यातला एकही क्षण वाया न घालवता काळाच्या नदीच्या वेगानं आणि पुढं जाण्याच्या सातत्यानं, आपलं स्मरणाचं साधन या मार्गात सतत सुरू ठेवावं लागतं.

या साऱ्या मार्गांचा विचार करता महाराज म्हणाले, 'खरंतर आजचा काळसुद्धा यापेक्षा विमानमार्गाला उत्तम आहे. शरणागतीचा मार्ग हा विमानाचा मार्ग आहे!' हे स्पष्ट करताना ते पुढं म्हणाले, 'विद्वत्तेला किंमत नाही, व्यक्तीत सामर्थ्य राहिलं नाही, इतर कुठली शक्ती कामाला येत नाही. वरच्या मार्गातल्या सावधानता, सातत्य या गोष्टी आजच्या परिस्थितीत अधिकाधिक अवघडच होत चालल्या आहेत. या अर्थानं कुणालाही सोपा राहातो, तो शरणागतीचाच मार्ग !'

पायवाटेत काटेकुटे लागतील, रस्त्यात चालण्याच्या हेतूचं भान आणि चालण्याच्या सातत्यातले कष्ट पडतील-रस्त्यात चिखल लागला, तर फसायला होईल, जलमार्गात भान आणि साधन सुटलं, तर माणूस बुडून जाईल. पण विमानाच्या मार्गात ना डोंगर आड, ना चिखलाचा त्रास, ना बुडण्याची भीती. विमानाला निदान झेप घेताना एक विलक्षण शक्ती लागते, खूप मोठी क्रिया करावी लागते. पण या शरणागतीच्या विमानाला असलेच तर, स्वतःच्या इच्छेनं काही न करण्याचेच फक्त कष्ट आहेत. माझं काम मी करतो आहे आणि तुझं काम तू करशीलच, एवढ्या नुसत्या खात्रीवरच, सामान्य माणूससुद्धा या शरणागतीच्या मार्गानं थेट भगवंत गाठील. काही करायला लागलंच तर, देवावर मनापासून निष्ठा, प्रेम लागेल, बाकी कसल्या क्रिया लागणार नाहीत. आणि हे विशेष लक्षात ठेवावं, 'असा अनन्य शरणागत भक्त भगवंताला सर्वांत प्रिय आहे !'

●

११.

● काल, आज, उद्या ●

आजचा माणसाचा रोजचा दिनक्रम पाहिला, तर शरीराच्या रक्षणाकरता, कुटुंबाकरता नोकरीधंद्यात त्याचा दिवस जातो. या सगळ्या दिवसभराच्या काळात त्याच्या मनात नकळत ज्या गोष्टी चालू असतात, त्यात खूप मोठं स्थान, काल घडलेल्या घटनांचा विचार करण्याला आणि उद्या किंवा भविष्यात काय करायचं किंवा काय होईल, याचा विचार करण्याला आहे, असं लक्षात येईल.

कालच्या म्हणजे पूर्वीच्या आयुष्यात घडलेल्या असंख्य चांगल्या वाईट घटनांचे विचार, त्यावेळची सुखदुःखं त्याला सतत आठवत राहातात. कुठल्या कुठल्या प्रसंगी अचानकपणे कुणी मदतीला धावून आलं, काही अडचणी अचानक सुटल्या, काही वेळा अनपेक्षित प्रमाणात आपल्याला यश मिळालं-यांसारख्या चांगल्या घटनांबरोबरच कुणी अपमान केला, कोण मनाविरुद्ध वागलं, कुणी उपकारांची जाणीव ठेवली नाही, कुणी अपशब्द वापरले, कुणी आपल्याला अडचणीत आणलं, कुणी आपला विश्वासघात केला, कुणी पैशाला बुडवलं, कुणामुळं आपली अप्रतिष्ठा झाली-अशा अनेक कालच्या गोष्टी माणसाला आज घडल्यासारख्या ताज्या होत राहातात, सुखदुःखं देत राहातात.

तीच गोष्ट त्याच्या मनात नकळत चालू असलेल्या उद्याच्या विचारांची असते. मुलांची शिक्षणं नीट पुरी होतील की नाही, त्यांना चांगल्या नोकरी लागतील की नाही, आपली घरंदारं हवी तशी होतील की नाही, आपल्याला पैसा पुरेल का, आपल्यावर नातेवाईकांच्या कुठल्या जबाबदाऱ्या अकारण येणार नाहीत ना, आपल्याला कुठला गंभीर किंवा असाध्य आजार होणार नाही ना-अशा भविष्यातल्या कितीतरी घटनांबद्दलच्या कल्पनांनी त्याचं मन सतत व्यापलेलं असतं. याला अपवाद फार कमी आहेत.

या साऱ्या विचारांकडं आपण जरा सावध होऊन पाहिलं, तर लक्षात येतं की, काल कुणी आपल्याशी वर म्हटलं तसं कदाचित चांगलं वागलं

असेल, ते त्यावेळी सुखाचं झालं असेल किंवा कुणी वाईट वागलं असेल आणि ते दुःखाचं झालं असेल, तरी त्या साऱ्याला आजच्या आयुष्यात त्यामानानं काहीच स्थान नसतं. त्यात कुठले बदल आज करणंही शक्य नसतं. अनेकदा तर त्याच्याशी संबंधित असलेली माणसं आता हयातसुद्धा नसतात. अनेक गावांचा, घटनांचा आता संबंधसुद्धा राहिलेला नसतो. तरीही जसा विचार करीत राहावं तशी, या नकळत चाललेल्या विचारांनी, ती सुखदुःखं आज त्या घटना घडाव्यात, तशी ताजी होत राहातात. विचार करण्यातसुद्धा आपली मेंदूची कितीतरी शक्ती खर्च होत असते.

उद्याच्या विचारांची अवस्था यापेक्षा फार वेगळी नसते. उद्याच्या ठरवलेल्या कामांसंबंधी काही आखणी आज करायची असली, तर तेवढाच त्याचा विचार आज उपयोगी असतो. बाकी अमुक घडेल की नाही, तमुक घडेल की नाही, यात विधायक असो-विघातक असो, त्या विचारांना केवळ कल्पनांचं स्वरूप आहे. महाराज त्याला कल्पनांचा गुंता असं म्हणत. त्यात मनुष्याला गुंतवून ठेवण्याचं विघातक सामर्थ्य मात्र असतं. इतकंच काय, या बाबतीत उद्या काय घडेल, याचा अंदाज घेण्यासाठी माणसं भविष्यवाल्यांकडं खेटे घालीत असतात. काही टाळता आलं तर पहावं म्हणून अंगठ्या, खडे, रत्नं, गंडे, दोरे-असे अनेक मार्गही अवलंबीत असतात.

या साऱ्यावर जाणारा आपला आजचा वेळ आणि शक्ती हा सारा अपव्यय आहे, हे लक्षात आणून देताना महाराज म्हणाले ते थोडक्यात लक्षात ठेवावं. महाराज म्हणाले, 'कालचं विसरावं, उद्याचा विचार करू नये आणि आज नाम सोडू नये.' भविष्याबद्दल बोलताना ते म्हणतात, 'गरज असती तर माणसाला भगवंतानं भविष्याचं ज्ञान दिलंच असतं. उलट उद्याचं अज्ञान आहे म्हणूनच आजचं काम करण्यात एक आनंद आहे.'

आज काम तळमळीनं करावं आणि भगवंताचं नाम घेऊन त्याची खात्री बाळगावी, हाच आपला काल, आज आणि उद्याचा विचार करण्याचा योग्य मार्ग होईल !

●

१२.

● विद्वत्तेचं फोलपण ●

गेल्या काही शतकांत ज्ञानाला विशेष महत्त्व आलं. ज्ञानाची क्षेत्रंही विस्तारली. अनेक गोष्टींची शास्त्रं तयार झाली. अनेक संशोधनांमुळं एका बाजूला देहाच्या सुखाची साधनं अपरिमित प्रमाणात वाढली. कुणाही माणसाला, विशेषतः त्याच्या मनाला, कष्ट वाचल्यामुळं स्वाभाविकपणे आनंद वाटला, कामांना अकल्पित वेग आला, त्या सगळ्याचं आकर्षण असल्यामुळं ते उपलब्ध करून देणाऱ्या विद्वत्तेला त्याच्या दृष्टीनं अर्थातच फार मोठेपण, प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्यामुळं अशा विद्वानांचा सत्कार झाला, मानमान्यता मिळाल्या, पुरस्कार-पैसा- प्रसिद्धीही मिळाली. त्यामुळं अशा विद्वत्तेपलीकडं काही मोठं नसावं, अशी सामान्यांची समजूत झाली.

तिकडं अशा विद्वानांच्या बाजूनंही असं घडलं की, मानमान्यता, पद-प्रतिष्ठा-पैसा या साऱ्यामुळं, त्यांचीही आपल्या ज्ञानाच्या पूर्णतेविषयीची कल्पना दृढ होत गेली. त्यांच्यात्यांच्या शास्त्रविषयांच्या पलीकडच्या क्षेत्रांच्या बाबतीतही आपली मतं ग्राह्य धरली जावीत, असं त्यांना वाटायला लागलं. अनेकांनी तर आपण दृश्य जगाचा अभ्यास करतो आहोत, त्यातलं काही थोडं ज्ञान आपल्याला झालं आहे, हे लक्षात न घेता, सूक्ष्म आणि अदृश्य अशा निर्गुण भगवंताबद्दलसुद्धा आपली मतं द्यायला सुरुवात केली. आधी म्हटल्याप्रमाणं अशा विद्वन्मान्य लोकांकडून ती आल्यामुळं सामान्यांनाही ती खरी वाटू लागली.

दुसऱ्या बाजूला पूर्वीच्या पठडीतलं जे शब्दज्ञान होतं, त्यातलेही अनेक विद्वान होते. त्यांच्यातही चालत आलेले वाद शास्त्रग्रंथ, परंपरा यांचा अभ्यास आणि संशोधन बाजूला पडून फक्त शब्दपांडित्य उरलं. त्या विद्वत्तेलाही काही माणसांच्या दृष्टीनं मानमान्यता, प्रतिष्ठा, पदं, पैसा आला. पूर्वसुरींच्या ग्रंथांतले मोठमोठे, प्रभावी, सुंदर शब्द-विचार अशा विद्वानांनी डोक्यात वागवले, ते फक्त बोलून दाखवण्यासाठी. त्यामागचा अनुभवाचा पाया दुर्लक्षिला गेला. सामान्य माणसाच्या दृष्टीनं हेही मोठेपणच होतं.

या साऱ्यात अनेक महत्त्वाच्या गोष्टी बाजूला पडल्या. निर्गुण परमात्मा, त्याकडं जाण्याचं जीवनाचं ध्येय, त्यासाठी देहापलीकडं जाण्याच्या क्षमतेचा विकास, अखंड समाधानाचा अनुभव घेण्याचा संतमार्ग, नामासारखी अनादिसिद्ध साधनं-अशा जीवन समृद्ध आणि खऱ्या अर्थानं समाधानी करणाऱ्या अनेक गोष्टी, या विद्वत्तांच्या पार्श्वभूमीवर भोळेपणाच्या वाटू लागल्या, अडाणीपणाच्या ठरल्या. यामुळं पैसा, प्रतिष्ठा यांसारख्या आकर्षक वाटणाऱ्या पण अस्वास्थ्य निर्माण करणाऱ्या जीवनपद्धतीला बळी पडून आपण खरं सुख गमावून बसलो.

म्हणून महाराज म्हणत, ' ज्याला जग ज्ञान म्हणतं त्या विद्वत्तेनं जगात जेवढा गोंधळ झाला, तेवढा अज्ञानानंही झाला नाही. वाचनानं तल्लख झालेली बुद्धी नुसती देवाबद्दलच्या वादाला उपयोगी पडू लागली.' बुद्धीनं, विद्वत्तेनं खरा मिळवायचा असलेला भगवंत, समाधान कधीच मिळणार नाही, या सत्याचा विसर पडला. म्हणून महाराज म्हणाले, 'अशी विद्वत्ता पोकळ आहे. तिनं वृत्ती सुधारत नाही उलट अभिमान वाढतो आणि तो माणसाचा घात करतो.'

जग असल्या पोकळ विद्वत्तेला बळी पडल्यामुळं जगाचाही बुद्धिभेद झाला. विद्वान म्हणतात म्हणून, सामान्य मनुष्य देव नाही म्हणू लागला, देव आहे म्हणू लागला. वास्तविक महाराज म्हणत, 'बुद्धीनं, विद्वत्तेनं परमात्मा कधीच गाठत नाही.' तळमळ, अंतःशुद्धी, निष्ठा, प्रेम, निःस्वार्थीपण यांनी परमात्मा गाठेल, आयुष्यात समाधान येईल. अज्ञान जसं उपयोगाचं नाही, तसंच पोकळ विद्वत्ताही उपयोगाची नाही. अनुभव घेणाऱ्या संतांनी सांगितलं म्हणून श्रद्धेनं रामराम किंवा विठ्ठलविठ्ठल म्हणणाऱ्याला जे स्वास्थ्य आणि समाधान आहे, ते असल्या पदव्या, सत्ता, प्रतिष्ठा, मान्यता असलेल्या शब्दपंडितांनाही नाही आणि विज्ञानपंडितांनाही नाही. तेव्हा आपण विद्वत्तेचं फोलपण ओळखून समाधानासाठी अनन्यतेनं, श्रद्धेनं भक्तीची कास धरावी, हे आपल्या हिताचं ठरेल !

●

१३.

● अवघडाचं गिऱ्हाईक ●

खरंतर कुणालाही काहीही शिकायचं झालं, करायचं झालं, तर ते सोपं आहे ना, हे तो पाहातो. मार्गसुद्धा लांबचा घ्यायच्याऐवजी जवळचा काही आहे का, पाहातो. गावाला जाताना वाहन निवडतानासुद्धा त्यातल्या त्यात जलद जाणारी गाडी तो पाहातो. एखाद्या गोष्टीला वेळ लागणार असेल, तर त्याला काही वेळ वाचवण्याचा सोपा मार्ग आहे का, हे पाहातो. त्याचा बराचसा प्रपंच असा चालतो.

आता ही जर माणसाची वृत्ती आहे म्हणावं, तर परमार्थाच्या बाबतीत मात्र आपला अनुभव वेगळं सांगतो. परमेश्वरप्राप्तीसाठी तो योगमार्ग अधिक चांगला का विचारील. हठयोगानं अधिक फायदा होईल का विचारील. नाम घ्यावं म्हटलं, तर ते श्वासावर घ्यावं का विचारील. वास्तविक जर सोपं करण्याकडं त्याचा कल असेल, तर असल्या योगमार्गाचं, त्यातसुद्धा त्यातल्या कठीण योगाचं त्याला आकर्षण का वाटत असेल ?

हे परमार्थाच्या अनेक साधनांत आहे, असं आपल्या लक्षात येतं. उपास करावा म्हटलं, तर तो निर्जळीसुद्धा करायला तयार होईल, पण त्याला जर म्हटलं की, साधन म्हणून फक्त साधं अन्न आणि चार घास कमी खा, तर त्यात त्याला काही केल्यासारखं वाटणार नाही. सातसात दिवस उपाशी राहायला तो तयार होईल. पण रोज कमी खाऊन राहा म्हटलं तर तयार होत नाही. वास्तविक असं साधं आणि कमी खाल्लं तर भगवंताची आठवण ठेवणं अधिक सोपं होईल. निर्जळीचे कठीण कष्ट त्याला सतत शरीराची, भुकेची आठवण देतील. पण हा अवघड मार्ग चालणं तो पत्करील.

ज्ञानेश्वरीचं नुसतं पारायण कर म्हटलं, तर मी अर्थासह करू का, असं तो विचारील. मग अर्थ समजत नाही, शब्द समजत नाहीत म्हणून कठीण शब्दांचे कोश पाहील. सिद्धांत समजून घ्यायचा प्रयत्न करील आणि न कळले तर घोटाळ्यात पडेल. पण परमार्थाच्या बाबतीत आपण 'अवघडाचं गिऱ्हाईक' आहोत, हेच खरं !

वास्तविक ज्ञानेश्वर माउलींनीसुद्धा अर्थ तर सोडाच, पठण केलं तरी चालेल आणि त्याहीपेक्षा ते न जमलं, तर नुसतं श्रवण केलंत तरी चालेल, सर्वांना त्याचा लाभ तेवढाच होईल, असं सांगितलं आहे. एवढं भगवंतांचं आश्वासन असूनसुद्धा त्याला या अर्थाच्या अवघड मार्गाचं, मग त्याचा अन्वय लावण्याच्या किचकट मार्गाचं आकर्षण जास्त वाटतं, याला काय करावं ? यानं नुकसान त्याचंच होतं.

असं अनेक साधनांच्या बाबतीत आहे. म्हणून महाराज एकदा म्हणाले की, माणसाला या जवळच्या गोष्टी, सोपी साधनं यापेक्षा गुरूंनी काहीतरी कठीणकठीण साधनं सांगावीत किंवा आपण ती करावीत, असं वाटतं. याबद्दल एका निवृत्त साधकांचा अनुभव महाराजांनी सांगितला आहे.

'ते निवृत्त झाल्यावर त्यांनी परमार्थासाठी सगळ्या यात्रा करायचं ठरवलं. त्यांना त्या काळचे पन्नास-साठ रुपये पेन्शन मिळत असे. त्यांचे एक जवळचे मित्र होते. त्यांनी त्यांना सांगितलं की, आपल्या शेजारच्या गावी एक देवाची यात्रा भरते. ते स्थान खूप चांगलं आहे. आपण तिथं जाऊ. पण ते नंतर जाऊ म्हणाले. पण नंतर जाऊ. मात्र वेळ मिळेल आणि पैसा साठेल तशा फार लांबलांबच्या यात्रा त्यांनी केल्या. त्याच्या दगदगीनं ते अखेर आजारी पडले. अंथरुणाला खिळले. अंतकाळ जवळ आला. त्यांच्या शेजारच्या गावची ती यात्रा पुन्हा आली. पण हे इतके परस्वाधीन झाले होते की, तिला जाणं काही त्यांना शक्य राहिलं नाही.मग त्यांना वाईट वाटलं. '

त्यावर महाराज म्हणाले, 'माणूस उगाच अवघड अवघड साधनांच्या मागं लागतो. खरंतर अगदी जवळचं नम्रतेचं साधन. अहंकार सोडण्याचं साधन. नाम घेण्याचं साधन. अशी साधनं करील, तर सामान्य माणसाला कष्ट कमी होतील. अकारण खर्च होणार नाही. अशी साधनंच खरी साधनं असल्यामुळं, अवघड साधनांच्या मागं लागून, ही सोपी साधनं न झाल्यानं, शेवटी होणारं नुकसान टळेल.' याचा विचार करून आपण परमार्थात उगाच 'अवघड साधनांचं गिऱ्हाईक' होऊ नये, हे बरं !

●

१४.

● सेवेतली सावधानता ●

सेवा हे परमार्थातलं एक मोठं साधन मानलं जातं. मूर्तीची सेवा करण्यापासून साध्यासाध्या झाडापानाची सेवा करण्यापर्यंत सेवेचेसुद्धा असंख्य प्रकार आहेत. मंदिरातसुद्धा कुणी फुलं आणून देण्याची सेवा करतो, कुणी पूजेची तयारी करून देण्याची सेवा करतो, कुणी पूजेची सेवा करतो, कुणी नैवेद्याची सेवा करतो, कुणी झाडलोटीची सेवा करतो, कुणी आल्या-गेलेल्यांची सेवा करतो. बाहेरच्या व्यवहारी जगातही अनेक प्रकारच्या सेवा वेगवेगळ्या क्षेत्रांत केल्या जातात.

मुळात सेवाभावनेनं काम करणारे, जाणीवपूर्वक-समजून घेऊन सेवा करणारे लोक हे मनुष्यजन्माचं चीज करीत असतात, यात शंकाच नाही. आपल्यापुरतं पाहणाऱ्या स्वार्थी जगापेक्षा ते कितीतरी पावलं पुढं गेलेले असतात, हे नक्कीच.

सेवेच्या या इतक्या चांगल्या मार्गाचा महाराजांनी पारमार्थिकदृष्ट्या खूप सूक्ष्म विचार केला आहे. महाराजांच्या दृष्टीनं माणसाला जर तासन्‌तास नुसतं स्वस्थ बसायला सांगितलं, तर अवघड वाटतं आणि तेच काही काम करायला सांगितलं, तर स्वस्थ बसण्यापेक्षा ते सोपं वाटतं. याचं कारण माणसाला मुळात मनातून कृतींची आवड आहे. जसं बोलायला सांगितलं, तर आनंद वाटतो. तेच मौन पाळायला सांगितलं, तर त्याला अस्वस्थता येते. कृतींच्या आवडीमुळं तुलनेनं सेवा सोपी वाटते. त्याऐवजी मौन, नाम, शांत राहाणं, हे अधिक अवघड वाटतं.

सेवेत कृती दिसत असल्यामुळं तिचे स्थूल परिणामही दिसतात. म्हणजे समजा एखाद्याला काही मदत केली, त्याचं काही काम केलं, तर ते कामही झालेलं दिसतं आणि त्याबद्दलचं कौतुक, आभार या गोष्टीही दिसतात. ज्याचं काम होतं, त्याच्याकडून कृतज्ञतेची प्रतिक्रियाही येते. जरी आपल्या दृष्टीनं त्याची अपेक्षा नसली, तरी सेवेत मुळात कृतीचं अंग असल्यामुळं त्या अपेक्षा नाही पुऱ्या झाल्या किंवा त्या नसल्याच, तर त्यानं

काही बिघडत नाही. मन कृतीत अडकून राहात असल्यामुळं आपल्याला मनाचा आणि स्वतःचा त्यात विसर पडतो. तेच मन जर अशा मौनासाठी, नामासाठी मोकळं ठेवलं की, त्याला काम नसल्यामुळं ते आपल्यावर उलटल्यासारखं वागतं, अस्वस्थ राहातं. मन स्वस्थ व्हायला वृत्ती शांत व्हाव्या लागतात. त्या शांत होणं वेगळं आणि मन कशात तरी अडकून असल्यामुळं मन शांत आहे, असं वाटणं वेगळं. मन अडकून राहिलं, तर वृत्ती शांत होतात, असं नाही.

महाराज म्हणतात, 'आपल्याला कृतींची सवय आहे. वृत्ती बनवायची नाही. परमार्थ तर वृत्ती बनवण्यात आहे.' म्हणून परिणाम असा होतो की, अनेक वर्षं सेवा करणारी माणसं शांती-समाधानाच्या बाबतीत पुढं जाताना दिसत नाहीत. म्हणून महाराज पुढं म्हणतात, 'सेवा ही क्रियारूप आहे. ती जेव्हा वृत्ती बनवण्यासाठी म्हणून केली जाईल, तेव्हाच ती सेवा परमार्थात माणसाला पुढं नेईल.'

सेवेची ही वृत्तीशी गाठ अनेकदा नसते. म्हणून सेवा म्हणजे फक्त कामातल्या बदलाचं स्वरूप, अशी अवस्था येते. मग मठमंदिर असो किंवा कुठली संस्था असो, त्यातल्या सेवांवरून भांडणं दिसतात, लोकांच्यात चढाओढ दिसते, सेवेचे अहंकार दिसतात, अशी सेवा दुसऱ्यांना जमणार नाही, असं म्हणताना सेवेकरी दिसतात, आम्ही सेवा करतो म्हणजे आम्हाला आता उपासनेची गरज नाही, अशी समजूत असलेले लोक दिसतात. सेवांच्या वाटपावरून मतभेद आढळतात. अनेकदा ते विकोपाला जाऊन माणसं सेवा सोडून जातात. या साऱ्यानं त्या सेवांना प्रपंचातल्या कामांची कळा येते. वृत्तीशी सांगड नसल्यामुळं हे सारं घडतं.

त्यामुळं नुसतीच निःस्वार्थता नाहीच पण भगवंतावरचं निरपेक्ष प्रेम करायची संधी, आपल्या अपेक्षांपासून अहंकारापर्यंत सारं मारून टाकण्याची संधी - म्हणून त्या अर्थानं मन नाहीसं करण्यासाठी सेवा करण्याची सावधानता बाळगली, तर सेवा हे ईश्वरप्राप्तीचं साधन होईल !

●

१५.

● घरजावई ●

आपण बहुतांश माणसं प्रापंचिक आहोत. प्रपंचातल्या कमतरता भरून काढण्यासाठी, जबाबदाऱ्या पुऱ्या करण्यासाठी जो तो रात्रंदिवस राबतो आहे. ज्याची त्याची धडपड आपापला प्रपंच पुरा करावा, अशी आहे. पुरा करण्याच्या कल्पना वेगवेगळ्या असतील. पण एक अनुभव मात्र सगळीकडं सारखा आहे की, कितीही वर्षं प्रपंच केला, तरी तो अजून सगळ्या अर्थानं पुरा झाला आहे, असं कुणाला वाटत नाही. त्यामुळं पुरा करण्याची धडपड सहसा कधी संपत नाही.

त्यात पुन्हा माणसं हौशी असली म्हणजे या प्रपंचात कामच काम माजून जातं. प्रपंच उदंड होतो. हौसेला मोल नाही, काळवेळ नाही, परिस्थिती नाही, मर्यादा नाही. त्यामुळं माणूस प्रपंचासाठी हुडकून हुडकून गावोगावी जाऊन, नवनवीन वस्तूंइतक्याच पुरातन काळातल्या जुन्याजुन्या पद्धतीच्या भांड्याकुंड्यांपासून, भिंतीवर लावायच्या शोभेच्या वस्तूंपर्यंत- असंख्य गोष्टी गोळा करतो. खरं पाहाता, असा हौसेचा प्रपंच करणाऱ्यांची घरं, 'घरं वाटण्याऐवजी वस्तुसंग्रहालयं झालेली दिसतात.'

प्रपंच कुठल्याही प्रकारचा असो, शेवटी माणसाच्या कर्तृत्वाला काही मर्यादा असतातच. कुठं पैसा कमी, कुठं माणसं कमी, कुठं अपयशं, कुणाचं लग्न जमत नाही, कुणाला नोकरी नाही, कुणाला बढती नाही, स्वतःच्या गावी बदली नाही, कुणाला नातेवाईक सतत अडचणीत आणतात, तर कुणाला कुणी नातेवाईकच नाही, ही अडचण असते- एकूण कर्तृत्वानं हा प्रपंच काही पुरा करता येत नाही.

त्यातून परमार्थाचा मार्ग कळतो. मग अशी माणसं गुरूंकडं जातात, देवाला जातात, आपापली गाऱ्हाणी त्यांच्या कानावर घालतात. जे कर्तृत्वानं आणि इतरांकडून मिळू शकत नाही, ते आता निदान या सर्वसत्ताधीश देवाकडून, परमार्थ करून तरी मिळेल, अशी आशा बाळगतात.

त्यासाठी गुरूंनी सांगितल्याप्रमाणं कुठली सेवा, दान, दक्षिणा-

सारं करायला माणूस तयार होतो. अपेक्षा ही की, मुलीचं लग्न जुळावं, जमिनीचा वाद मिटावा, बदली मिळावी, बढती व्हावी, मुलंबाळं व्हावी. अगदी निरुपाधिक म्हणून गणलेलं नामसुद्धा गुरूंनी त्यासाठी घ्यायला सांगितलं, तर मनुष्य त्याला तयार होतो. अशी कामं झाली की, आनंदित होतो. त्यापोटी दानधर्म करतो.

पुन्हा नेहमीप्रमाणं काहीतरी कमी पडतं, अडचण येते की, माणूस पुन्हा परमार्थाला हजर होतो. त्यातली साधनं करून आपली कामं करून घेतो. परमार्थ हा आपल्या मनासारखं होण्यासाठी, आपल्याला जमत नसलेलं काम करून घेण्याचा एक मार्ग होतो !

यावर महाराज बोलताना एकदा म्हणाले की, 'खरंतर मनुष्याचा प्रपंच त्याचा परमार्थ साधून देण्यासाठी आहे. प्रपंचात अडकलेलं आपलं मन काढून, ते भगवंताला देण्याचा अभ्यास म्हणजे परमार्थ आहे. प्रपंचातल्या गोष्टींचा दाताही भगवंतच आहे.' पण आपलं मन त्याच्याकडं सोपवलेलं असलं म्हणजे तो आपल्या कल्याणाचं असेल, तेवढंच देतो. आपण तशा भावनेनं त्याच्याकडं गेलो की, ते त्याला करता येतं.

महाराज म्हणतात, 'आपलं मनच प्रपंचाकडून काढून घेऊन भगवंताकडं गहाण टाकण्यात परमार्थ आहे. एखादी वस्तू एकाकडं गहाण ठेवल्यावर ती दुसरीकडं ठेवली जाणार नाही.' त्यानं भगवंताची खरी सेवा होते, परमार्थ होतो आणि खरा आनंदही मिळतो. पण महाराज पुढं म्हणाले, आपल्या प्रपंचासाठी भगवंताचा आपण वापर करतो, असं करणं म्हणजे परमार्थालाच 'घरजावई' बनवण्यासारखं आहे ! 'वास्तविक आपला प्रपंच भगवंताच्या - जावयाच्या सेवेला लावायला हवा. इथं जावयाची सेवा करण्याऐवजी, जावईच आपली सेवा करतो आहे, हे बरं नव्हे !'

हे ओळखलं, तर प्रपंचात अडकवणारी ही मनाची कन्या-आसक्ती रामाला देऊन टाकून, प्रपंच रामासाठी राबवून, आपण जावयाची सेवा करू शकू. तो आपलं कल्याण करतोच आहे !

●

१६.

● सूक्ष्मदर्शक यंत्र ●

आपल्या डोळ्यांना जवळचं-लांबचं पाहण्याची शक्ती दिलेली आहे. त्यानं आपला सारा व्यवहार होतो. पण त्यामुळं मला सारं कळतं, असा एक भ्रम माणसाच्या ठिकाणी उत्पन्न झाला आहे. खरंतर याला छेद देणारे अनेक अनुभवही त्याला येतात. समोरचा माणूस दिसतो-स्वार्थ दिसत नाही, नातेवाईक दिसतो-मतलब दिसत नाही. त्यामुळं त्याला आयुष्यात अनेकदा दुःखाचे, निराशेचे, अपेक्षाभंगाचे चटके बसत असतात. तरी आपल्याला दिसतं-कळतं, असं त्याला वाटत राहातं. हे केवढं नवल आहे.

भौतिकशास्त्रांनी डोळ्यांच्या मर्यादा ओळखून सूक्ष्मदर्शक यंत्र शोधलं. त्यामुळं पाण्याच्या थेंबातसुद्धा हजारो बारीक जंतू दिसू लागले. त्याच्या मदतीनं गरज तिथं उपयोग आणि अडचण तिथं उपचार शक्य झाला.

श्री महाराज या संदर्भात म्हणाले की, 'संतांच्याजवळसुद्धा असं सूक्ष्मदर्शक यंत्र आहे !' या सूक्ष्मदर्शक यंत्रातून साध्या डोळ्यांना जे दिसत नाही, त्यामुळं कळत नाही, भ्रम किंवा अज्ञान निर्माण करतं, ते प्रपंचाचं स्वरूप, त्यातले विघातक जंतू, विधायक सूक्ष्म गोष्टी-'संतांजवळच्या सूक्ष्मदर्शक यंत्रा'तून दिसतात आणि त्यामुळं जसा या भौतिक संशोधनानं आपला लाभ झाला, तसा प्रपंचाचं स्वरूप कळल्यामुळं आपला अत्यंत मोलाचा असलेला पारमार्थिक लाभ होऊ शकतो.

संतांच्याकडच्या यंत्रातून स्वतःच्या स्वभावातले दोष, नकळत येणारे स्वार्थ, अपेक्षा, अहंकार-असे आपल्या भगवंताच्या प्राप्तीच्या आड येणारे अनेक सूक्ष्म जंतू दिसू लागतील. माणसाच्या ठिकाणची आनंदाची मूळ ओढ, मुमुक्षुत्व, अनेक सद्गुण-अशा गोष्टीसुद्धा याच प्रपंचात वावरत असतात आणि त्या ओळखून त्यांचा वापर करून, आपल्याला भगवंताकडं जायला मदत होऊ शकते, हेही अशा यंत्रांमुळंच कळतं. जी कर्मं मला अडकवायला कारणीभूत होतात, ती कर्मं सूक्ष्म दृष्टीनं पाहून, निःस्वार्थीपणानं करून, मुक्ततेला मदत करायला कशी वळवावी, याचंही

ज्ञान या संतांच्याकडच्या यंत्रातून आणि त्यामुळं येणाऱ्या सूक्ष्म दृष्टीमुळं शक्य होतं. त्यासाठी जेवढा या साध्या यंत्रावर आणि शोधणाऱ्या माणसांवर विश्वास ठेवतो, तेवढा तरी संतांवर ठेवण्याची गरज आहे.

संतांमुळं आणि सूक्ष्म दृष्टीमुळं प्रपंचाचं सूक्ष्म स्वरूप कळतं, त्याला महाराज साध्या भाषेत 'चावरं कुत्रं' म्हणतात. शांतपणे बसलेलं किंवा झोपलेलं कुत्रं कोणत्या क्षणी उठून एकदम कुणाचा चावा घेईल, हे सांगता येत नाही. प्रपंचाचं खरं स्वरूप तसंच आहे. जवळचा प्रेमळ, शांत असलेला माणूससुद्धा कोणत्या क्षणी वेगळाच वागेल, हे सांगता येत नाही. तसंच आपलं जर लक्ष नसलं तर प्रपंचाची मदत होण्याऐवजी त्याची आडकाठी होणंच जास्त शक्य आहे. असलं तथ्यसुद्धा या यंत्रामुळं कळतं.

त्यावर उदाहरण देताना महाराज म्हणाले, 'पूर्वी पायी यात्रांना जायचं म्हणजे पाचदहा माणसं गटानं जात. गावची असल्यामुळं एकमेकांची सोबत एकमेकांना होई. अशीच माणसं यात्रेला जाऊन आली. पण त्यात एका माणसाची प्रवृत्ती चोरीची होती. तसंच ही गोष्टसुद्धा त्यातल्या एका जाणत्यालाच माहिती होती. वाटेत नदीवर कपडे, सामानसुमान काढून ठेवून माणसं आंघोळीला उतरली. तो माणूस, मी सगळं सांभाळतो म्हणून, काठावर बसला. जाणता मनुष्य इतरांबरोबर आंघोळीला नदीत उतरला. पण डोकं वर ठेवून त्यानं आंघोळ केली. चोरावर लक्ष असल्यामुळं त्याचं काही चाललं नाही. त्या चोराच्या सोबतीनंच यात्रापण झाली.' प्रपंच हा असा चोरासारखा आहे. लक्ष नाही दिलं तर तो आपल्याला लुबाडून, आपल्या आयुष्याचं नुकसान करील. पण संतांसारखा जाणता जवळ असेल, तर तो प्रपंचाची ही दृष्टी देईल, त्याच्यातला धोका टाळील आणि परमार्थाची यात्रा करायला त्याची सोबत मात्र घ्यायची विद्या देईल.

संतांच्याकडच्या या यंत्राची निदान आपल्याला ओळख आणि उपयोग माहिती असावा. प्रपंच न सोडता आयुष्याचं सार्थक करायला त्याचा किती उपयोग आहे, हे काही वेगळं सांगायला हवं का ?

●

१७.

● दोष भांड्याचा की पाण्याचा ? ●

काहीवेळा साधन करणाऱ्यांना स्वतःलाच वेगवेगळ्या टप्प्यावर काही शंका, प्रश्न पडतात. त्यांचा विचार करण्याची जरूर आहे. साधन करणारा जरी झाला, तरी तोही सुखदुःखं भोगतो, त्यालाही प्रपंच आहे, त्यातल्या अडीअडचणी आहेत. त्याच्या कर्मांना येणाऱ्या फळांवर विचार करतो. कर्तृत्वाचा प्रश्न येतो. ते सारे समाधानकारकपणे सुटले, आकलन वाढलं, तर त्याचाच साधनाचा प्रवास जलद होतो.

साधनेतल्या माणसांनासुद्धा आपण ठरवलेल्या गोष्टी नाही झाल्या, तर अस्वस्थता येते. त्यापोटी कुणाला दोषही दिला जातो. नोकरीत असतील, तर सगळे रीतसर प्रयत्न करूनसुद्धा एखादं काम-बदली का होत नाही, असं वाटत राहातं. कधीकधी तब्येतीची नेहमीची काळजी घेऊनसुद्धा ती बिघडते. काहीवेळा तर मोठमोठे आजार होतात. काहीवेळा पुरेसा पैसा मिळत नाही किंवा साठवता येत नाही. कसल्यातरी अडचणीत तो खर्च होतो. त्यामुळं तो पुरेल की नाही, याच्या चिंतेनं ग्रस्त व्हायला होतं. साधनेत असून, गुरूंवर निष्ठा असून त्यांना अशा आजारपणांनी, देहदुःखांनी, विचारांनी, प्रसंगांनी नैराश्य येतं.

याची उत्तरं, त्यावरचे उपाय यांचा विचार करताना महाराज म्हणाले, 'परमार्थ करणाऱ्यानी खरंतर आधी हा विचार करावा की, कोणत्या वस्तूवर जिवाची सत्ता आहे ? सत्ता असेल तर ती गोष्ट आपल्या मनाप्रमाणं झाली की नाही, हा प्रश्न उद्‌भवतो आणि न झाली तर एकवेळ दुःख होऊ शकतं. सत्य हे आहे की, सगळ्यावर खरी सत्ता परमात्म्याचीच चालते. जिवाची सत्ताच कुणावर चालत नाही. माझ्या कर्माचं फळ जर मला माझ्या सत्तेनं हवं तसं मिळवता येत नाही, तर मी कर्माचा कर्ता कसा ? '

महाराज पुढं म्हणाले, विचार करा की, 'माणूस जन्माला येतो एका ठिकाणी, विद्या शिकतो दुसऱ्या ठिकाणी, राहतो तिसऱ्या ठिकाणी, नोकरी करतो चौथ्या ठिकाणी,जातो पाचव्या ठिकाणी.अनेकदा तर ध्यानीमनी

नसतानाही अनेक चांगल्या-वाईट गोष्टी त्याच्या आयुष्यात घडून येतात.' त्या त्यानं केलेल्या नसतात.

यावरून तरी निदान, आपण कर्तेपण स्वतःवर घेऊ नये. हे तर परमार्थाचं मर्मच आहे. भगवंताच्या नजरेखाली प्रकृती कर्म करते. मी तिचा साक्षी असताना मी कर्म केलं, या भ्रमानं मनुष्य अहंकाराला खतपाणी घालीत जातो, हे खरंतर साधनेच्या विरुद्धच आहे. हे निदान साधनी माणसानं तरी लक्षात घ्यावं.

'परमार्थ म्हणजे प्रपंचरूपी झाड पाडून टाकण्यासारखं आहे.'आपण साधना करतो ती वरवरची पालवी खुडल्यासारखी होते. पण देहाशी तादात्म्य, कर्तेपण आणि अभिमान यांचं पाणी उलट या झाडाला आपण घालीत राहिलो, तर प्रपंच दुःख देणारच.

महाराज म्हणाले, 'एक गृहस्थाची पत्नी प्रसूत झाली. त्याच्या मित्रानं पुष्कळ मदत केली. पण त्याचं सोयर पाळलं नाही. खरंतर देहाबद्दल आपण त्या मित्रासारखं वागलं पाहिजे.' देहाच्या तादात्म्यानं सारे दुःख-चिंतांचे अनुभव येतात, त्याऐवजी आतल्या भगवंताशी तादात्म्य होऊन देहाला साक्षी राहिलो, तर ते मग टळतील.

महाराज पुढं म्हणतात, 'नदीतलंच स्वच्छ, चांगलं पाणी भांड्यात ठेवलं. त्या भांड्यातल्या पाण्याला जर वाईट चव आली, तर दोष पाण्याचा नाही, भांड्याचा आहे, असं समजावं.' जो आनंदमय भगवंत तोच अंशरूपानं आपल्या देहाच्या भांड्यात अंतर्यामी राहतो. त्या देहाच्या भांड्यात देहबुद्धीचा, आसक्तीचा दोष असल्यामुळं आपल्याला दुःख सोसावं लागतं. नाशिवंत देहाच्या नादाला मी लागलो, तर त्या भांड्याचा दोष मला लागेल आणि आनंदमय भगवंताचा अंश असूनसुद्धा, अशी दुःखं वाट्याला येतील.

नामाच्या मदतीनं हे देहाचं साक्षित्व आपण मिळवावं आणि स्मरणानं आतल्या भगवंताशी एकरूप होऊन राहावं, म्हणजे मग खरी साधना घडेल !

●

१८.

● नुकसान करणारी बुद्धी ●

माणसाला मिळालेली बुद्धी, ही त्याला इतर प्राण्यांपासून श्रेष्ठ ठरवणारी एक गोष्ट आहे. तिचा उपयोग करून त्यानं आपला व्यवहार खूप मोठा केला, संशोधनानं सुखाचा केला, प्रपंच समृद्ध केले, हे सगळं खरं. पण त्या बुद्धीत दोन अंगभूत दोष आहेत. हे लक्षात घेणारे लोक कमी आहेत. एक म्हणजे तिच्यामुळं नकळत येणारा अहंकार आणि दुसरं म्हणजे तिला लागून असलेला संशय किंवा शंका.

अहंकार समजून घ्यायला फार दूर जायला नको. एखादी उच्च पदवी मिळाली किंवा बुद्धिमत्तेला काही यश मिळालं की, माणसाचं इतरांच्यात राहतानाचं वागणं पाहावं. बुद्धिमान माणूस इतरांकडं नकळत पाहातो तेसुद्धा तुच्छतेच्या कटाक्षानं. याला व्यवहारातलेच नव्हे, तर परमार्थातले पढिक विद्वानही अपवाद नाहीत. असे लोक व्याख्यानाला-प्रवचनाला आले तरी, श्रोत्यांकडं हे सारे न कळणारे जमलेले आहेत, असा एक कटाक्ष टाकतात. खरंतर बुद्धीची अवस्था अशी आहे की, महाराज म्हणाले, मुलगा किती मोठा झाला, किती बुद्धिमान झाला, शिकला तरी तो बापापेक्षा वयानं मोठा होत नाही. भगवंतापुढं आपली परिस्थिती खरंतर तशी आहे, याची जाणीव बुद्धिमत्ता आपल्याला होऊ देत नाही. त्यामुळं भगवंत प्रकट जरी झाला, तरी अहंभावानं हिरण्यकश्यपूचा हात तलवारीकडं गेला, तसा बुद्धीच्या पलीकडच्या भगवंताचा विषय निघाला, तरी बुद्धी आपल्याला तर्काची तलवार काढायला लावते. यात सावध तोच टिकेल.

तीच गोष्ट शंकेची आहे. ज्योतीत काजळी असावी, तशी बुद्धीला शंका चिकटून असते. उलट बुद्धी जास्त, तेवढ्यातेवढ्या शंका जास्त येतात. बुद्धी असेलच तर ती निर्मळ किंवा शुद्ध असत नाही. म्हणून महाराज म्हणाले, 'शंका फार चिवट आहे. ती मरता मरत नाही. शिवाय काही गोष्टीच अशा आहेत की, ज्याच्या शंकांची उत्तरं किंवा त्याअर्थानं बुद्धीचं समाधान केवळ अनुभवानंच होऊ शकतं.' पण बुद्धी एवढी शंकेखोर आहे की, अनुभव

कशावरून येईल, नाही आला तर काय करणार, अनुभव आला तरी तो भ्रम नाही ना,अशा शंका उत्पन्न करील.

श्री लकुंडी महाराज म्हणत, आजार झालेला बुद्धिमान माणूस म्हणाला, औषधानं मी बरा होईन याची काय खात्री देता येईल ? असल्या शंकेची आणि बुद्धीची खात्री करणं तत्त्वतःसुद्धा अशक्य आहे. कारण त्याला जरी म्हटलं, असा आजार असलेले इतर लोक हे औषध घेऊन बरे झालेले आहेत. तर तो म्हणेल, तो त्यांचा अनुभव झाला. माझी प्रकृती वेगळी असली, तर मला औषध घेण्यापूर्वी याची खात्री कशी वाटणार ?असली शंकेखोर बुद्धी त्यानं सोडली नाही, तर ती बुद्धीच त्याला आजारी ठेवील.

महाराज म्हणत, 'साक्षात्कार होतो म्हणजे काय होतं, असं लोक विचारतात. पण अशा लोकांना पोट भरलं म्हणजे काय होतं, हे कसं सांगता येईल ? पोट कशानं भरावं, हे सांगता येईल !'

त्यातसुद्धा ही बुद्धी अशा माणसांकडून मोठ्या हुशारीनं चालवली जाते. हॉटेलवर, धाब्यावर जायचं असलं, तर तो आत्ता सुरू असेल का, आपल्याला हवा असलेला पदार्थ तिथं असेल का, तिथं स्वच्छतेचे नियम पाळले जात असतील का, तिथलं बिल जास्त होणार नाही ना-असल्या शंका ही बुद्धी घेत नाही. मनुष्य पटकन वाहन करून जातो. पण हेच देवाला जायचं असलं, तर मात्र बुद्धी चालायला लागते, ती बघण्यासारखी असते. देऊळ बंद असेल का, आत सोडतील का, आज गुरुवार आहे गर्दी नसेल ना, प्रसादाची वेळ तर संपणार नाही ना-अशा शंका उपस्थित करून असल्या गर्दीत जाण्यापेक्षा आपण निवांतपणे केव्हातरी जाऊ, असा निर्णयही ती देऊन मोकळी होते.

यात तिनं आपली फसवणूक करून आयुष्यभर भगवंताची वाट अडवून ठेवली आहे. समाधानाची ताटातूट करून ठेवली आहे, हे ओळखून आपल्या बुद्धीबद्दलही आपण सावध राहावं, अशा बुद्धिमंतांबद्दलही सावध राहावं आणि बुद्धीला देवाच्या आड येऊ देऊ नये, हे बरं !

●

१९.

● खरी न्यायव्यवस्था ●

श्री महाराजांनी जगात राहून, प्रपंच करून परमार्थाचं प्रेम माणसाला लावलं. विषयात अक्षरशः बुडालेल्या हजारो माणसांना त्यातून काढून त्यांच्या ठिकाणी नामाचं प्रेम उत्पन्न केलं,यापेक्षा त्यांच्या आयुष्यातला आणि त्यांच्या या परमार्थाच्या शाळेतला-विद्यापीठातला कोणता मोठा चमत्कार नाही. ते करताना प्रापंचिक माणसांच्या अनेक नडणाऱ्या गोष्टी त्यांच्या बारकाईनं लक्षात आल्या. त्यावर त्यांनी असंख्य व्यवहार्य मार्गही शोधून दिले. त्यात त्यांना आढळलेली एक गोष्ट म्हणजे माणसांना लागलेली कोर्टकचेऱ्यांची सवय.

न्याय हा खरंतर परमेश्वरी सद्गुणांपैकी एक आहे. चार माणसं एकत्र आली, समाज झाला की मनुष्यनिर्मित न्यायसंस्था अस्तित्वात आल्या. अक्षरशः अगणित कायदेकानू झाले. त्यात बुद्धिवादानं माणसांच्या ठिकाणी बुद्धीची रग वाढली, तिच्या जोरावर अनेकजण खऱ्याखोट्या हक्कांसाठीसुद्धा कोर्टात जाणं मोठेपणा मानू लागले. या प्रवृत्तीनं इतकं मूळ धरलं की, ज्या गोष्टीसाठी माणसं कोर्टात गेली, त्यात त्यांच्या आयुष्याचा, पैशाचा, मनःस्तापाचा-विचार आणि भानसुद्धा सुटलं.

यातून इतक्या वाईट गोष्टी निर्माण झाल्या की, मला मिळालं नाही तरी चालेल पण तुला मिळू देणार नाही, अशासाठीसुद्धा माणसं कोर्टात जाऊ लागली. लवकर न्याय मिळणं हे खरं काम असलं, तरी पन्नास वर्षं कोर्टात खेटे घालणाऱ्या माणसांनी आपली विवेकशक्तीसुद्धा गमावली.

खटल्यांचे निकाल पाहायला माणसं उरली नाहीत, हे डोळ्यांसमोर दिसत असूनही खटल्यांचा वेळ नामात घालवावा, असं कुणाला वाटलं नाही. चांगल्या कामातसुद्धा अडथळे आणण्यासाठी, वेळी खोटे खटले दाखल करण्यापर्यंत माणसांची मजल गेली. श्री महाराजांना ही सारी गोष्ट व्यथित का करीत असे, हे समजून घेण्यासारखं आहे. खरे अन्याय किंवा मतभेद हे अगदी थोडे असतात, ज्यात कुठं या कोर्टाचा संबंध येईल.

पण नव्याण्णव टक्के कोर्टाचे हेलपाटे घालणाऱ्यांच्या मागं खरंतर त्यांची हाव, फायदा उकळण्याच्या प्रवृत्ती, जिंकण्याच्या प्रतिष्ठेचा पोकळपणा, त्यागाची थोडीसुद्धा तयारी नसणं, खटले करण्याच्या लोकांच्या आग्रहाला बळी पडणं, मनात कपट असणं, भविष्याची अकारण काळजी, बळकावण्याची प्रवृत्ती, तडजोडींचा अभाव, फसवणुकींनी पैसा मिळवणं, देणं बुडवण्याची वृत्ती असणं-अशा अनेक मानवी प्रवृत्ती कारणीभूत असतात. त्यात पुन्हा जिंकलं तर अभिमान आणि हरलं तर ईर्षा हे वाढतच असतं. पैसा जातो, संबंध दुरावतात, नसलेली वितुष्ट निर्माण होतात-अगणित बाजूंनी माणसांचं नुकसान होतं. मोलाचं आयुष्य वाया जातं.

शिवाय मानवी न्यायसंस्थेला असंख्य मर्यादा आहेत. त्यात दुर्दैवानं पळवाटा, दिरंगाई, दबाव-अशा गोष्टींनी या मर्यादा न्याय अधिकच दुर्लभ करतात. त्यात त्या संस्थांचा दोष नाही. पण ज्यांना या पद्धतीनं जाण्याची जी खोड आणि खुमखुमी आहे, तिच्याबद्दल महाराज व्यथित होत असत. म्हणून महाराजांनी एरवी वापरले नाहीत, असे शब्द याबद्दल वापरले. त्याचा भावार्थ लक्षात घ्यावा. महाराज म्हणाले, 'या कोर्टकचेऱ्या जळल्या तर बरं होईल. त्यांनी माणसांना वेड लावलं आहे.'

पारमार्थिकदृष्ट्या विचार केला, तर निःस्वार्थीपण, निर्लोभता, त्याग, समजूत, स्वतःकडून कुणावर अन्याय न होऊ देण्याची सरळ प्रवृत्ती, तडजोडीची भूमिका, क्षमाशीलता, पैसा-इस्टेटी यांचं आयुष्यातलं स्थान ओळखणं, निष्कपट प्रेम-अशा दैवी गुणांचा विकास करणारा भगवंताचा मार्ग मनुष्य जर चालेल तर, हे वरचे नव्याण्णव टक्के खटले मुळातच होणार नाहीत. कोट्यावधी लोकांच्या आयुष्यातला क्षोभ आणि आधी सांगितलेली सगळी नुकसानं टळतील, हे कुणालाही पटण्यासारखं आहे.

खरंतर ज्याची श्रद्धा बळकट आहे, त्यानं ईश्वरी न्यायावर विश्वास ठेवला, तर निदान त्याला तरी या कोर्टाची जरूर उरणार नाही आणि उलट त्याला 'खरा न्याय' मिळेल, याची अधिक खात्री आहे !

●

२०.

● परवलीचा शब्द ●

माणूस इतका विचार करतोच आहे, तर त्यानं याचाही विचार करून पहावा की, या जगात खरं नक्की कोण आपलं आहे ? आजवरच्या प्रपंचाचा त्याच्याकडं एवढा अनुभव आहे. जन्मानं आईवडील आपलेच आहेत. पण आपण मोठे झालो. समजा, घरदार, लग्न असे निर्णय त्यांच्या मनासारखे घेतले नाहीत, पत्नीच्या सल्ल्यानं वागायला लागलो की, त्यांचा आपलेपणा कमी होतो. इतकंच काय, दुरावाही होतो.

असं म्हणावं, तर वर्षानुवर्षं पत्नीचा सहवास असतो. ती आपल्याला आपली वाटते. पण पत्नीला एखादी गोष्ट सांगितली नाही, एखादा निर्णय परस्पर घेतला, आवडणारी गोष्ट केली नाही, तर आपुलकी किती राहाते, ते आपणच पाहावं. तीच अवस्था पत्नीची पतीच्या बाबतीत असते. सुखसोयी आहेत, मनाप्रमाणं वागणं आहे, काही कमी पडत नाही, इतर नातेवाईकांत प्रतिष्ठा आहे तोवर हे सारे आपले आहेत. बाहेर प्रपंचाची रंगरंगोटी कितीही चांगली दिसो, खरं आपलं कोणी नाही हे ओळखावं, हे बरं.

या अर्थानं कसल्याही परिस्थितीत कधीही नक्की आपलाच राहाणारा फक्त रामच आहे. भगवंतच आहे. संत रामराम म्हणायला सांगतात, ते या अशा खऱ्या आपल्या असलेल्या, आपलं कल्याण करण्याची तळमळ बाळगणाऱ्या, कसल्याही परिस्थितीत आपल्याला न सोडणाऱ्या-रामाचं आपल्याला स्मरण राहावं. त्याचं प्रेम लागावं. आपली कर्तव्यं करताना त्याचं भान राहावं. सारे व्यवहार करताना त्याची इच्छा काय, त्याला आवडेल काय-याचा विचार करून आपलं कर्तव्य ठरवता यावं यासाठी.

सोप्यात सोपं साधन म्हणून संत एवढं तळमळीनं नाम घ्यायला सांगतात. ते अनुभवाशिवाय एक शब्दही बोलायचे नाहीत. त्यांना आपल्याकडून कसली अपेक्षा नाही. मग आपणच विचार करावा की, आपण त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवावा, त्यांनी सांगितलेल्या नामावर विश्वास ठेवावा की या जगावर विश्वास ठेवावा ?

त्यातसुद्धा महाराज म्हणाले, 'या नामाच्या मार्गातल्या शंका दूर कराव्या म्हणून ज्ञानेश्वरांसारख्यांनी ग्रंथ लिहिले, त्यांना हौस किंवा प्रतिष्ठेची यत्किंचित आवड नाही. तरीसुद्धा भगवंताचं प्रेम म्हणून आणि आपल्या कल्याणाची तळमळ म्हणून त्यांनी हे केलं. पटल्यावर नाम घेणाऱ्यांची सोय व्हावी म्हणून हा ग्रंथांचा व्याप त्यांनी केला. नाहीतर त्यांना त्याची काय गरज होती ? ' मग निदान अभ्यास करायचा असला, तर कल्याणाचा त्यांचा हेतू लक्षात घेऊन आपण असे ग्रंथ जरूर वाचावे आणि त्यांची जी अपेक्षा आहे, ते नामाचं प्रेम वाढवावं, ते वाढेल अशा कृती कराव्यात.

संतांना निर्गुणाचा, भगवंताचा प्रत्यक्ष अनुभव आहे आणि तो आपल्याला प्रत्यक्ष यावा अशी त्यांची इच्छा आहे. भगवंताच्या या निर्गुण स्वरूपाचं नातं पक्कं झालं तर, माणसाला जे खरं प्रेम मिळेल, त्यानं मनुष्य पुन्हा मागं फिरणार नाही. तो प्रपंच करील पण कर्तव्य म्हणून. या निर्गुणाच्या बुद्धीपलीकडच्या वैकुंठात प्रवेश देणारं सर्वांत सोपं साधन नाम.

त्याबद्दल सांगताना एकदा महाराज म्हणाले, 'एक अभेद्य किल्ला होता, त्याला फार मोठा तट होता, मुंगीलाही प्रवेश मिळणं कठीण. किल्ल्याचा दरवाजा भक्कम होता. खरा निर्गुण परमार्थ इतका कठीण असतो. पण या किल्ल्यातही आपला माणूस बाहेरून आला, तर त्याला प्रवेश देता यावा म्हणून एक खुणेचा, परवानगीचा शब्द ठेवला होता. तो उच्चारला तर, त्या माणसांना अशा अभेद्य किल्ल्यातही प्रवेश मिळे !' तसा 'नाम' हा संतांनी भक्तांना दिलेला 'परवलीचा शब्द' आहे. तो उच्चारील, त्याला सगुण भगवंत तर ओळखेलच पण त्याच्या सर्वत्र भरून राहिलेल्या निर्गुण अस्तित्वाच्या अभेद्य किल्ल्यातही प्रवेश मिळेल.

या परवलीच्या शब्दाचं आपण सतत स्मरण ठेवलं तर, 'खरा आपला असलेला' भगवंत आपल्याशी परत जोडला जाईल. प्रपंचाची ठेवण तशीच राहील. आपला उद्धार मात्र साधेल. फक्त त्यासाठी संतांनी दिलेला परवलीचा शब्द-'नाम'-मात्र वृत्तीपर्यंत पोचेल इतका उच्चारीत असावा !

●

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

महाराजांची शाळा,
अमुच्या महाराजांची शाळा ।
नकळत सकळां वळण लाविते,
तरी लागतो लळा ।।धृ।।

नाही भिंती नाही छप्पर ।
खडू फळा ना कुठले दप्तर ।
ग्रंथ जयाचा तयाबरोबर ।
उघडा आणिक चाळा ।।१।।

घरी, मंदिरी, झाडाखाली ।
झोपडीत वा भरे महाली ।
पसरविते ही प्रेमा आणिक ।
भक्तीच्या परिमळा ।।२।।

पति, पत्नि वा मित्र असू दे ।
बाप लेक वा नात असू दे ।
सगळे शिकती एका ठायी ।
परि धडा वेगळा ।।३।।

विनामूल्य हे अमूल्य शिक्षण ।
कर्तव्याचे अवश्य पालन ।
व्यवहारातिल परमार्थाचा ।
पहा पिकविते मळा ।।४।।

आदी अंती नाम शिकविते ।
समाधान ही पदवी देते ।
तरी पुन्हा शाळेत रहाणे ।
दीन म्हणे सोहळा ! ।।५।।

नकळत सकळां वळण लाविते, तरी लागतो लळा ।।